म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.



# संस्कृतीचीं प्रतीकें

REFBK-0009734

पं. महादेवशास्त्री जोशी

# संस्कृतीचीं प्रतीकें

लेखक

पं. महादेवशास्त्री जोशी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रमांक ७०५ ...... दि: ...
क्रमांक ...... २९७ ...... नों पृष्ठ ......

REFBK-0009734

[redacted]

मूल्य दोन रुपये

प्रकाशक—

महादेवशास्त्री जोशी
ज्ञानराज प्रकाशनाकरिता
४२१ शनिवार पेठ, पुणें २.

★

प्रथमावृत्ति

१९५७

★

मुखपृष्ठ

दलाल आर्ट स्टूडियो

★

अंतर्गत सजावट

ग. वि. देशपांडे

★

मुद्रक—

ज. श्री. टिळक
केसरी मुद्रणालय
५६८ नारायण पेठ
पुणें २.

★

माझे तीर्थस्वरूप काका-काकू

श्री. शंकर विष्णु जोशी

व

सौ. सावित्रीबाई जोशी

यांस सादर समर्पण.

—लेखक

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | स्वस्तिक | १–८ |
| २ | कमल | ९–१७ |
| ३ | कलश | १८–२५ |
| ४ | धर्मचक्र | २६–३५ |
| ५ | बोधिवृक्ष | ३६–४३ |
| ६ | अर्धनारीश्वर | ४४–५० |
| ७ | नटराज | ५१–५८ |
| ८ | त्रिमूर्ति | ५९–६५ |
| ९ | गजलक्ष्मी | ६६–७२ |
| १० | सरस्वती | ७३–८० |
| ११ | दीपज्योत | ८१–८८ |
| १२ | योगीश्वर आणि शेषशायी | ८९–९६ |
| १३ | ओंकार | ९७–१०४ |

# प्रस्ताव

भारतीय वाङ्मयांत दैवतें आणि पूज्य चिन्हें यांचें विवेचन करताना दोन शब्द प्रामुख्याने येतात. एक प्रतिमा आणि दुसरा प्रतीक. हे दोन शब्द पुष्कळदा समान अर्थाने वापरले जात असले तरी, त्यांत मूलभूत फरक आहे. प्रतिमा म्हणजे प्रतिबिंब, नक्कल किंवा मूर्ति. प्रतिमेंत रूपसादृश्य असतें. बुद्ध किंवा शंकराचार्य ह्यांच्या प्रतिमा त्या विभूतींचें रूपदर्शन घडवतात आणि त्यांचें स्मरणाहि जागृत करतात. प्रतिमा याचा अर्थच मुळाबरहुकूम किंवा मूळ व्यक्तीचें सादृश्य दाखवणारी प्रतिकृति असा आहे. प्रभुरामचंद्राने अश्वमेध यज्ञाच्या प्रसंगीं परित्यक्ता सीतेची प्रतिमा करून आपल्या शेजारी बसवली होती. तें प्रतीक नव्हे.

प्रतीकांत रूपसादृश्य अभिप्रेत नसतें. किंबहुना सादृश्याला त्यांत महत्त्वच नसतें. प्रतीकाचा संबंध आशय किंवा अर्थ ह्यांच्याशीं असतो. अरूप, अदृश्य, अव्यक्त आणि अचिंत्य असे कित्येक भाव प्रतिमेने दाखवतां येत नाहीत. ते प्रतीकाच्या रूपानेच दाखवावे लागतात. उदाहरणार्थ, ब्रह्माचीच गोष्ट घ्या. ती नामरूपातीत, अव्यक्त अतएव स्वसंवेद्य अशी वस्तु आहे. 'नेति नेति' अशा प्रकारें वस्तुमात्राचा निरास केल्यावरहि ती विश्वांत कुठे हातीं लागत नाही. ब्रह्माची उपासना तर झाली पाहिजे. मग ती कशाच्या आधारें करायची ? म्हणून मग उपनिषदांतल्या ऋषींनी प्रदीर्घ चिंतन करून ॐ किंवा प्रणव हें त्याचें प्रतीक म्हणून निर्माण केलें. मग भगवान् म्हणाला. 'हा ओंकार म्हणजे फालतु गोष्ट समजूं नका. 'ओमित्येकाक्षरं ब्रह्म–' 'ॐ हें एकाक्षर ब्रह्म आहे.' अ+उ+म् ह्या त्याच्या तीन मात्रा म्हणजे ब्रह्माचे सत्+चित्+आनंद असें समजा. विश्वाचे आदि, मध्य, अंत त्यांच्यांतच होतात असें सांगायचें असलें, तर त्या मात्रांचा अर्थ उत्पत्ति, स्थिति आणि लय असा माना.

प्रतीक हें सूत्रासारखें असतें. सारवान् आणि विश्वतोमुख. सारवान् म्हणजे साररूप अर्थाने प्रकाशक आणि विश्वतोमुख म्हणजे अनेक प्रकारें

ज्याचा अर्थ लावतां येतो असें. प्रतीकांत सिंधूचा आशय बिंदूंत आणून ठेवलेला असतो. त्याच्यांतली रेषान्रेषा बोलकी असते. तें मूर्तीपेक्षाहि समर्थ आणि प्रेरणा देणारें असतें.

सर्वांना परिचित असलेल्या देव-देवतांच्या कित्येक मूर्ती ह्या प्रतिमा नसून प्रतीकेंच असतात. त्या जर प्रतिमा असत्या, तर ब्रह्मदेवाला चार तोंडें, शिवाला तीन डोळे आणि देवीला अष्ट भुजा उत्पन्न करण्याचें कांहीच कारण नव्हतें. ब्रह्मदेवाचीं चार मुखें हीं त्याचें चारी वेदांचें आणि चारी दिशांचें ज्ञान दाखवतात. शिव हा वस्तुतः मंगलमय आहे. पण शैव परिभाषेंत विश्वाच्या आदि–मध्य–अंत या तिन्ही घटनांचे अधिकार त्याच्याकडे दिलेले आहेत. म्हणून संहाराला सूचक असा तिसरा भालनेत्र त्याला जडवला गेला. मदन-दहनाच्या वेळीं शिवाच्या याच तृतीय नेत्रांतून आगीचा लोळ निघाला होता. देवी म्हणजे माहेश्वरी शक्ति. या शक्तीचें सामर्थ्य केवढें प्रचंड आहे, तें सूचित करण्यासाठी तिला आठ, दहा, क्वचित् अठरा भुजा लावल्या गेल्या आणि त्या हातांत उत्पादक आणि संहारक अशीं उभयविध आयुधें देण्यांत आलीं. एवढें कशाला! श्रीविष्णूचे दहा अवतारहि प्रतीकात्मकच आहेत. त्यांच्याद्वारे विश्वाचा विकासक्रम सूचित केला गेला आहे. आपल्या पुराणांतून अशा अनेक प्रतीकांचा तपशीलवार अर्थ सांगितलेला आढळतो.

कोणत्याहि संस्कृतीच्या तीन अवस्था सांगतां येतात. वृक्ष, पाषाण आणि प्राणी यांची प्राकृत स्थितींत, त्यांवर कोणत्याहि प्रकारचा संस्कार न करतां उपासना करणें ही संस्कृतीची प्रथमावस्था. पुढे त्याच पाषाणाच्या प्रतिमा किंवा मूर्ती बनूं लागतात. निरनिराळ्या वृक्षांचा निरनिराळ्या मूर्तींशीं संबंध जोडला जातो. पशु-पक्षी हे देवतांचीं वाहनें बनतात. ही संस्कृतीची दुसरी म्हणजे मध्यमावस्था. त्यानंतर प्रतीकांचा प्रादुर्भाव होतो. द्रष्ट्या पुरुषांच्या शाश्वत चिंतनांतून प्रकट झालेले आध्यात्मिक आशय आणि मानवी मनांतल्या मधुर-मंगल भावना व्यक्त करण्यासाठी कांही विशिष्ट चिन्हें निर्माण होतात. तीं प्रतीकें विविध, गूढ आणि हृद्य अर्थांनी भारलीं जातात. हीं प्रतीकें मग साहित्य, कला आणि व्यवहार अशा तीन्ही क्षेत्रांत प्रभुत्व मिळवतात. मानवाच्या रसिकतेला, मंगलकामनेला, आणि आध्यात्मिकतेला तीं संजीवन आणि पोषण देत राहतात. ही संस्कृतीची तिसरी आणि श्रेष्ठ अवस्था होय.


अशा प्रमुख प्रमुख चौदा प्रतीकांचें परिशीलन या पुस्तकांत केलेलें आहे.

ऐतिहासिक, पौराणिक, आध्यात्मिक आणि कलात्मक अशा सर्व अंगांनी मीं प्रस्तुत प्रतीकांचें दर्शन घेण्याचा प्रयत्न केला आहे. ह्यांतल्या प्रत्येक प्रतीका-बद्दल आणखीहि किती तरी माहिती सांगतां येण्याजोगी आहे. पण माझें तत्त्व आपलें 'थोड्यांत गोडी !'

ही लेखमाला मी प्रथम केसरींतून लिहिली आणि आज तीच पुस्तकरूपाने प्रकाशित करीत आहें. माझे मित्र आणि केसरीचे संपादक श्री. जयंतराव टिळक ह्यांना माझ्या प्रस्तुत लेखमालेची कल्पना आवडली आणि त्यांनी ती रविवारच्या केसरींत पुरतेपणीं प्रसिद्ध केली. ही लेखमाला पुस्तकरूपाने वाच-कांपुढे आणण्याच्या कामींहि त्यांचेंच सर्व प्रकारचें साह्य आहे आणि ह्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडे आहेत. केसरीच्या संपादकमंडळांत काम करणारे श्री. भा. द. खेर ह्यांचाहि ह्या लेखमालेशीं निकटचा संबंध आहे. त्यांनीं माझा प्रत्येक लेख श्री. ग. वि. देशपांडे यांच्या चित्रांनिशीं सुंदर सजा-वटींत वाचकांना सादर केला. त्याबद्दल मी त्यांचाहि ऋणी आहें. केसरी छाप-खान्याच्या व्यवस्थापकांनी पुस्तक सुंदर छपाईत छापून दिलें, त्याबद्दल त्यांचेहि आभार मानायलाच हवेत.

पुणें, वसंतपंचमी
शके १८७८

—महादेवशास्त्री जोशी



संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
वि:
नों: दि:

# स्वस्तिक

कोणत्याहि मंगल कार्याच्या प्रारंभीं अथवा वरातीची मिरवणूक निघताना पुरोहित एक मंत्र म्हणत असतात. तो कानाला तर गोड लागतोच; शिवाय अर्थ समजला तर भावनेलाहि गोड लागतो. हृदयाला आश्वासन आणि उल्हास देणारा असा तो मंत्र आहे—

" स्वस्ति न इंद्रो वृद्धश्रवाः
स्वस्ति नः पूषा विश्ववेदाः ।
स्वस्ति नस्तार्क्ष्यो अरिष्टनेमिः
स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु "

यांतल्या प्रत्येक चरणाच्या प्रारंभीं 'स्वस्ति' हीं अक्षरें कानावर पडतात. हा शब्द 'सु–अस्' धातूपासून बनलेला आहे. 'सु' म्हणजे चांगलें, कल्याण, मंगल आणि 'अस्' म्हणजे सत्ता, अस्तित्व. स्वस्ति म्हणजे कल्याणाची सत्ता. कल्याण असो, असावें, आहेच, ही भावना. मंत्रद्रष्ट्या ऋषीनें वरील मंत्रांत हें कल्याण चार देवतांच्याकडे प्रार्थिलें आहे. एकट्या स्वतःसाठीं नव्हे, तर समुदायासाठीं आणि सर्वांसाठीं. त्याचा अर्थ असा—

" महनीय कीर्तीचा इंद्र आम्हांला कल्याणप्रद होवो. विश्वाचें ज्ञान असलेला पूषा आम्हाला कल्याण देवो. अरिष्टनेमि तार्क्ष्य आमचें मंगल करो. आणि बृहस्पति आमच्या ठिकाणीं कल्याणाची प्रतिष्ठा करो. "

माणसाला नेहमीच स्वस्तिक्षेम राहावें आणि स्वस्तिक्षेम पहावें, असें वाटत असतें. स्वस्तिभावनेंत त्याला आपला आणि विश्वाचा विकास दिसतो. स्वस्तिभावनेंतच अंतःकरणाचें शतदळ उमलल्याचा साक्षात्कार घडतो. जिथे जिथे श्री, शोभा, सुसंवाद, प्रेम, उल्हास, जीवनांतलें सौंदर्य, व्यवहारांतलें सौहार्द आढळतें, तिथे तिथे या स्वस्तिभावाची सत्ता असते.

या अव्यक्त; पण हृदयंगम अशा भावनेचें प्रतीक म्हणजे स्वस्तिक !

स्वस्तिक हें अतिप्राचीन मानवाने निर्माण केलेलें सर्वांत पहिलें धर्म

प्रतीक असें समजतात. पाऊस पाडणारा इंद्र, मेघांचे संचालन करणारा वायु, प्रकाश आणि उष्णता देणारा सूर्य, मानवाच्या भल्याबुऱ्या वर्तनावर आणि शुभाशुभ कर्मांवर नजर ठेवणारा वरुण अथवा तत्सम दुसरा कोणी तरी देव, ही भूतधात्री वसुंधरा, अशा अनेक देवतांचा स्वस्तिकांत एकत्र समावेश झालेला आहे. देवतांची शक्ति आणि मानवाची शुभकामना, या दोहोंच्या संमीलित सामर्थ्याचें तें प्रतीक आहे.

एक उभी रेषा आणि तिच्यावर तेवढ्याच लांबीची दुसरी आडवी रेषा, अशी मुळांतली त्याची आकृति होती. उभी रेषा ही ज्योतिर्लिंगाची प्रतिनिधि आहे. ज्योतिर्लिंग हें विश्वोत्पत्तीचें मूळ कारण. तें उभ्या रेषेने दर्शविलें जातें. आडवी रेषा ही सृष्टीचा विस्तार दर्शविते. ईश्वराने ही भूत-सृष्टि निर्माण केली आणि सर्व देवतांनी आपापल्या शक्तींचें साह्य देऊन तिचा विस्तार केला, असा या मूल स्वास्तिकाचा भावार्थ आहे. हें मूल स्वास्तिक, क्रॉसच्या रूपाने आजहि ख्रिस्तधर्मीय लोकांच्या उपासनेंत पहायला मिळतें.

भगवान् येशूला क्रूसावर खिळवून त्याचा वध करण्यांत आला आणि तेव्हापासून क्रॉस हें नवें धर्माचें प्रतीक निर्माण झालें, अशी सर्वमान्य समजूत आहे; पण ती खरी नव्हे. क्रॉसची उत्पत्ति येशूच्या वधस्तंभांत नाही. येशूच्या पूर्वी हजारो वर्षें क्रॉस अस्तित्वांत होता आणि जगाच्या कोनाकोपऱ्यापर्यंत पूजला जात होता. ख्रिस्तधर्म निर्माण होण्यापूर्वी इतर अनेक प्राचीन संस्कृतींत 'क्रॉस'चें प्रतीक आढळून आलें आहे.


मिसर देशाची संस्कृति ही एक प्राचीन संस्कृति मानली जाते. त्या संस्कृतींत 'आइसिस्' नांवाची एक महान् देवता आहे. वैदिकांच्या अदिती-प्रमाणे आणि सिंधुसंस्कृतींतल्या महामायेप्रमाणे ती विश्वमाता आहे. या 'आइसिस्'चें एक चित्र उपलब्ध झालें आहे. ती गायीच्या शिंगांचा मुकुट मस्तकीं धारण करून उभी असून तिच्या डाव्या हातीं यष्टि आणि उजव्या हातीं क्रॉस धरलेला आहे. असीरियाची संस्कृति ही जगांतली आणखी एक प्राचीन संस्कृति. हिलाच आपण असुरसंस्कृति म्हणतों. त्यांच्यामध्येहि क्रॉसला धर्मप्रतीक म्हणून मान्यता आहे.

ब्रिटिश म्यूझियममध्ये असीरियन गॅलरी नांवाचा एक विभाग आहे. त्या विभागांत 'सस्सी राम्मानु' नांवाच्या एका प्राचीन राजाच्या पाषाण-मूर्ती ठेवलेल्या आहेत. त्यांच्या मानेवर आणि वक्षःस्थलावर कोणतें चिन्ह

कोरलेलें असेल, तर तें क्रॉसचें. भले लांबरुंद असे ते क्रॉस आहेत. रोमन कॅथॉलिक कोशांत यांना 'पैक्टोरल क्रॉस' असें नांव दिलेलें आहे.

क्रॉसाचेहि दोन प्रकार आहेत. पाहिला सरळ क्रॉस. यांत उभ्या आडव्या रेषा अथवा पट्टया समान लांबीच्या असतात. तो गणितांतल्या अधिक चिन्हासारखा असतो. त्याला ग्रीकांचें प्रतीक मानतात. दुसऱ्या प्रकारच्या क्रॉसमध्येहि दोन्ही पट्टया समान लांबीच्याच असतात. पण त्या रोमन वर्णमालेंतल्या X या अक्षराच्या आकारांत म्हणजे तिरप्या जोडलेल्या असतात. याला 'संत अँड्र्यूजचा क्रॉस' असें म्हणतात. याच क्रॉसच्या चारी टोकांना भुजा फोडल्या की तें भारतीय स्वस्तिक बनतें. असीरियन संस्कृतींत क्रॉस आणि स्वस्तिक अशा दोन्ही चिन्हांचा संयोग असलेलें एक चित्र आहे. त्याची आकृति खालील चित्रांत पाहावी.


भारतीय संस्कृतींत स्वस्तिकाचा संबंध सूर्यनारायणाशीं जोडलेला आहे. क्रॉसच्या चारी टोकांना पोटांत घेऊन एक वर्तुळ काढलें की, तें थेट सूर्याचें प्रतीक बनतें. आणखी एक गंमत आहे. उभ्या क्रॉसमध्ये तिरपा क्रॉस जडवला की त्याला आठ अग्रें निर्माण होतात. त्यांवर आठ त्रिकोणी टोप्या बसवल्या की तें एक सुंदर अष्टदल कमल तयार होतें. कमलाचा आणि सूर्याचा प्रकाश्य–प्रकाशक संबंध प्रसिद्धच आहे. तेव्हा हें अष्टदल हेंहि सूर्याचेंच प्रतीक ठरतें. विष्णूच्या हातांतलें सुदर्शन चक्र तें हेंच. विष्णु हा आदित्य आहे. प्राणिमात्राला जीवन देणारा सूर्यच पुढे विष्णुस्वरूप झाला आणि विश्वाच्या प्रतिपाळाचें कार्य त्याच्याकडे आलें. सूर्याचें प्रतीक जें सुदर्शन, तें त्याच्या हातीं सदैव फिरतें ठेवून उपासकांनी त्याचें मूळ देवतेशीं असलेलें नातें कायम स्मरणांत राहण्याची सोय करून ठेवली आहे.



स्वस्तिकाच्या चार भुजा म्हणजेच श्रीविष्णूचे चार हात, असा अर्थ निस्संदिग्धपणे निघू शकतो. स्वस्तिकाचा मध्यबिंदु हें नारायणाचें नाभिकमल

म्हणजे सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवाचें स्थान. त्यावरून स्वस्तिक हें सर्जनात्मक आहे, हें सूचित होतें. क्रॉसमधल्या आडव्या रेषेचीं दोन्ही टोकें उभीं वळविलीं कीं तोच त्रिशूल बनतो. लगेच तें शिवाचें आयुध होतें. शिवाला 'शूली' असें एक नांवच आहे. शिव हा सृष्टीचा संहारकर्ता आहे. त्यामुळे स्वस्तिकाच्या त्रिशूलात्मक आकृतीने विश्वाचा संहारहि सूचित होतो.

अशा प्रकारें सृष्टि-स्थिति-प्रलय, अशा विश्वाच्या तिन्ही अवस्था एकाच स्वस्तिकाच्या भिन्न भिन्न आकृतींनी दिग्दर्शित होतात. भविष्यपुराणांत सुदर्शन आणि त्रिशूल हीं दोन्ही सूर्याच्याच तेजांतून निर्माण झाली, असें सांगितलेलें आहे. प्रत्येक देवतेचें विशिष्ट आसन ठरलेलें असतें. कोणाचें त्रिकोणी, कोणाचें पंचकोनी, कोणाचें अष्टकोनी, तर कोणाचें चतुष्कोणी. पैकी चतुष्कोण हें स्वस्तिक आहे आणि पवित्र भूमीवर चुन्याने अथवा रांगोळीने त्याची आकृति काढतांच भगवान् सूर्य त्यावर आसनस्थ होतो, अशी पूर्वापार श्रद्धा आहे.



कित्येक लोक स्वस्तिक हें गणपतीचें प्रतीक मानतात. अशा वेळीं तें खरें कोणाचें, सूर्याचें कीं गणपतीचें, असा संदेह निर्माण होणें शक्य आहे. पण गणपति हेंच मुळी सूर्याचें प्रतीक असल्यामुळे स्वस्तिकाचें स्वामित्व त्याच्याकडेहि यायला कांहीं हरकत नाहीं. अथर्वशीर्षांत गणपतीला 'त्वं विष्णुस्त्वं सूर्यः' असें उघड उघड निर्देशिलें आहे. पूर्व क्षितिजावरचें आरक्त सूर्यमंडल हेंच गजमुख होय. सूर्याभोवतींच्या ककचावरणांतून वर उफाळणारें

लक्षावधि मैल लांबीचें तेजःशृंग, तीच गणपतीची सोंड. 'हें सर्व जग तुझ्यापासून उत्पन्न होतें' ही अथर्वशीर्षांतली पंक्ति, सूर्यालाच यथार्थत्वानें लागू होते. तेव्हा स्वस्तिकाचा संबंध गणपतीशीं जुळवला तरी तो सूर्यापासून तुटत नाही.

स्वस्तिकाचे दोन प्रकार आहेत. डावें आणि उजवें. ज्याच्या दक्षिण टोकाची भुजा डावीकडे वळते आणि त्याच पद्धतीनें इतर तीनहि भुजा वळत जातात, तें डावें आणि याच्या उलट म्हणजे दक्षिण टोकाची भुजा उजवीकडे वळणारें आणि इतर तीनहि भुजांना तशीच गति देणारें तें उजवें. डावें स्वस्तिक हें कालीचें द्योतक असून नारीतत्त्वाचें प्रतीक आहे. उजवें स्वस्तिक गणेशाचें चिन्ह असून नरतत्त्वाचें प्रतीक मानतात. दोनहि प्रकारचीं स्वस्तिकें जगाच्या सर्व भागांत आढळतात आणि निरनिराळे पण शुभ असेच भाव दर्शवितात. आपल्या महाराष्ट्रांत आणि कोकणांत डावें स्वस्तिक रूढ आहे. हें प्रदक्षिणामार्गाला धरून आहे. प्रदक्षिणा करीत असतांना आपण डाव्या हातानें निघतों आणि उजव्या हाताकडे येतों. म्हणजे प्रदक्षिणा करीत असतांना जिला प्रदक्षिणा करावयाची ती देवता नेहमी उजव्या हाताला रहाते. यालाच 'उजवी घालणें' अशी संज्ञा आहे.

एखाद्या चिन्हाला अथवा प्रतीकाला जेव्हा तत्त्वज्ञानाचा आधार मिळतो, तेव्हा तें प्रतीक संस्कृतीच्या प्रवाहांत अढळपद मिळवून बसतें. स्वस्तिकाचें तत्त्वज्ञानात्मक रहस्य सिद्धान्तसार नांवाच्या ग्रंथांत पुढील प्रमाणे सांगितलें आहे—

स्वस्तिकाचा मध्यबिंदु हा विश्वाचा गर्भाशय आहे. याचेंच नांव सत्. हा मध्यबिंदु जेव्हा रेषांत विस्तार पावतो आणि त्याचा जो व्यास बनतो तें लिंगरूप तत्त्व होय. हें महायोनींत उत्क्षोभ निर्माण करतें आणि उत्पत्तीला प्रेरणा देतें. जेव्हा यांतल्या रेषा शूलाचा आकार घेतात, तेव्हा जड आणि चेतन अशा अगदी भिन्न तत्त्वांचें अद्‌भुत मिश्रण होतें आणि त्यांतून नामरूपात्मक विश्व उदय पावतें.

दुसरी उपपत्ति वेगळ्या प्रकारें मांडलेली असली, तरी तीहि स्वस्तिकाचा विश्वोत्पत्तीशींच संबंध दाखवते. वैदिक परिभाषेंत देश आणि काल हे दोन महान् यक्ष आहेत. या दोहोंच्या शक्ति विश्वांत प्रथम एकमेकींशीं टक्कर घेतात, संघर्ष करतात आणि शेवटीं वैरापेक्षा प्रेम बरें, असें मानून पर-


स्पर हातमिळवणी करतात. हीं दोन तत्त्वें जिथे मीलनयोग साधतात, तो स्वस्तिकाचा धारणबिंदु होय. या बिंदूचें नांव 'आभु' म्हणजे अमूर्त सत्तत्त्व आणि त्याच्या भुजा म्हणजे 'अभ्व' अर्थात् असत्, म्हणजेच नामरूपांनी खचून भरलेलें जग. हें सारें विश्व म्हणजे स्वस्तिकाचाच प्रकाश आहे. स्वस्तिकाचा विपर्यास झाला, म्हणजे विश्वाची विघटना व्हायला वेळ लागत नाही. शंकराच्या हातांतल्या त्रिशूलाच्या आकृतींत स्वस्तिकाचें विघटनच सूचित केलेलें आहे. स्वस्तिक हें विश्वाच्या इमारतीच्या पायाचा दगड आहे, अशी जी लोकमानसांत युगानुयुगें श्रद्धा वावरते, तिचाच विकास करून संस्कृती-च्या प्रणेत्यांनी स्वस्तिकाची तत्त्वज्ञानाच्या परिभाषेंत मांडणी केली, असें म्हणतां येतें.

म्हणूनच तें विवाहप्रसंगीं अंतरपाटावर कुंकुमानें रेखाटतात. जन्माचे जिवलग होण्यासाठी समोरासमोर उभे राहिलेल्या वधूवरांनी त्या मंगल क्षणीं स्वस्तिकावर दृष्टि आणि ध्यान जडवायचें असतें. कांही ठिकाणीं, जन्मलेल्या अर्भकाला सटीच्या दिवशीं स्वस्तिक रेखलेल्या वस्त्रावर निजवतात, त्याचा हेतु जीवनांत त्या जीवाला स्वस्तिक्षेम लाभावें हाच असतो. वियोग झालेल्या प्रियजनांचा पुनश्च संयोग व्हावा म्हणूनहि स्वस्तिकाची पूजा करण्याची चाल आहे. स्वस्तिक हें शांति, समृद्धि आणि मंगल, यांचें प्रतीक असल्यामुळे कित्येक सुवासिनी चातुर्मासांत स्वस्तिकव्रत करतात. या व्रतांत रोज स्वस्तिक काढून त्याची पूजा करायची असते. चातुर्मासांत देवघरांत देवापुढे स्वस्तिक आणि अष्टदळ यांची रांगोळी काढणाऱ्या स्त्रीला वैधव्याचें भय उरत नाही, असें पद्मपुराणांत सांगितलें आहे.

हिंदूंप्रमाणेंच बौद्ध आणि जैन यांनीसुद्धा स्वस्तिक हें पूज्य मानलेलें आहे. बौद्धांनी स्वस्तिकापासून पानें आणि फुलें यांची उत्पत्ति कल्पिली आहे. बौद्धांच्या उपासनेंत स्वस्तिकाचीं अनेक रूपें आढळून येतात. बौद्धधर्माचा पालव धरून हे मलाया, जावा, चीनपर्यंत जाऊन पोंचलें आहे. चीनमधील मंदिरें, धवळारें आणि धर्मग्रंथ, यांवर स्वस्तिकाच्या आकृति काढलेल्या असतात. बौद्धमंदिरांतून प्रकाशाची पखरण करणाऱ्या दिव्यावरहि तें आरूढ होऊन बसलें आहे.

जैन लोक शेजारीं दाखवलेल्या आकृतीप्रमाणे स्वस्तिक काढतात,

असें श्री. एन्थोवेन आपल्या 'The Folklore of Bombay' या ग्रंथांत सांगतात. या आकृतीचें त्यांनी दिलेलें विवरण असें आहे—याचीं चार पुढे आलेलीं अग्रें देव, मनुष्य, तिर्यक् (मानुषेतर जीव) आणि नरकी, अशा चतुर्विध जीवात्म्यांचें निदर्शन करतात. आकृतीच्या वरच्या बाजूस ओळीने असलेले तीन बिंदु हे ज्ञान, दर्शन आणि चरित, ह्या तीन रत्नांचे निदर्शक होत. आणि त्यांच्या मस्तकावरचा बिंदुयुक्त अर्धचंद्र म्हणजे मुक्ति.



जैन लोक जेव्हा एखाद्या देवाचें दर्शन घेतात, तेव्हा देवापुढे स्वस्तिक काढून त्यावर दक्षिणा ठेवतात. जैन स्त्रियांना तर स्वस्तिक चिन्ह इतकें प्रिय आहे, की देवदर्शनासाठी जातांना ज्या पिशवींतून त्या तांदूळ वगैरे नेतात, तिच्यावरहि कशिद्याने स्वस्तिकाची आकृति काढलेली असते.

भारतीय शिल्पकलेंतहि स्वस्तिकाने गौरवाचें स्थान मिळवलें आहे. या देशांतलीं कित्येक मंदिरें स्वस्तिकाच्या आकारांतच उभीं झालीं आहेत. याचें सर्वांत मोठें उदाहरण म्हणजे पुरींतलें जगन्नाथाचें मंदिर. त्याचा अंतर्भाग स्वस्तिकाकृति निर्मिलेला आहे. काशींतलें एक मंदिरहि तशाच आकाराचें आहे. उत्पत्तीशीं संबंध असलेल्या या स्वस्तिकाला प्राचीन काळच्या कोण्या मानववंशाने मृत्यूचीहि सोबत करायला लावलें आहे. श्री. इरावती कर्वे लिहितात—

"महाराष्ट्राच्या दक्षिणेस गेल्या कांही वर्षांच्या उत्खननांत द्रविडांचीं एका विशिष्ट तऱ्हेचीं थडगीं सांपडलीं आहेत. मोठमोठे शिलापट्ट स्वस्तिकाकार एकमेकांशी जोडून एक पेटी तयार करून त्यांत मृताचे अवशेष ठेवलेले आढळतात."

भारतांतच नव्हे; तर रोममधील मृतांना पुरण्याच्या भुयारांतहि तें गवसलें आहे. तें पांपीला आढळतें, तसेंच पाश्चात्य देशांतल्या कांही मंदिरांवरहि झळकतें. स्वस्तिकाचा प्राचीन काळापासूनच सार्वभौम

अधिकार आहे. मानवाने निर्माण केलेलें तें अर्थपूर्ण असें धर्माचें आदिप्रतीक आहे, असेंहि म्हणायला हरकत नाही. मिसर, असीरिया, युरोप, या देशांच्या संस्कृतींत त्याला सर्जनसामर्थ्याचें प्रतीक मानलेलें आहे. भारत, चीन इत्यादि पौर्वात्य देशांनी त्याच्या सर्जनसामर्थ्याला शाश्वत जीवन आणि शाश्वत मंगल, यांची जोड दिलेली आहे. अमेरिकेच्या संस्कृतींत तें ताप-शाप-मुक्तीचें चिन्ह बनलें आहे.

स्वस्तिकाची प्रतिष्ठा ही अशी विश्वव्यापक आहे.



# कमल

पुराणकाळची गोष्ट आहे. एक व्याध आणि त्याची स्त्री अशीं दोघें एका नगराच्या बाह्यभागांत राहत होतीं. मोलमजुरी करून तीं आपला निर्वाह चालवीत. कालांतराने त्या प्रदेशांत मोठा दुष्काळ पडला. भले भले लोक अन्नाला महाग झाले. व्याधहि त्या उपासमारींत सापडला. त्याला कुठे रोजगारहि मिळेना. त्याला वाटलें की, आता रानांत जाऊन कंदमुळें तरी आणावीं. तीं दोघें रानांत गेलीं. वणवण भटकलीं. पण त्यांना कंदमुळेंहि सापडलीं नाहींत. गरीब-दुबळ्यांनी तीं आधीच उकरून फस्त केलीं होतीं.

दुपार झाली तशीं तीं एका तळ्यावर आलीं. त्या तळ्यांत सगळीकडे छानदार कमळें उमललीं होतीं आणि तीं जलपृष्ठावर डोलत होतीं. त्यांना पाहून व्याधाचा आत्मा समाधान पावला. त्याने आधी आकंठ पाणी घोटलें आणि मग भराभरा तीं कमळें तोडून घेतलीं. तो आपल्या बायकोला म्हणाला. 'किती सुंदर आहेत ! हीं आपण शहरांत नेऊन विकूं. एका वेळेची तरी सोय होईल आपली.'

आणि तीं दोघें शहरांत आलीं. 'घेतां का कमळं ?' असें पुकारीत रस्त्यांतून हिंडूं लागलीं. पण कोणीहि त्या पुष्पसंभाराला विचारींना. व्याधाला तांबडी शिवराई भेटेना. शेवटीं सूर्य मावळला. हळूहळू रात्र पडली. आता कुठेतरी निवारा घ्यावयाला हवा, म्हणून तीं दोघें एका घराच्या वळचणीला आलीं. तें घर एका वारवनितेचें होतें. ती बाई भक्तिभावाची होती. तिला कसलें तरी व्रत होतें आणि त्यानिमित्त ती श्रीविष्णूची पूजा करीत होती. तिच्या पूजासाहित्यांत इतर सर्व कांहीं होतें. पण नव्हतें तें कमळ. ऐनवेळीं व्याध कमळें घेऊन दारांत आलेला पाहून तिला हर्ष झाला. त्या कमळांचें मोल त्या वेळीं तिने वाटेल तें दिलें असतें. पण व्याधाचीच मति आता बदलली.

तो मनांत म्हणाला, 'कमळं तर द्यायचींच; पण ती विकत मात्र नव्हेत. अशी थाटामाटाची देवपूजा आपल्याला कधी पाहायलासुद्धा मिळायची नाही. मग करण्याचें भाग्य तर दूरच. ही बाई मोठ्या भक्तीने ती करते, तेव्हा

तिच्या पूजेंत आपलें एक फूल तरी असूं द्या.' आणि त्याने आपल्या हातांतली ती कमलसंपदा त्या वारांगनेच्या हवालीं केली. त्या औदार्याने श्रीविष्णु, त्या व्याध–दंपतीवर प्रसन्न झाला. कालांतराने तीं दोघें मरण पावलीं. पुढच्या जन्मीं तो व्याध रथंतर नांवाचा राजा झाला. त्याचबरोबर व्याध–स्त्री त्याची राणी झाली, हें सांगणें नकोच.

पद्मपुराणांत कमलाचें माहात्म्य सांगितलें आहे तें असें. पद्मपुराणांतच कशाला? अनेक पुराणांतून आणि व्रतादिकांच्या ग्रंथांतून ठिकठिकाणीं कमलाची प्रशस्ति आढळते. कमल-सप्तमी नांवाचें एक व्रतच आहे. हें व्रत चैत्र शुद्ध सप्तमीला करायचें असतें आणि त्यांत सुवर्णाच्या कमळावर सूर्याची प्रतिमा बसवून तिचें दान करायचें असतें.



कमल हें भारतीय संस्कृतीचें एक लाडकें व अर्थपूर्ण असें प्रतीक आहे.

कमलाचा आणि सूर्याचा संबंध फार नाजूक आहे. सूर्याला कम-लिनीचा पतिच म्हटलें आहे. आणि विष्णु हा आदित्यच असल्यामुळे तें त्याच्याहि अंतर्बाह्य जीवनाशीं जुळून राहिलें आहे. विष्णूच्या चौथ्या हातांत तें सदैव विलसतें. शंख–चक्र–गदा–पद्म अशी त्यांची क्रमवारी आहे. शंख हा सासुर-वाडीचा संबंधी म्हणजे लक्ष्मीचा भाऊ म्हणून विष्णूने जवळ केला आहे, असें कविजन सांगतात. पण तो वस्तुतः आहे ज्ञानाचा प्रबोधक म्हणून. ध्रुवबाळाच्या गोऱ्यागुबऱ्या गालाला त्याचाच स्पर्श झाला आणि त्याच्या हृदयांत तत्त्वज्ञान उदय

पावलें. विष्णूच्या दुसऱ्या हातांतल्या भिरभिरत्या तेजाळ सुदर्शनचक्राने त्याचें विश्वचक्रप्रवर्तन सूचित होतें. तिसऱ्या हातांत गदा आहे ती दुर्जनांच्या मस्तकाचें शतचूर्ण करण्यासाठी. आणि चौथें तें कमल. तें कशासाठी? ज्ञानेश्वर सांगतात की, तें भक्तांच्या पूजेसाठी त्याने सदैव हातांत वागवलें आहे. 'हातींचेनि लीलाकमलें। पूजूं तयांतें.'

त्याचें नांव आहे लीलाकमल. त्यावरून ही सकल सृष्टि म्हणजे भगवंताचा लीलाविलास होय, अशी सूचना मिळते. वस्तुतः श्रीविष्णु हा अनाम, अरूप आणि अजन्मा. पण लीलेसाठी चराचराच्या रूपाने तोच आकाराला आला. त्याचें निजरूप तरी कसें? सर्वांगीं सुंदर आणि टवटवीत. चरण तरी कमल. कर तरी कमल. मुख तरी कमल. नेत्र तरी कमल. अन् हृदय तरी कमलच. भगवान् म्हणजे जणू कमलरूपच. म्हणूनच त्याची कमलपुष्पांनी पूजा करावी, असें शास्त्र सांगतें. विष्णूच्या पूजेंत तुळशीचें दळ आणि तळ्यांतलें कमळ हीं दोन्ही अपरिहार्य आहेत.

हाच भगवान् श्रीविष्णु प्रलयोत्तरकालीन अगाध आणि अपार जलांत बालरूपाने वटपत्रावर शयन करीत होता.

"नासदासीन्नो सदासीत्तदानीम्। नासीद्रजो नो व्योमापरो यत्"

अशी ती अवस्था होती. त्या वेळीं सत्‌हि नव्हतें अन् असत्‌हि नव्हतें. धूळहि नव्हती अन् आभाळहि नव्हतें. मृत्युहि नव्हता अन् अमृतहि नव्हतें. अशा त्या स्थितींत भगवंताला सृष्टिनिर्मितीची स्फूर्ति झाली. त्या स्फूर्तीतून क्षोभ उठला. त्या संथ, गंभीर प्रलयजलावर लाटांचा नटनाच सुरू झाला. त्या संघर्षांतून अग्निज्वाळा उठली. तिने आपल्या भोवतीचें जल शोषून घेतलें. लगेच त्या जागीं पोकळी निर्माण झाली आणि आकाश हें महाभूत जन्मलें. लगोलग भगवंताच्या नाभिप्रदेशांतून एक देठ उगवला. त्याच्या टोकावर सुंदर कमल उमललें. ब्रह्मदेवाला आपल्या कोशांत गर्भाप्रमाणे वाढवूनच तें वर आलें होतें व विकसलें होतें.

ब्रह्मदेव डोळे उघडून पाहूं लागला. त्याला वाटलें की, आपल्या कमलजननीचें मूळ कुठे आहे तें एकदा पाहावें. म्हणून त्याने त्या अगाध जलांत खोल बुडी दिली. त्याला मूळ सापडलें आणि तिथे मूठभर मातीहि हाती लागली. ती घेऊन तो वर आला. त्याने ती त्याच कमलाच्या पानावर पसरली. तीच पुढे पृथ्वी झाली. कमलकेसर तेच पर्वत झाले. मध्यभाग तें जंबुद्वी

दि: ................

म्हणजे आपण ज्या प्रदेशावर राहतो, तो प्रदेश झाला. त्याचा बाह्यभाग म्हणजे डोंगरकठाडींचे म्लेच्छ देश. खालच्या पाकळ्या म्हणजे दैत्य, सर्प, पक्षी, यांचीं निवासस्थानें. वरच्या पाकळ्या म्हणजे देवलोक. अशा रीतीने चतुर्दश भुवनें या एका मूळ कमळांतून प्रकट झालीं. म्हणूनच या कल्पाला 'पाद्म ( कमल ) कल्प' असें नामाभिधान प्राप्त झालें.

ब्रह्मा कमलासन आहे. विष्णु कमलहस्त आहे. लक्ष्मी कमलजा आहे. सूर्य हा स्वतःच निळ्या नभःसरोवरांतलें रक्तकमल आहे. कमळाचें दान करावें; पुढील जन्म वैभवशाली मिळतो. कमलपुष्प अंगावर धारण करावें; तें मंगलदायक होतें. कमळांची रांगोळी काढावी; घरांत लक्ष्मी येते. कमळाच्या पाकळ्या सेवन कराव्या; अवयव सुंदर आणि सतेज होतात.

वरील कथा, आख्यायिका, संकेत आणि विधानें यांचें विश्लेषण केल्यास कमल हें पिंड-ब्रह्मांडांत कोणत्या तत्त्वांचें प्रतीक आहे, तें कळूं शकतें—

( १ ) कमल हें स्त्रीतत्त्व असून तें जीवनोत्पादक आहे. ( २ ) कमल म्हणजे भूमि, योनि आणि चिच्छक्ति. ( ३ ) कमल म्हणजे शोभा, वैभव, आरोग्य, दीर्घायुष्य आणि कीर्ति. ( ४ ) कमल म्हणजे शाश्वत जीवन, अमृत. ( ५ ) कमल म्हणजे शुचित्व आणि शुद्ध ज्ञान. आणि ( ६ ) कमल म्हणजे संस्कृतीचें सार.

वर दिलेल्या ब्रह्मदेवाच्या पौराण कथेंत पृथ्वी आणि कमल यांचा अंगांगीभाव व्यक्त झालेला आहे. याच भावाला आर्यपूर्व सिंधुसंस्कृतीचाहि दुजोरा मिळतो. मोहेंजोदारोच्या उत्खननांत एक मूर्ति सापडली आहे. तिला धरित्रीचें मूलप्रतीक मानतात. ती विवस्त्र आहे, नितंबिनी आहे आणि कुचभारवती आहे. ते उभय पयोधर तिने स्वतःच्या दोन्ही हातांनी वर उचलून धरले आहेत. पृथ्वीहि विंध्य-हिमाचलादि पर्वतांना अशीच उचलून धरते. आणि तिच्या केशकलापांत एकच फूल माळलेलें दिसतें अन् तें म्हणजे कमळ!

एकंदर विचार केल्याअंतीं भारतीय संस्कृतीचा गेल्या पांच हजार वर्षांचा इतिहास या कमलप्रतीकाने सुगंधित झालेला दिसतो. चाफा–मोगरा आहे, बकुळ-सुरंग आहे, शेवंती–चमेली आहे, सगळीं आपापल्या परी कमनीय आणि सुगंधी आहेत. पण कमलाची लोकप्रियता सार्वभौम मानावी लागेल. विष्णु आणि लक्ष्मी या दोन विश्वाधार देवतांनी आदरिल्यामुळे तें सनाथ आणि सगर्व झालें आहे.

ऋग्वेदांत त्याच्या दोन जातींचा उल्लेख मिळतो. पुंडरीक आणि पुष्कर. पाढरें तें पुंडरीक. निळें तें पुष्कर अथवा इंदीवर. शिवाय त्याची आणखी एक



कमलासन बुद्ध

जात आहे; तिचा वर्ण तांबडा आहे. त्याचें नांव कोकनद. तैत्तिरीय ब्राह्मणांत


कमलमालेचा उल्लेख आहे. पंचविंश ब्राह्मणांत कमलाची उत्पत्ति नक्षत्रांच्या सामूहिक तेजांतून झाली असल्याचें आणि पुष्कर हें अश्विनीदेवांचें आवडतें पुष्प असल्याचें सांगितलें आहे. मिश्र देशांतहि एक प्राचीन कमलासना देवता आढळते, ती बहुधा आपल्या 'कमलजा' लक्ष्मीचीच भगिनी असावी. इस्लामी संस्कृति सांगते की, सातव्या अस्मानांत परमेश्वराचें सिंहासन मांडलेलें आहे आणि त्याच्या उजव्या अंगाला एक कमलपुष्प प्रफुल्लित आहे.

कमलपत्र हें कमलाइतकें सुविख्यात नाही; तरी पण तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांत त्याने स्वतःला मानाची जागा मिळवली आहे. एक उपमान या स्वरूपांत तें तिथे दाखल आहे. कमलपत्राचा असा एक विशिष्ट गुण आहे की, जळांत राहूनहि तें कोरडें असतें. अलिप्तता हें त्या गुणाचें नांव. माणसाने संसारांत राहून अशीच अलिप्तता मिळवायला हवी. राग-द्वेषादि विकारांचा लेप चित्ताला लागूं देतां कामा नये. तरच त्याची भवबंधांतून सुटका होऊं शकेल.

आणि आता त्या भगवान् बुद्धाच्या ध्यानमग्न मूर्तीकडे पाहा. विकसित कमल हेंच त्याचें आसन आहे. त्याचा पायहि खाली कमलावरच टेकलेला असतो. बौद्धांच्या दहा पारमितांपैकी 'प्रज्ञा पारमिता' ही जणूं बुद्धाची सहचारिणीच मानलेली आहे. तिच्याहि हातीं कमळच आहे आणि त्यावर एक पुस्तक आहे. बुद्ध चालूं लागला की, त्याच्या पावलागणिक कमळें उगवत, अशी त्यांची श्रद्धा आहे. महायान बौद्धांच्या स्वर्गकल्पनेंत प्रत्येक आत्मा मणिपद्मांतून खुलतो आणि पद्मवनांतच विहरतो. त्यांनीच अवलोकितेश्वर नांवाचा एक सर्वश्रेष्ठ बोधिसत्त्व मानलेला आहे. तो 'पद्मपाणि' आहे. 'ॐ मणिपद्मे हुम्' हा मंत्र त्याचाच आहे. त्यांतहि मणिकमलाचाच उच्चार होतो. तिबेटांतले बौद्ध याला भाग्याचा मंत्र समजतात आणि त्याचा जप करतात.

बौद्ध शिल्पांत राजगृह, कान्हेरी, वेरूळ इत्यादि लेण्यांतून कमल हें प्रतीक, शोभा आणि आधार, या तिन्ही दृष्टींनी खोदलेलें आहे. वेरूळ येथे एका ठिकाणीं बुद्ध एका विशाल कमलावर पाय ठेवून बसला आहे आणि त्याच कमलाच्या छत्रछायेला बसून कांही भक्त त्याची प्रार्थना करीत आहेत, असें सुंदर खोदकाम दिसतें. उदयगिरि, भारहूत, सांची येथील स्तूप कमलाशिल्पानेच नटलेले आहेत. सम्राट् अशोकहि आपल्या स्तंभांच्या मस्तकांवर उमलतें कमल ठेवून द्यायला विसरला नाही. मुसलमानी शिल्पांतहि कमळाने हळूच प्रवेश मिळविला आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिहितात—

" हिंदुस्थानांतील मुसलमानी वास्तुकलेचें विश्वमान्य उदाहरण म्हणजे ताजमहाल होय. जगांतील अन्य इस्लामी इमारतींपेक्षा ही इमारत भिन्न प्रकारची आहे. हिंदुशिल्पशास्त्राच्या सिद्धांतांचें पालन करून ही निर्मिति केली आहे. मध्ये मोठा घुमट व भोवताली लहान लहान चार घुमट पाहिल्यावर



कमलाच्या छायेंत बुद्धोपासक

पंचरत्नांची कल्पना येते. घुमटाच्या मुळाशी कमळाच्या पाकळ्या आहेत. शिखराजवळ उपडें कमळ दाखविलें आहे. "

या उपड्या कमलांतहि गर्भितार्थ आहे. अनेक हिंदुमंदिरांच्या अलंकरणांत पालथें कमळ दिसून येतें आणि त्याचा अर्थ योगशास्त्राच्या संकेतांनी उलगडतो. मानवमात्राच्या शरीरांत मूलाधार, स्वाधिष्ठान इत्यादि षट्चक्रें असून तीं पद्माकारच आहेत. प्रत्येक चक्राची वेगवेगळी देवता आहे.

ही देवता जोंवर सुप्त असते, तोंवर तें चक्र मान टाकून म्हणजे पालथें असतें आणि देवता जागृत झाली, की मग तें उभें, उताणें होतें. डॉ. आनंद-कुमार स्वामी हे भारतीय कलादर्शनाचे प्रकांड पंडित समजले जातात. त्यांना एक दिवस कोणी तरी विचारलें, ‘कोणती वस्तु काढून घेतल्याने भारतीय शिल्प आणि साहित्य सुनें आणि ओकें होईल?’ डॉक्टर महाशय तावडतोब उत्तरले, ‘कमल!’

होय. कमळ काढून घेतलें तर शारदेचा एक मोठाच अलंकार ओरबा-डून घेतल्यासारखें होईल. कमल हें सौंदर्याचें एक प्रफुल्ल उपमान म्हणून साहित्यांत परमळत आहे. कमळ नसतें तर कालिदासाने मदनसुंदर अज-राजाची दृष्टि कोणाशीं तुळली असती? कमलपत्र नसतें तर शकुंतलेने—त्या निर्व्याज वनकन्येनें दुष्यंताला ‘तव न जाने हृदयम्’ अशा व्यथित भाव-नांचें प्रेमपत्र कशावर लिहिलें असतें? कमल नसतें, तर पंडितराज जगन्ना-थाच्या मार्मिक कमलान्योक्तींना आपण मुकलोंच असतों नाही का?

“भ्रमर इव मारुतेऽस्मिन् मा सौरभलोभमम्बुजिनि मंस्थाः।
लोकानामेव मुदे महितोऽप्यात्मासुनार्थितां नितः॥”

‘हे कमलिनि! वारा तुझ्याशीं लगट करतो; पण तो भ्रमरासारखा तुझ्या सौरभाचा आपस्वार्थी नाही, हें लक्षांत ठेव. तो याचक होऊन आला असला, तरी त्याला तुझा सुगंध दिगंतांत पसरून लोकांना आनंद द्यायचा आहे.’

इथे वाऱ्याचा निःस्वार्थीपणा गौरवण्यासाठी कवीने भ्रमराला दोष लावला आहे. त्याला स्वार्थी, लोभी, म्हणून निखंदिलें आहे. पण भ्रमर कसाहि असो; तो कमलाचा वेडा आहे, हें मात्र नाकारतां येणार नाही. तो मकरंद लुटतो खरा; पण त्याचें तें लुटणें किती सदय आहे! प्रिय वस्तूला लवमात्रहि न दुखवतां त्याची ही लूट चालते.

“कमलावरी भ्रमर। पाय ठेविती हळुवार
कुचंबेल केसर। इया शंका”

अशा शब्दांत ज्ञानेश्वरांनी त्याच्याविषयी आपली कोवळीक व्यक्त केली आहे. त्यांनी महाभारतावरहि कमळाचेंच रूपक केलें आहे. महाभारत म्हणजे अठरा पाकळ्यांचें कमळ आणि गीता हा त्यांतला मकरंद आहे, असें ते सांगतात.

भर्तृहरि म्हणतो कीं कमळ नसलेलें सरोवर माझ्या हृदयाला शल्य होतें. खरें आहे. तळें आणि कमळें यांची शोभा अन्योन्याश्रय आहे.

" **पयसा कमलं कमलेन पयः । पयसा कमलेन विभाति सरः** "

पाण्यानें कमळ शोभतें. कमळानें पाणी शोभतें. आणि पाणी अन् कमळ या दोघांमुळे तळें शोभतें. दुसरा एक कवि कमळाला उद्देशून बोलतो—

' हे पुंडरीका ! लोकधात्री लक्ष्मी तुझ्यामध्ये निवास करते. जगन्मित्र सूर्याची तुझ्यावर निकराची प्रीति आहे. भ्रमर एखाद्या बंदीप्रमाणे तुझे पवाडे गातो. तुझ्याशीं कोणत्याहि अन्य पुष्पाची तुलना होऊं शकणार नाही. तूं तें तूंच ! '

कमलाचें सारें माहात्म्य वरच्या चार ओळींत येऊन गेलें.



# कलश

लग्नाचा मुहूर्त आहे. वराची मिरवणूक वधूगृहाकडे चालली आहे. पुढे वाजंत्री, त्यामागे सजवलेली मोटारगाडी, तिच्यामागे वस्त्राभरणांनी नटलेला पुरंध्रीवर्ग आणि त्यामागे पुरुषांचा समुदाय; असा त्या मिरवणुकीचा थाट आहे. मोटारींत नवरदेव मंडावळ्या बांधून विराजला आहे. त्याच्या शेजारीं एक स्त्री आहे. ती नवरदेवाची सख्खी अथवा अन्य कोणती तरी बहीण लागते. तिच्या हातांत काय आहे तें नीट पहा. एका ताम्रपात्रांत आंब्याचा टाळा आणि त्यावर नारळ असलेल्या त्या वस्तूला 'करा' म्हणतात.

तशीच ती दुसरी मिरवणूकहि पाहण्याजोगी आहे. तिच्यांत मोटारच्या जागीं वरघोडा आहे. मिरवणुकीच्या मध्यभागीं माणसांच्या मंथर गतीने तो चालतो आहे. त्याच्या पाठीवर एका नव्हे; तर दोन माणसांचें ओझें आहे. पुढे रिकिबींत पाय अडकवून बसलेला नवरदेव आणि त्याच्यामागे त्याची बहीण. तिच्याहि जवळ करा आहे. मात्र तो तिने हळदीच्या हातांत न धरतां डोक्यावर धरला आहे. डावा हात नवरदेवाच्या खांद्यावर ठेवून ती आपला तोल संभाळते आहे. नवरा मुलगा लग्नाला उभा राहिल्यावर तीहि तो करा धरून त्याच्यामागे उभी राहणार आहे.

नवरदेवाच्या या बहिणीचें त्या लग्नापुरतें नांव 'करवली' असें आहे. करा धारण करणारी म्हणून करवली. नांव कसलें; हुद्दाच तो! वधूच्या मांडवांत वरमायेच्या बरोबरीचा मान तिचा. नवऱ्यामुलाला रुखवत वाढतांना करवलीचें पान त्याच्या शेजारीं मांडायला हवें. वराकडच्या वऱ्हाड्यांत तिचा ठमकारा मोठा. तिला जीं वधूच्या आईकडून लेणीं-लुगडीं मिळतात, त्याला 'कऱ्याचा मान' अशी संज्ञा आहे. यादवराण्याच्या रुखवतप्रसंगीं सुभद्रा 'कमळांचें पाटाव' हवें म्हणून रुसून बसली आणि रुक्मिणीला तिची समजूत काढतांना नाकीं नव आले, ही गोष्ट 'रुक्मिणीसैंवरांत' नमूद आहे.

हा सगळा महिमा कऱ्याचा. करा म्हणजेच कलश. लग्नांतच नव्हे; तर

कोणत्याहि मंगल कार्यांत, पूजा-पुनस्कारांत, अथवा शांतिक-पौष्टिकांत कलशावांचून चालायचें नाही. कलश हा हवाच, आणि तो सर्वप्रथम हवा. रोजच्या देवपूजेंतहि देवाच्या आधी कलशाची पूजा करावी लागते. कार्यारंभीं विघ्नहर्त्या गणपतीची पूजा सांगितली आहे; पण त्याच्याहि आधी गंधाक्षता लागतात, त्या कलशाच्या कपाळीं.

कलश हें भारतीय संस्कृतीचें सर्व... आणि अग्रमानाचें प्रतीक आहे. कोणत्याहि महत्त्वाच्या शुभ कार्यांत प्रथम... 'पुण्याहवाचन' करतात. हें कृत्य दोन कलशांच्या साक्षीने आणि सान्निध्याने होत असतें. प्रथम रांगोळी काढून पाट मांडतात. त्यावर शेजारीं शेजारीं दोन धान्यपुंज घालतात. त्या पुंजांवर दोन कलश स्थापतात. त्यांवर कुंकवाचे पट्टे ओढतात. मग यजमान-दंपती त्यांच्यापुढे बसतात. ते कलश अग्रोदकाने भरतात. तें उदक गंधाने सुवासित करतात. मग त्या जलांत दूर्वा टाकतात. दूर्वा गणपतीलाच हव्या असें नाही, तर त्या कलशालाहि हव्या. त्या कापल्या-खुरपल्या तरी पुन्हा वाढतात. हा त्याचा स्वाभाव पाहून वंशसातत्य



कलशपूजा

च वंशविस्तार ह्या उभयविध हेतूने मंगल कार्यांत त्यांची योजना केलेली आहे.

दूर्वांनंतर पंचपल्लवांनी ते कलश शोभिवंत करतात. पिंपळ, उंबर, जांभूळ, वड आणि आंबा ह्या पांच वृक्षांचे टाळे 'पंचपल्लव' या नांवाने मांगलिकांत मान्यता पावले आहेत. यांतल्या प्रत्येक वृक्षाच्या मागे दैवी आणि शुभ संकेतांची मालिका आहे. आणि 'इष्टं धर्मेण योजयेत्' या न्यायाने कलशाशीं त्यांची औचित्यपूर्ण संगति साधलेली आहे.

पंचपल्लवांच्या मागून 'पंचरत्नें' येतात. सोनें, रुपें, मोतीं, पाच आणि प्रवाळ हीं पंचरत्नें होत. 'जो रत्नें देतो, त्याला सविता भाग्य ओपतो' असा वैदिक मंत्र आहे. पण रत्नें उपलब्ध नसतील, त्याचीहि कलशसाधना अडायची नाही. एक तांबडा पैसा त्या पांचाहि रत्नांचें प्रतिनिधित्व करूं शकतो.

पंचपल्लवांनी कलश शोभिवंत होतो आणि पंचरत्नांनी श्रीमंत होतो. अशी उभयविध 'श्री' त्याला प्राप्त होते. मग त्याला मागच्या अंगाने वस्त्रघडी टेकवतात की तो 'सुवासस्' होतो.

पण इतकें करूनहि कलश भुंडाच राहतो. त्याला समग्र शोभा प्राप्त व्हायची असेल तर, पूर्णपात्र किंवा नारळ यांपैकी एखाद्या वस्तूची गरज आहे. जेव्हा कलशावर देवतांची स्थापना करायची असते, तेव्हा त्यावर धान्याने भरलेलें ताम्हन ठेवतात आणि जेव्हा तो नुसता मांगलिक कलश असतो, तेव्हा त्याच्या मुखावर उभा नारळ ठेवून त्याची रचना पुरी करतात.

स्वस्तिकाचें चिन्ह काढतांच ज्याप्रमाणे सूर्यदेव त्यावर येऊन आसनस्थ होतो, त्याचप्रमाणे तुम्ही कलश सजवलात की, त्यावर वरुणदेव येऊन बसलाच म्हणून समजावें. जो संबंध कमल-सूर्याचा, तोच संबंध कलश-वरुणाचा. मानवाने पहिला मातीचा घडा बनवला आणि त्यांत पाणी भरलें. तें दृश्य त्याच्या दृष्टीला सुखावह वाटलें. त्याला कसली तरी अनिर्वचनीय पण मंगल अशी भावानुभूति घडली. त्याच क्षणीं त्याने प्रतीक म्हणून त्याचा आदर केला. आणि कालांतराने रसाधिपति वरुणाची त्यावर स्थापना करून त्याने त्या प्रतीकाला महनीय गौरवहि प्राप्त करून दिलें.

कलशावर अधिष्ठित होणारा हा वरुण आहे तरी कसा ! एका शब्दांत सांगायचें तर तो 'असुर' आहे. असुर म्हणजे 'सुरविरोधी' दैत्य नव्हे; तर विश्वाचा व्यापार आणि धारणा ज्या एका अद्भुत, अगम्य अशा शक्तीने होत असते, तिचा स्वामी. ही शक्ति रसमय आहे. देव, मानव, पशु आणि विश्वांतल्या यच्चयावत् वस्तु या सर्वांमध्ये हा 'रस' असतो आणि त्यायोगेच जीवमात्राची आणि वस्तुमात्राची धारणा शक्य होते. हा रस ज्या मानाने अधिक त्या मानाने त्याची जीवनशक्ति अधिक. वरुणामध्यें ही शक्ति अत्यंत मोठ्या प्रमाणांत आणि अत्यंत उत्कटपणें रसरसते, म्हणून तो असुर. याच 'असु' शक्तीच्या प्रभावाने तो अखिल विश्वावर आपलें अधिराज्य गाजवतो आणि सर्वांना या शक्तीचें प्रदानहि करतो.

हें विश्व केवढें प्रचंड ! केवढें तेजस्वी! पण तें संकुल नाही, अस्ताव्यस्त नाही. विश्वांत व्यवस्था आहे व नियमबद्धताहि आहे. कोणाच्या तरी अनुल्लंघ्य कायद्याने तें नियमित आहे. कोणी तरी एक 'महादेव' हें विश्वनियमनाचें अद्भुत कार्य करीत आहे. त्याच्याशीं या निसर्गशक्तींना आटोक्यांत ठेवण्यास

साधनीभूत असे दृढ अन् अतूट असे पाश आहेत. आणि हा ' पाशधारी ' नियन्ता दुसरा कोणी नसून वरुणच आहे. त्याने विश्वाला ' व्रत ' लावून दिलें आहे. व्रत म्हणजे नियमन, मर्यादा. ' अदब्धानि वरुणस्य व्रतानि ! ' वरुणाचीं व्रतें कोणालाहि मोडतां येत नाहीत. तो आपल्या पाशांनी विश्वशक्तींना मर्यादेंत ठेवतो आणि ती मर्यादा किंवा ' व्रत ' मोडील त्याला शासनाहि त्याच पाशांनी करतो, असें डॉ. रा. ना. दांडेकर सांगतात.

कलशावर वरुणाचें आवाहन करतांना पुढील वैदिक मंत्राचा विनियोग होतो—

" तत्त्वायामि ब्रह्मणा वंदमान
स्तदाशास्ते यजमानो हविर्भिः
अहेळमानो वरुणेहबोध्यु
रुशंस मा न आयुः प्रमोषीः "

' हे वरुणा ! तुला प्रणाम करीत करीत मी तुझ्या समीप येतों. याच कारणास्तव याग करणारा भक्त तुला आहुति अर्पून तुजपाशीं याचना करीत असतो. तर हे वरुणा, तूं न रागावतां इथे आमच्या सन्निध रहा. आमचें आयुष्य कमी करूं नको. पहा, तुझी कीर्ति चहूकडे गाजत आहे. '

आता पुढचे कलशाच्या प्रार्थनेचे श्लोक वाचा. कलश कसा पिंडब्रह्मांडाला व्यापून राहिला आहे तें त्या श्लोकांवरून कळेल.

" कलशस्य मुखे विष्णुः कंठे रुद्रः समाश्रितः
मूले तत्र स्थितो ब्रह्मा मध्ये मातृगणाः स्मृताः
कुक्षौ तु सागराः सव सप्तद्वीपा वसुंधरा
ऋग्वेदोऽथ यजुर्वेदः सामवेदो ह्यथर्वणः
अंगैश्च सहिताः सर्वे कलशं तु समाश्रिताः
अत्र गायत्री सावित्री शांतिपुष्टिकरी तथा
आयांतु मम शांत्यर्थं दुरितक्षयकारकाः
सर्वे समुद्राः सरितस्तीर्थानि जलदा नदाः
आयांतु मम शांत्यर्थं दुरितक्षयकारकाः "

ही प्रार्थना संस्कृत असली तरी तिचा अर्थ सुगम आहे. भारतीय संस्कृतीच्या आचार्यांनी या लहानशा कलशांत सर्व देव, सप्त सागर, सप्त सरिता, सप्तद्वीपा धरित्री, चार वेद, गायत्री व सावित्री, या सर्वांना आणून बसवलें आहे. कशासाठी तर शांति आणि पापक्षय यांसाठी. सर्वांना एका प्रतीकांत एकत्र आणून विरोध शमवणें, सर्वांचा समन्वय साधणें आणि बिंदूंत सिंधु पाहणें, या आर्य मनोवृत्तींचा उदार प्रत्यय या प्रार्थनेंत पाहायला मिळतो.

या पुण्याहवाचनांतच एक सुंदर प्रयोग आहे. दंपती पाटावर बसून कलश पूजतात. ब्राह्मण आशीर्वाद उच्चारतात. यजमान गुडघे टेकून उभा राहतो. दोन्ही हातांनी कलश उचलतो. तो आपल्या आणि भार्येच्या भालप्रदेशीं टेकवतो आणि तसें करतांना म्हणतो, की 'एताः सत्याः आशिषः सन्तु!' विप्रहो, तुम्ही दिलेले आशीर्वाद सत्य होवोत.

कर्मांतीं ह्याच कलशांतल्या जलाने यजमानदंपतीला अभिषेक होतो. ह्या अभिषेक-मंत्रांत आपोदेवींची प्रार्थना असते—

'ज्या उदकधारा आकाशांतून गळतात, ज्या भूमि खोदली असतां वर उफाळतात, किंवा ज्या आपोआप उत्पन्न होतात आणि स्वतः स्वच्छ राहून इतरांना पवित्र करीत सागराला मिळतात, त्या सर्व आपोदेवी माझें रक्षण करोत. जगताचा राजा वरुण हा ज्यांच्या अंतर्भागीं राहून भूतलावरच्या लोकांचीं खरीं-खोटीं कृत्यें अवलोकन करीत फिरतो, ज्या मधुर रसाचा स्राव करतात, त्या आपोदेवी माझें रक्षण करोत... '

कलश जरा मोठा केला की तो घट होतो. नवरात्रांत बसतो, तो देवीचा घटच. संक्रांतीला सुवासिनी सुगड देतात, तोहि घटदानाचाच प्रकार. अक्षय्य तृतीयेस पितरांच्या उद्देशाने आमान्न (शिधा) सहित कलशदानच सांगितलें आहे. मत्स्यपुराणांत अनेक महादानें सांगितलीं आहेत, त्यांत एक 'महाभूत घटदान' उक्त आहे. 'हिरण्यगर्भदान' आहे तेंहि कलशाच्याच आधाराने. याचा मत्स्यपुराणांतला विधि पुढीलप्रमाणे आहे—

शुभ दिनीं एक मोठा सुवर्णकलश करावा. तो दुधातुपाने भरावा. तिळांच्या राशीवर ठेवावा. मग यजमानाने मंगलस्नान करून त्या कलशांत उत्तराभिमुख बसावें. ब्रम्ह्याची प्रतिमा मुठींत धरावी. ही प्रतिमा हाच हिरण्यगर्भ. ब्राह्मणांनी त्या हिरण्यगर्भाचे सर्व संस्कार करावे. मग यजमानाने

कलशांतून बाहेर येऊन ती मूर्ति आचार्याला दान द्यावी आणि ऋत्विजांनी अन्य कलशांतल्या जलाने यजमानास अभिषेक करावा.



मंदिराचा कळस

वास्तुकलेंतहि कलश आहे आणि तो 'सर्वोपरि विराजते !' ह्यालाच आपण कळस म्हणतों. मंदिर म्हटलें कीं त्याला कळस हा हवाच. कळस उभारला की मंदिररचना पूर्ण होते. 'कलहान्तानि हर्म्याणि' म्हणतात, त्याप्रमाणे 'कलशान्तं च मंदिरम्' असें नवें सुभाषित रचायला हरकत नाही. कुटुंबाचा शेवट कलहांत तसा मंदिराचा शेवट कळसांत, असा त्याचा अर्थ होईल. एखादा मंदि-

राच्या शिखराकडे तुम्ही पाहिलेंत, तर वाटोळा कलश, त्यावर पल्लव आणि त्यावर शेंडी उभी करून नारळ, अशीच रचना तुम्हांला दिसेल. ज्ञानेश्वरांनी भगवद्गीतेला मंदिर म्हटलें असून तिच्या शेवटच्या अध्यायाला 'कलशाध्याय' म्हटलें आहे.

ज्या वेळीं जलाच्या ऐवजी कलशाचा दीपज्योतीशीं संबंध येतो, तेव्हा त्याची शोभा कांही आगळीच बनते. घटांत दिवा म्हणजे हृदयांत प्रकाशित आत्मा. तुकोबांनी जातां जातां त्याविषयी एक सुंदर चरण बोलून टाकला.

'सांडिली त्रिपुटी । दीप उजळला घटीं'

नवरात्रांचा घट बसला की इकडे गुर्जरनारींचा 'गरबो' सजतो. गरबो म्हणजे तरी कलशच. मात्र तो सजल नव्हे; तर सतेज ! त्याच्या अंतर्भागीं पाण्याऐवजी धाकुटी दीपकळी तेवत असते. त्या गरब्याभोवती चांदण्या रात्रीं गुजरिणी फेर धरून गातात, नाचतात. कांहीजणी दिवसा गरबो डोक्यावर घेऊन बिदागी मागण्यासाठीहि घरोघर हिंडतात.



दीपकलश

उत्तर प्रदेशांतलें 'चरकला' आणि पंजाबमधील 'जागो' हीं दोन लोकनृत्यें म्हणजे घट-नृत्येंच होत. जागो नृत्य हें विवाह-मंगलाचें नृत्य आहे. त्यासाठी एक घडा रंगवून, माळा घालून सजवतात. त्याचें मुख कणकेने लिपून बंद करतात. त्यावर पांच दीपज्योती पाजळून ठेवतात. मग तो कलश वरपक्षांतल्या एका सुवासिनीच्या डोक्यावर देतात आणि मग तिला मधे उभी करून वधूपक्षांतल्या आयाबाया तिच्या भोवती फेर धरतात आणि गाणीं म्हणतात.

महाभूतघटदान, हिरण्यगर्भदान, अभिषेक, जलकलश, दीपकलश इत्यादि सगळ्या विधानांचें परिशीलन केल्यास कलश हे कशाचें प्रतीक आहे तें कळूं शकतें. तें मानवशरीराचें प्रतीक आहे.

कलश हा नेहमीच धान्यपुंजावर स्थापतात. त्यावरून अन्न हे मानवदेहाचें आधारभूत तत्त्व आहे हें सूचित होतें. 'अन्नमय प्राण आणि प्राणमय पराक्रम' अशी म्हणच आहे मुळी. 'अन्नं प्राणमन्नमपानमाहुः' या श्रुतीचाच अनुवाद ही म्हण करते. कलश म्हणजे जीवनरूपी जलाचें आणि प्राणरूपी ज्योतीचें धारण करणारा सुघटित देह होय. सकल संतांनी देहाला घट म्हणूनच निर्देशिलें आहे.

शरीर पवित्र आहे, सुंदर आहे, दर्शनीय आहे. पण कुठवर? जोवर त्या घटांत जीवनरूपी जल आणि प्राणात्मक ज्योत आहे तोंवर. निष्प्राण शरीर म्हणजे मूर्तिहीन मंदिर! अभद्र, अमंगल! आत्मराजाचा वियोग झाला की घट फुटला. मानव शरीरांतलें अर्चनीय तत्त्व म्हणजे प्राण. तो जोंवर उल्लासतो, तोंवर शरीररूपी घट हा सर्वसुंदर आणि सर्वमंगल! ब्राह्मण ग्रंथांत प्राणाला 'अर्क' अशी संज्ञा दिलेली आहे. अर्क म्हणजे पूजनीय. प्राण हा स्वतः पूजनीय असून आपल्या अधिष्ठानालाहि पूजनीय बनवतो. 'न मानुषाच्छ्रेष्ठतरं लोके किंचन विद्यते' असें व्यासमहर्षींनी म्हटलें तें याच अर्थाने.

आणि तो मंदिरावर झळकणारा कळस! तो उंच होऊन जगाला इतिकर्तव्यतेचा संदेश देत राहिला आहे. 'देहाचें राऊळ बनवा. त्यांत आत्मरूपी विठ्ठलाला ओळखा आणि जीवनांतल्या कृतार्थतेचा 'कलशाध्याय' लिहूनच तुमच्या जीवनग्रंथाची परिसमाप्ति करा!'




# धर्मचक्र

देवानां प्रियदर्शी अशोक हा भारताच्या भूमीवर गाजलेला एक महान् सम्राट् होय. सम्राट्पदवी हें त्याचें वैशिष्ट्य नव्हे; तर तो उदारहृदयी आणि परमकारुणिक होता, हें त्याचें वैशिष्ट्य! बौद्ध धर्म आणि बौद्ध संघ यांच्याशीं त्याचा जिवाभावाचा संबंध आहे. त्याने बौद्धदीक्षा घेतल्यानंतरच बुद्धाचा धर्म भारताच्या सीमा ओलांडून विश्व व्यापण्याच्या मार्गाला लागला. मानवाच्या हृदयांत नैतिक भावनेची प्रतिष्ठा करणें, हेंच बौद्ध धर्माचें इंगित आहे, असें अशोकानें मानलें आणि त्याच एका महान् कार्यासाठी आपलें मोलाचें जिणें समर्पिलें. संतपण आणि राजेपण ह्या दोन सदैव दूर राहणाऱ्या प्रवृत्तींचा दुग्ध-शर्करासंगम भारताच्या इतिहासांत सर्वप्रथम त्याच्याच चरित्रांत आढळतो.

अशोक जन्मल्याला आणि निवर्तल्यालाहि दोन हजार वर्षें होऊन गेलीं. पण त्याने आपली पुण्यस्मृति, भारताच्या विविध प्रदेशांतल्या पहाडांवर आणि शिलापट्टांवर कोरून ठेवली आहे. त्यांतहि अशोकाचें महत्त्वपूर्ण स्मारक म्हणजे त्याने निर्मिलेले शिलास्तंभ. याच शिलास्तंभांपैकी एका स्तंभाचा शिरोभाग भारताने आपल्या सार्वभौम, स्वतंत्र अशा संघराज्याचें प्रतीक म्हणून स्वीकृत केला आहे. निसर्गाच्या चक्रनेमिक्रमांत कोणत्या वस्तूला केव्हा अन् कशी ऊर्जितदशा येईल, तें सांगतां येत नाही हेंच खरें! हा सचक्र सिंह-स्तंभ भग्नावस्थेंत सारनाथच्या धुळींत शतकानुशतकें लोळत पडला होता. पुढे त्याला तिथल्या वस्तुसंग्रहालयांत औट हांत जागा मिळाली. उघड्यावर होता तो निवाऱ्याला आला. पण यापरतें त्याचें दैव पालटलें नाही. पुढे भारत स्वतंत्र झाला. त्याने आपल्या संघराज्याची घटना तयार केली. त्या वेळीं भारताच्या ह्या सार्वभौमत्वाचें प्रतीक काय असावें, ह्याची विवंचना सुरू झाली. आणि त्या विचारमंथनांत ह्याचें भाग्य एकदम उजळलें. तो अशोकनिर्मित सचक्र सिंहस्तंभ सर्वानुमतें भारतीय संघराज्याचें प्रतीक बनला आणि सर्व-पूज्य झाला. त्याच्या खाली नव्याने आलें तें फक्त 'सत्यमेव जयते' हें श्रुतींतलें ब्रीदवाक्य!

या अशोकस्तंभाच्या मस्तकावर चार सिंह चार दिशांना सन्मुख होऊन एकमेकांना चिकटून राहिले आहेत. त्याखाली घरटाच्या आकाराच्या वर्तुळभागावर चार चक्रें कोरलेलीं आहेत. तीं चारी सिंहांना जणू आधाररूप आहेत. चक्रांच्या मधल्या जागेंत सिंह, हत्ती, बैल आणि घोडा असे चार पशू आहेत. चक्र जसें गतिमान् तसेच ते पशूहि गतिमान् आहेत. प्रत्येक चक्रांला चोव्वीस आरे आहेत, ते दिव्य ज्ञानाच्या चोवीस श्रेणींचे निदर्शक आहेत. बौद्धांच्या समजुतीप्रमाणे तें ज्ञानचक्र आहे. पण अशोकाने मात्र त्याला 'धर्मचक्र' म्हटलें आहे. कारण अशोक हा सर्व विजयांत धर्मविजयाला श्रेष्ठत्व देतो आणि लोकसेवा अन् लोककल्याण ह्या उभयांत सकल धर्मांचें रहस्य पाहतो.



भारतीय संघराज्याचें चिन्ह

भगवान् बुद्धाला नेरंजरा नदीच्या काठीं संबोधि प्राप्त झाल्यावर चार आठवडे तो त्या बोधिवृक्षाच्या तळींच बसून राहिला. पुढे ब्रह्मा आणि इंद्र त्या ठिकाणीं प्रकट झाले आणि त्यांनी बुद्धाला प्रार्थिलें. 'भगवन्, मानवमात्राला दुःखमुक्त करणारें जें ज्ञान आपण मिळविलेंत, त्याचा अखिल विश्वांत प्रसार करावा.'

तदनुसार बुद्ध आपल्या धर्मप्रसारासाठी तेथून बाहेर पडला. सारनाथ येथे 'मृगदाव' वनांत त्याने आपल्या शिष्यांपुढे पहिलें धर्मप्रवचन केलें. या घटनेला बौद्ध साहित्यांत 'धर्मचक्रप्रवर्तन' असें महनीय नामाभिधान प्राप्त झाले आहे. हेंच 'धर्मचक्र' अखंड गतिमान् राहावें म्हणून देवानां प्रियदर्शी अशोकाने भगीरथ प्रयत्न केले आणि आपल्या अनेक शिलास्तंभांवर चक्रचिन्हें कोरून पुढिलांनाहि त्या कर्तव्याची जाणीव देऊन ठेविली.

वर वर्णिलें तें सारनाथचें धर्मचक्र. सांची येथील बौद्ध शिल्पांतहि असेंच एक चक्र आहे, पण त्याची मांडावळ मात्र वेगळी आहे. तें सिंहाच्या पदतळीं नसून त्यांच्या शिरोभागीं एका अलंकृत पाषाणाच्या धुरेवर लंबरूपानें स्थित आहे. त्याच्या आंसाचा बिंदु, आरे आणि तुंबा, हीं सर्व अंगें कशीं सुश्लिष्ट आहेत. त्यांचा आकार आणि त्यांची भव्यता हीं त्या विशाल स्तंभाला साजेशींच आहेत. चक्राच्या स्थितींचा आणखीहि एक प्रकार आढळतो. पण त्यासाठी होयसळ शिल्पाचें अवलोकन करायला हवें. बाराव्या शतकांत होयसळ यादवांच्या कारकीर्दींत भारतीय शिल्पकलेनें जो एक नवा भव्य आविष्कार दाखविला, तो आजहि त्रिकूटाचल मंदिरांच्या रूपांत पाहतां येतो. त्यांपैकीं बेलूर येथील एका मंदिराच्या महाद्वारावर एक महाकाय सिंह कोरलेला आहे आणि वर उल्लेखलेलें चक्र त्याच्या पाठीवर स्वार झालें आहे. म्हणजे सिंहाच्या पंजाखालीं, सिंहाच्या मस्तकावर आणि सिंहाच्या पाठीवर, अशी या चक्राची 'त्रेधा' स्थिति भारतीय शिल्पकार दाखवितात.

चक्राला गति देणें ही गोष्ट ज्ञान-बलसंपन्न माणसाला करतां येईल. पण गतिमान् झालेल्या चक्राला रोधून धरणें किंवा मागे हटवणें, हें देवांनाहि अशक्य आहे. बुद्धानें धर्मचक्र प्रवर्तित केलें आणि तें मार्गस्थ झालें. आता साक्षात् बुद्धहि त्याला रोधूं शकणार नाही, अशी बौद्धांची समजूत आहे. तें स्वतःच्या गतीनें धावेल, थबकेल वा वळण घेईल, तें खरें. भागवत पुराणांतील दुर्वासाची कथाहि हाच आशय व्यक्त करते—

अंबरीषासारख्या परमभागवताला छळण्याचा कुडा हेतु मनांत धरून दुर्वास अतिथीच्या रूपानें त्याच्याकडे आला. बरें, आला तर ठीक. त्यानें अंबरीषाच्या पंक्तीस बसून त्याच्या साधन द्वादशीचें पारणें करावें की नाही! गृहस्थाला नीतिधर्म असतो, तसा तो अतिथीलाहि असायला नको का? पण दुर्वास यजमानाच्या व्रतनियमांची कदर न करतां नदीवर आपलेंच आन्हिक लांबवीत बसला. बिचाऱ्या अंबरीषापुढे पेचप्रसंग. 'खाल्लें तर बाधतें; टाकलें तर श्रापतें.' शेवटीं त्यानें तोड काढली ती ही कीं, 'विष्णुपादोदकं तीर्थम्' घेऊन उपवास सोडल्यासारखें करावें. पण तेंहि त्या कोपिष्ठ मुनीला सहन झालें नाही. त्यानें अंबरीषाला शाप दिला कीं 'तुला दहा जन्म घ्यावे लागतील!' परतु आपल्या एकान्तभक्ताची ही अकारण हेळणा—छळणा

श्रीविष्णूला मानवली नाही. त्याने सुदर्शन चक्र सोडलें. तें लागलें दुर्वासाच्या पाठीं. दुर्वास पळत सुटला. त्रिभुवन हिंडला; पण चक्र कांही मागचें सुटेना. शेवटीं वैकुंठांत जाऊन त्यानें विष्णूपुढे लोटांगण घातलें. 'देवा, हैराण झालों, चुकलों. हें तुझं सुदर्शन चक्र आवर.' देव म्हणाला, 'तें माझ्या हातीं नाही. मी त्या कामीं असमर्थ आहें.' पुढे जेव्हा अंबरीषालाच तो शरण गेला, तेव्हा त्याच्या प्रार्थनेने तें चक्र दूर झालें.

ही कथा भक्ताचें माहात्म्य तर वाढवतेच; पण त्याहीपेक्षा चक्राचें स्वतंत्र सामर्थ्य अधिक विशद करते. सुदर्शन चक्र हें विष्णूच्या हातांतलें एक आयुध आहे. आणि विष्णु कोण ? तर त्रिभुवनव्यापी सूर्यच !

"त्रीणि पदा विचक्रमे । त्रेधा निदधे पदम्"

ही श्रुति विष्णूचें सौर स्वरूपच व्यक्त करते.


चक्र म्हणजे एक सपाट गोल वस्तु. प्राचीन काळीं सूर्य ही एक आकाशांतील सपाट गोल चकती आहे, असें मानीत. सूर्याच्या रथाला सात घोडे पण चक्र मात्र एकच. सूर्यमंडल हेंच तें चक्र आणि त्यावर आरूढ होऊन त्रिभुवन व्यापणारी देवता वेगळी; पण अदृश्य.

"एकचक्रो रथो यस्य दिव्यः कनकभूषितः
स मे भवतु सुप्रीतः पद्महस्तो दिवाकरः"

सूर्य जसा गोल आहे, तसाच तो तेजःपुंज आहे. त्याच्यांतून अग्निज्वाळाहि निघतात. त्याने जर बाराहि डोळे उघडले, तर जगाची राख व्हायला वेळ नको. इतर वेळीं विश्वपोषक असलेला सूर्यनारायण प्रलयकालीं रुद्र अन् संहारक होतो. हें दर्शित करण्यासाठीच प्रलयतांडव करणाऱ्या रुद्राच्या मुखाभोवती अग्निज्वालांचें चक्र दाखवलेलें असतें. विष्णूच्या मुखाभोवती तर नेहमीच प्रकाशवलय असतें. एतावता चक्र हें सूर्यप्रतीक म्हणूनच प्रसिद्ध आहे.

वैदिक आर्य यज्ञसमारंभांत सूर्यप्रतिनिधि म्हणूनच त्याचा उपयोग करीत. सौरचक्र आणि वाहनचक्र यांचा संबंध दाखवणारा एक विधि ब्राह्मणग्रंथांत आढळतो. त्या प्रसंगीं रथचक्र फिरवतांना मंत्र म्हणायचा तो सूर्याचाच असतो. ऋग्वेदांत सूर्याच्या सोनेरी चक्राला आज्ञा देणाऱ्या देवाची

प्रार्थना आहे. शिवाय, विश्वाचें अस्तित्व ज्यावर अवलंबून आहे आणि ज्याला कोणी रोखूं शकत नाहीं, अशा 'दिव्य' चक्राचाहि गौरव आहे.



सिंहमस्तकावर चक्र

कालचक्र म्हणतात, तें हेंच ! दीर्घतमा ऋषीने पहिल्याप्रथम या कालचक्राचा साक्षात्कार अनुभवला आणि कांहीशा अद्‌भुत संभ्रमाने त्याचा वाचिक आविष्कार केला—

" द्वादशारं न हि तज्जराय
वर्वर्ति चक्रं परियामृतस्य "

हें बारा आऱ्यांचें दिव्य चक्र कधीहि न झिजतां आकाशमंडलात निरंतर भ्रमण करीत असतें, असा याचा अर्थ आहे.

पृथ्वी चक्राकार भ्रमत आहे. सूर्यनारायण आपल्या नवग्रहांच्या गोतावळयासह आकाश गंगेच्या चक्रांत सापडला आहे. आकाश-गंगा हेंहि एक चक्रच आहे आणि तेंहि एकुलतें नसून अनेकांतलें एक आहे. सूर्य हा चक्राकार फिरतो आणि कालचक्र निर्माण करतो. कल्पामागून कल्प येतात. मन्वंतरांपुढे मन्वंतरें चालू राहतात. प्रभवापासून सुरू झालेलें संवत्सरचक्र क्षयनाम संवत्सरापर्यंत येऊन पुनश्च प्रभवाला भिडतें अन् नवें चक्र सुरू करतें. फाल्गुन चैत्राशीं हातमिळवणी करतो आणि मासचक्र चालू राहतें. शिशिर वसंताला आलिंगन देऊन ऋतुचक्र अबाधित ठेवतो. दिवस रात्रीला स्पर्श करतो अन् रात्र दिवसाला

पालव लावते आणि मोठ्या चक्रांतलीं लहान चक्रें फिरत राहतात. ज्ञानेश्वर हा फेरा पुढील शब्दांत सांगतात—

" संहारवातें प्रचंडें । पडती प्रळयांतींचीं सालडें ।
तंव कल्पादींचीं जुंबाडें । पाल्हेजती ॥
कलियुगांतीं कोरडीं । चहूं युगांचीं सालें सांडी ।
तंव कृतयुगाची पेली देव्हडी । पडे पुढती "

महाभारताच्या आदिपर्वांत याच कालचक्राचा उल्लेख एका मजेदार रीतीने आला आहे. उत्तंकाने गुरुपत्नीसाठी मिळविलेली कुंडलें तक्षकाने पळवलीं, तेव्हा उत्तंक त्याचा पाठलाग करीत पाताळांत प्रवेशला. तिथे त्याला अनेक आश्चर्यें दिसलीं. त्यांतलें एक म्हणजे फिरतें चक्र. त्याला तीनशें साठ आरे होते आणि चोवीस पुठ्यांचें त्यांना बंधन होतें. सहा कुमार तें चक्र फिरवीत राहिले होते. तिथून परत आल्यावर त्याच्या गुरूने त्याला त्या चक्राचें स्पष्टीकरण दिलें तें असें –

" तें चक्र म्हणजे वर्षचक्र. त्याचे तीनशे साठ आरे म्हणजे वर्षाचे तीनशेसाठ दिवस. त्याचे चोवीस पुठ्ठे म्हणजे वर्षाचे तेवढे शुक्ल-कृष्ण पक्ष. आणि तें सदैव फिरतें ठेवणारे सहा कुमार म्हणजे वसंतादि षड्ऋतू होत. "

पुढे हें चक्र धर्मकारणांतून राजकारणांत शिरलें. अनेक राजांना प्रतापाने जिंकून सार्वभौम झालेल्या राजेश्वराला 'चक्रवर्ती' म्हणूं लागले. सामंत चक्रांत वास्तव्य करणारा तो चक्रवर्ती. त्या दृष्टीने हें नांव अन्वर्थक आणि गौरवान्वित आहे. पण तेवढ्यावर राजनीतिज्ञांचें समाधान झालें नाही. त्यांनी चक्रवर्तीला विष्णूचा अंश मानलें, 'ना विष्णुः पृथिवीपतिः' म्हटलें आणि त्याचा प्रत्यक्ष चक्राशीं संबंध जोडला. चक्रवर्तीजवळ चक्र असलेंच पाहिजे, असें ठरलें. अन् हें चक्र तरी कसलें ? सुताराने बनविलेलें नव्हे; तर समुद्र-मंथनांतून वर आलेलें. देव-दैत्यांनी समुद्र-मंथन केलें तेव्हा त्यांतून जीं सात रत्नें पृष्ठभागावर आलीं, त्यांतलें पहिलें रत्न सर्वशक्तिमान्, दिव्य-चक्र. हें चक्र धरून इतरहि सहा रत्नें सार्वभौम नृपतीकडे असायला हवीं आणि असतातच, असें बौद्ध वाङ्मयांत प्रतिपादिलें आहे. भगवान् बुद्धाच्या पदतलावर चक्र असल्यामुळेच तो देव झाला आणि सर्वजनपूज्य ठरला, अशी त्याच्या शिष्य-प्रशिष्यांची धारणा आहे.

चक्रवर्ती कसा होतो त्याविषयी बौद्ध वाङ्मयांत पुढील आख्यायिक आढळते—

राजा चक्रवर्तिपदाची महत्त्वाकांक्षा बाळगतो. त्या दृष्टीने चतुरंगदलाची सिध्दता करतो. पौर्णिमेच्या रात्रीं शुचिर्भूत होऊन राजवाड्याच्या सौधतलावर जातो. चंद्रोदयाची वेळ असते. सोळा कलांचें पूर्ण चंद्रबिंब वर येत असतें. राजा त्याला सन्मुख होऊन उभा राहतो. एवढ्यांत त्याला समोर एक चक्र दिसतें. 'प्रसादचिन्हानि पुरःफलानि' असें तें दर्शन असतें. राजा त्याच्यावर जलप्रोक्षण करून त्याला आदेश देतो.


“ जिंकीत जिंकीत पुढे जा ! ”

चक्र पूर्वदिशा धरून धावूं लागतें. राजा दळभारासह त्याचा मागोवा घेतो. त्या विजययात्रेंत मार्गांतले राजे एकामागून एक पराभूत होतात आणि करभार देऊन माथा नमवतात. होतां होतां पूर्व दिशा संपते. पुढे लागतो अनंत, अपार सागर. तें चक्र त्या सागरांत बुडतें अन् पुनश्च वर येऊन दक्षिण दिशेचा मार्ग धरतें. पुढे पश्चिम अन् त्यानंतर उत्तर. राजा चारी दिशांचा दिग्विजय करतो. त्याची महत्त्वाकांक्षा पूर्ण होते. तो 'चक्रवर्ती' होतो. मग तें चक्र राजधानीला परत येतें आणि राजप्रासादाच्या महाद्वारांत स्थिर होतें. चक्रवर्तीचा मृत्युकाल समीप आला की तें आडवें पडतें. तो निवर्तला कीं अदृश्य होतें. पुढे त्याचा वारस सिंहासनावर बसला आणि तो जर राजधर्माला जागणारा असला, तर तेंच चक्र पुनश्च महाद्वारांत प्रकट होतें.

सूर्य कालचक्राला गति देतो. श्रीविष्णु विश्वचक्र चालवतो. भगवान् बुद्ध धर्मचक्राचें प्रवर्तन करतो. हे तिघेहि चक्रचालक आहेत. तेव्हा चक्र फिरवणें म्हणजे बुद्धाचें, देवाचें कार्य करणें, अशी कल्पना बौद्धांच्या मनांत ठाम बसली. ते मग वाच्यार्थानेच चक्र फिरवूं लागले. आणि बौद्धविहारांच्या चालकांनी त्यांची तशी सोयहि करून दिली.

या चक्रांना 'प्रार्थनाचक्रें' अशी संज्ञा आहे. तिबेटांतल्या लामांच्या विहारांपुढे अशीं लहानमोठी चक्रें कायमची बसवून ठेवलेलीं आहेत. एखाद्या बौद्ध भक्ताने यावें आणि प्रार्थनेचा मंत्र लिहिलेला कागद त्या चक्रावर ठेवून त्याला गति द्यावी आणि जितक्या वेळां तें फिरेल तितका जप झाल्याचें समाधान मानावें. यांतलीं कांही चक्रें कोणालाहि सहज फिरवतां येतील इतकीं लहान आणि हलकीं असतात तर कांही अवाढव्य असतात. तीं फिरवायला अने-

कांचे समर्थ हात लागावे लागतात. एका काळीं हिमालयांत हीं भव्य प्रार्थना चक्रें एखाद्या जलप्रपाताखालीच बसविलेलीं असत आणि तीं पाण्याच्या जोरावर पाणचक्कीप्रमाणे सदैव फिरत राहत. बुद्धाचें धर्मचक्रप्रवर्तन जणूं अखंड चालू राहिलें आहे !



सिंहपृष्ठावर चक्र

ही प्रार्थनाचक्रांची कल्पना अभिनव असली तरी ती कांही बौद्धांनीच शोधून काढलेली नाही. फार पुरातन कल्पना आहे ती. प्राचीन काळीं बाबिलोनमध्ये अशीं चक्रें वापरीत असल्याचा दाखला मिळतो. इजिप्तमधल्या मंदिरांतून सनपूर्व तिसऱ्या शतकांत त्यांचें अस्तित्व आढळतें. इतकेंच नव्हे; तर अगदी अलीकडच्या काळापर्यंत युरोपमधील चर्चेसमधून प्रार्थनेचा एक प्रकार म्हणून अशा चक्रांचा विनियोग होत असे.



अनुक्रम ........ दि: ................

जैनांचें सिद्धचक्र प्रसिद्ध आहे. तांत्रिकांचें श्रीचक्रहि विख्यात आहे. म. गांधींनी भर देऊन चालू केलेलें चरख्याचें चक्र म्हणजे विसाव्या शतकांतलें नवें धर्मचक्रप्रवर्तनच मानलें जातें. कांहीं राजकीय पंथांनीहि तें आपलें प्रतीक बनविलेलें आढळतें. शाश्वत गति आणि संरक्षण हीं दोन तत्त्वें चक्रांतून सूचित होतात. चक्राचा वर्तुळाकार कधीहि न संपणारी परंपरा दाखवितो. त्याचा जो संपूर्ण वेढा आहे त्यावरून संरक्षणाची कल्पना निघाली. ह्या कल्पनेला जादूटोणा आणि भूतविद्या ह्यांत फार महत्त्व मिळालें. जन्म, मृत्यु आणि इतर कांहीं प्रसंगीं भस्म, चुना इत्यादि साधनांनी वर्तुळें काढण्याची प्रथा आहे. त्याः वेळीं जो मंत्र म्हटला जातो, त्यांत हा संरक्षणाचा हेतु स्पष्ट दिसतो.

"यथा चक्रधरो विष्णुस्त्रैलोक्यं परिरक्षति
एवं मंडलभस्मांकं सर्वभूतानि रक्षतु"

स्त्रीजातीच्या हातांत पहिलें कांकण चढलें तें दुष्ट अन् भूतबाधा यांपासून तिच्या कोमल तनुलतेचें संरक्षण व्हावें म्हणूनच. सौंदर्याची दृष्टि ही त्यानंतरची. आईबाप लहान बालकांच्या हातांत कडीं अन् पायांत वाळे घालूं लागले तेहि याच हेतूने. स्त्रीच्या असो, अथवा पुरुषाच्या असो, बोटांत आंगठी चढली त्याचेंहि कारण तेंच. जादूच्या आंगठीच्या लोककथा साऱ्या जगभर पसरलेल्या आहेत. भवचक्रांतून मुक्त व्हायचें असेल, तर सुवर्णचक्र करावें आणि त्यावर विष्णुमूर्ति बसवून तें दान द्यावें, असें मत्स्य-पुराणांत सांगून ठेवलें आहे. चक्रप्रतीकावरचा लोकविश्वास हाच त्या विधी-च्या मुळाशीं स्पष्ट दिसतो.

असें आहे हें चक्र! ह्या प्रवर्तित चक्राचें अनुवर्तन करावें, असा भगवान् श्रीकृष्णाचा आदेश आहे. पण हा आदेश मानवाने भगवंताच्या इच्छे-प्रमाणे पाळला नाही. त्याने वैयक्तिक, जातीय आणि राष्ट्रीय स्वार्थासाठी कधीं त्याला रोखलें, कधीं वांकडें वळण लावलें, तर कधीं उलट्या गतीने फिर-वण्याचाहि उपद्व्याप केला. त्यामुळे जगांत आक्रंदनें आणि हाहाकार माजले. अश्रूंचे पाट अन् रक्ताच्या नद्या वाहिल्या. माणूसच माणसाचा काळ ठरला. त्याने रक्ताचें पाणी शिंपून संस्कृति उभारल्या आणि आपल्याच अविवेकी हाताने त्या धुळीसहि मिळवल्या. हिंसा, द्वेष, तिरस्कार, जुलूम, या मार्गांने विश्वचक्राला गति दिली. भारताच्या घरांतहि ह्या सर्व देवी जेवल्या आहेत.

पण आजचा स्वतंत्र भारत सत्याच्या आणि श्रेयाच्या दिशेने या विश्वचक्राला गति देऊं पाहात आहे. ‘ विश्व हें मोहरे लावावें ’ ही व्यापक शुभकामना त्याने उराशीं बाळगली आहे. त्यासाठीं ह्या धर्मचक्राला पंच-शीलांचे पांच आरे भारतांत पुनश्च नव्याने बसवले जात आहेत. हें पांच आऱ्यांचें चक्र जर सहयोगाच्या सामर्थ्याने फिरवलें गेलें, तर त्यांत जगाचें परम मंगल साधणार आहे. वेदाने म्हटलें आहे—

“पांच आरे बसवलेल्या ह्या चक्रावर सर्व भुवनें अधिष्ठित झाले आहेत!”



# बोधिवृक्ष

इसवी सनाच्या सातव्या शतकांतलें एक महान् आश्चर्य म्हणजे एका श्रद्धासागर धर्माचार्याचें भारतांत आगमन. त्यांचें नांव ह्युएनत्संग. हा चिनी बौद्ध होता. भारतांत येऊन बुद्धभूमीचें दर्शन घ्यावें आणि इथल्या ग्रंथसंपदेच्या आधारें बौद्ध तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास करावा, या अनावर ओढीने त्याने भारताचें महाप्रस्थान ठेवलें. वैराण वाळवंट, घनदाट जंगलें, दुर्गम पहाड आणि अनेक जिवावरचे प्रसंग पार करून हजारो मैलांची भूमि पायांनी तुडवीत, तो भारतांत पोचला. या अति दीर्घ प्रवासांत बुद्धाची करुणा हीच काय ती त्याची सोबतीण होती.

भारतांत प्रवेश केल्यावर अनेक बौद्ध क्षेत्रांचें दर्शन घेत घेत तो बुद्ध-गयेला आला. बुद्धगया म्हणजे गौतमाची विहारभूमि आणि त्याच्या ज्ञान-गंगेची–संबोधीची गंगोत्री. बौद्ध संस्कृतीचें आदिपीठ. ह्युएनत्संगाला त्याच्या दर्शनाने जणूं निर्वाणच लाभलें. ज्याच्या तळीं गौतमाला बुद्धत्व प्राप्त झालें, तो बोधिवृक्षहि तिथे उभा होता आणि सळसळत होता. ह्युएनत्संगाने बुद्ध-भावनेनेच त्याचें दर्शन घेतलें. तो आपल्या प्रवासवृत्तांत लिहितो—

"या अश्वत्थ वृक्षाचीं पानें उन्हाळ्यांत अन् हिवाळ्यांतहि झडत नाहीत. फक्त जेव्हा बुद्धाच्या निर्वाणप्राप्तीचा वर्षदिन उगवतो, त्या दिवशी ती झडतात. पण दुसऱ्याच दिवशीं त्याला नवी सुंदर पालवी फुटते. तो पुनश्च पर्ण-संभाराने डोलूं लागतो. प्रत्येक वर्षदिनाच्या मंगलप्रसंगीं राजे, महाराजे इथे जमतात. या वृक्षाच्या तळीं एकत्र होतात. त्याच्यावर दुधाचा अभिषेक करतात. त्याला फुलें वाहतात. त्याच्यापुढे दीपज्योति पाजळतात. त्याचा महोत्सव करतात. आणि परत जातांना त्याचीं कांही पानें प्रसाद म्हणून बरोबर नेतात. सम्राट् अशोकाने बुद्धगयेला भेट दिली, तेव्हा या वृक्षाचें रक्षण व्हावें म्हणून त्याच्या भोवती विटांचा पार बांधला—"

हा पवित्र ज्ञानवृक्ष आजहि बुद्धगयेंत आहे. अजूनहि दरवर्षी त्याची

कोवळी आरक्त पालवी लुसलुसते. अजूनहि त्याच्या पानांची सळसळ ऐकू येते. अजूनहि नेरंजरा नदीच्या पात्रावरून येणारा वारा त्याच्या कुशींत शिरून शाखांशीं अवखळपणा करतो. आजचें बुद्धगयेचें मंदिर याच वृक्षाच्या लगत्याने उभारलेलें आहे. दरवर्षी हजारो बौद्ध आणि हिंदुसुद्धा या स्थानाच्या दर्शना-साठी इथे येतात. इथल्या वातावरणांत शतकानुशतकें गुंजत राहिलेला बुद्धाचा धर्मसंदेश वायुलहरींच्या रूपाने तिथे जाणाऱ्या भाविकांच्या कानाशीं लागतो.

बुद्धगयेचें त्यापूर्वीचें नांव उरुवेला. इथे येऊन या वृक्षाखाली निकराचें ध्यान धरण्यापूर्वी गौतमाने उग्र तप केलें होतें. उपासतापासांनी आपला राज-बिंडा, सतेज देह कमालीचा खंगवून टाकला होता. पण ज्ञानाच्या दृष्टीने हे काय-क्लेश कुचकामाचे आहेत, असें त्याच्या प्रत्ययाला आलें म्हणून मग त्याने मध्यम मार्ग पुरस्कारला. ध्यान आणि चिंतन ह्यांना उपकारक ठरेल असा सात्त्विक आहार बेताने घ्यायचा, असें त्याने ठरवलें. मनाला स्वस्थता असेल, तरच समाधि उपन्न होते, या निर्णयावर तो आला.

पण आता ग्रासमात्र अन्न मिळवायचें, तर त्याला बसल्या जागेवरून उठण्याचीहि ताकद नव्हती. पण कसेंबसें हातीं बळ धरून तो उठला. नेरंजरा नदींत उतरून त्याने स्नान केलें, तर त्याला काठावरहि येणें अशक्य झालें. जवळपास हात द्यायला कोणी माणूसहि नव्हतें. तीरावरच्या वृक्षांनी आपल्या फांद्या वाकवून त्याला आधार दिला म्हणूनच तो वर येऊं शकला. तसाच लडखडत जाऊन त्याने जवळच्या अश्वत्थातळीं आसन घातलें. त्याचें मन खंबीर होतें पण शरीर अगदीच डबघाइस आलें होतें. खरोखर गौतम त्या वेळीं प्राणसंशयांत पडला होता.

पण त्याच वेळी एक अनपेक्षित घटना घडली. तिथल्या गोपाध्यक्षाची कन्या सुजाता त्या बाजूने जात होती, तिने गौतमाला पाहिलें. तिला त्याच्या स्थितीची जाणीव झाली. तिने लगबगीने घरी जाऊन दुधांतला पायस तयार करून आणला आणि तो गौतमाला मोठ्या प्रेमाने पाजला. त्या पायसाने गौतमाची तृप्ति झाली आणि त्याचें तनमन एका क्षणांत टवटवीत झालें. ही घटनाहि त्या बोधिवृक्षाखालीच घडली. ज्ञानप्राप्तीच्या आधींची बलप्राप्तीहि ह्या बोधिवृक्षानेच त्याला दिली.

मग त्याने निकराचा निर्धार केला. जन्म, जरा आणि मृत्यु यांनी

ग्रासलेल्या जगाला दुःखमुक्त करण्याचें भवौषध मिळाल्यावांचून आता आसन सोडायचें नाही. ‘ देहं वा पातयेत् अर्थं वा साधयेत् ! ’



सुजाता गौतमाला पायस देते.

पण गौतमाची ही समाधि धर्माचा हाडवैरी ‘मार’ याला सहन झाली नाही. गौतमाच्या समाधीचें जाळ त्याच्या अंगाला पडलें. त्याने आपल्या ‘नाज़ुक’ सेनेला प्रोत्साहन देऊन गौतमावर घातलें. ‘हाव-भाव-कटाक्ष’ या अस्त्रांचा त्याच्यावर मारा सुरू झाला. पण गौतमावर त्याचा लवमात्रहि परिणाम झाला नाही. तो धैर्याचा महामेरु त्या सर्व शृंगारचेष्टांना तुच्छ करून अविचल राहिला. अखेर माराला आपला सर्व ताफा गुंडाळून खालच्या मानेने तिथून परत जावें लागलें.

आणि ह्या मारविजयानंतर थोड्याच काळांत वैशाख पौर्णिमेच्या ब्राह्म-मुहूर्तीं गौतमाच्या हृदयांत ज्ञानोदय झाला. ‘हातींचिया दीपें दुरावली निशी’ असें त्याचें झालें. जगाच्या दुःखनाशाचा, त्याच्या कारणांसह निश्चित उपाय त्याला सापडला. गौतम सिद्धार्थ होता, तो ‘बुद्ध’ झाला.

बुद्धाला या ज्ञानसमाधींत चार आर्यसत्यें प्रकट झाली. दुःख हें पहिलें आर्यसत्य. हें पंचस्कंधजीवित दुःखमय आहे. दुःखसमुदय हें दुसरें आर्यसत्य. सुखाची तृष्णा, हें दुःखाचें कारण आहे. दुःखनिरोध हें तिसरें आर्यसत्य. त्याग, आणि वैराग्य हे याचें स्वरूप होय. अष्टांगिक मार्ग हें चौथें आर्यसत्य. हा दुःखनिरासाकडे जाणारा मार्ग आहे. बुद्धाने या चार आर्य-सत्यांच्या रूपाने आपल्या धर्माचें सारसर्वस्व जगाला दिलें.

आणि पुढे हा बोधिवृक्ष त्याच चार आर्यसत्यांचें प्रतीक ठरला. बौद्ध जगांत त्याला अमाप मान्यता मिळाली. सम्राट् अशोकाची कन्या संघमित्रा ही जेव्हा बुद्धाच्या धर्माचा प्रचार करण्यासाठी लंकेंत जायला निघाली, तेव्हा तिने ह्याच बोधिवृक्षाची फांदी आपल्याबरोबर नेली. तिने लंकावासी जनांना सांगितलें की भगवान् बुद्धाची विश्वव्यापी करुणा आणि मैत्री मी ह्या

फांदीच्या रूपाने तुमच्या देशांत दृढमूल करीत आहें.' मग तिने ती फांदी लंकेची राजधानी अनुराधपूर या ठिकाणीं समारंभपूर्वक रोवली. संघमित्रेच्या उपदेशाने लंका बुद्धानुयायी बनली. आज त्या जागीं त्या फांदीचा मोठा वृक्ष झाला आहे. त्याच्याच शाखा लंकेंत ठिकठिकाणीं रोवल्या गेल्या त्याहि आज त्या भूमींत पाळेंमुळें रोवून उभ्या राहिल्या आहेत. मूळच्या बोधिवृक्षाचा असा द्वीपांतरीं मोठाच वंशविस्तार झाला आहे.

सम्राट् अशोकाची त्या बोधिवृक्षावर नितांत श्रद्धा होती. त्याच्या दर्शनाने जणू त्याच्या हृदयांत नवा प्राण, नवा उत्साह संचरत असे. 'बुद्धाचा संदेश जगभर पोचव' असा संदेश जणू तो बोधिवृक्ष आपल्या सळसळीने त्याच्या कानांत पोचवीत असे. बोधिवृक्षाची पूजा करणे, त्याला सजवणें, शोभवणें हा त्याच्या बुद्धभक्तींतलाच एक रोचक भाग होता. त्याने आपल्या भांडारांतल्या अनेक रत्नमाला बोधिवृक्षाला समर्पिल्या.



सम्राट् अशोक

तिष्यरक्षिता, ही त्याची पट्टराणी. ती वृत्तीने जरा कहारीच होती. तिच्या प्रसाधनमंजूषेंतले रत्नहार जेव्हा असे एकामागून एक अदृश्य होऊं लागले, तेव्हा तिला कांही तरी निराळीच शंका आली. हें कांही तरी आपल्याला कळू न देण्याजोगें सम्राटाचें गुपित असावें, असा तिचा ग्रह झाला. ती मत्सराने पेटली देवयानी ययातीवर पेटली होती तशी. या तिष्यरक्षितेच्या ज्या दासीबटकी होत्या, त्यांत एक जादुगारीणहि होती. ती नाना प्रकारची कुंवेडीं करी. राणीने तिला फर्माविलें की 'माझे रत्नहार ज्या कोणाच्या अंगावर रुळत असतील, त्या व्यक्तीला 'सुकतडी' लागावी, तिला झिजून झिजून मरण यावं, असा कांही तरी प्रखर जादूटोणा कर.'

तिने त्याप्रमाणे कांही जंतर मंतर केले. बोधिवृक्षाला तें बाधलें. त्याचीं पानें झडलीं. फांद्या वाळल्या. साल काळी पडली. त्याचा जीवनरसच आटत चालला. तो मृत्युपंथाला लागला. अशोकाने आपल्या पूज्य वृक्षाची ती विपन्नदशा पाहिली. हें कसं झालें, कां झालें, याची त्याने बारीक चौकशी सुरू केली.

त्या प्रकरणीं त्याला सुगावा लागला, की बोधिवृक्षाच्या रुग्णतेचें मूळ कारण आपल्याच राणीवशांत आहे. त्याने मग पट्टराणीला जवळ बोलावलें. तिच्या संशयाचें आणि मत्सराचेंहि निराकरण केलें. तिष्यरक्षिता ओशाळली. तिलाहि बोधिवृक्षाविषयी पूज्यभाव होताच. मग तिने त्याच जादुगारिणीला बोलावून फर्मावलें.

"तुझा जादूटोणा परत घे !"


तिने कुवेडें उलटें केले आणि मग पुनश्च तो वृक्षराज नव्या पालवीने तुरभुरला, निरोगी झाला.

पण महान् विभूतींचीं संकटेंहि महानच असतात. बोधिवृक्षावरचें हें कांहीं एकुलतें गंडांतर नव्हे. इ. स. च्या सातव्या शतकांत शशांक नांवाचा एक राजा झाला. तो बौद्ध धर्माचा कट्टा शत्रु होता. त्याला वाटलें की बोधि-वृक्षाचीं खांडें केलीं की बौद्ध धर्महि परास्त होईल. म्हणून त्याने आपल्या वैरभावाचा घाव बोधिवृक्षाच्या मुळावर घातला. वज्रावरचें तेल वांग्यावर काढलें. बोधिवृक्ष शाखा-पल्लवांसह भग्न होऊन धरणीवर कोसळला. पण बुद्ध-धर्म जसा आशियांतल्या मानवजातीच्या हृदयांत खोलवर रुजला होता, तशींच त्या बोधिवृक्षाचीं पाळेंमुळेंहि धरणीच्या काळजांत खोलवर गेलीं होती. त्यामुळे मुख्य खोड तुटलें तर लगेच दुसऱ्या पावसाळ्याला त्याच्या भोवती नवे धुमारे निघून आपली लवलव दाखवूं लागले. 'कीं तोडिला तरु फुटे अणखी भराने' म्हणतात, तसें झालें.

पुढे १८७६ मध्ये त्या भागांत एक मोठें वादळ उठलें. संहारवात जणू प्रलयतांडव नाचूं लागला. वनें दांगें उद्ध्वस्त करून त्याने आपल्या विनाशक सामर्थ्याची साक्ष पटवली. त्या झंजावातांत बोधिवृक्ष पुनश्च उन्मळून पडला. बुद्धधर्माचें हें प्राणरूप प्रतीक होत्याचें नव्हतें झालें. अगणित बुद्धभक्तांचीं अंतःकरणें ह्या दुर्दैवी घटनेने पिळवटून निघालीं. पण तरीहि बोधिवृक्ष अमरच राहिला. त्याने पुनरपि नव्या अंकुराच्या रूपाने डोकें वर काढलें आणि बुद्ध-भक्तांच्या श्रद्धेलाहि नवजीवन दिलें.

पण बोधिवृक्षाच्या सहस्रावधि वर्षांच्या आयुष्यांतील ह्या ज्या पडझडी झाल्या, त्यामुळे अलीकडे तो बौद्ध पंडितांच्या विश्वासाला पात्र राहिला नाही. आजहि बौद्ध चिकित्सक तो वृक्ष त्या ठिकाणी पाहतात. पण त्यांच्या मनांत असे येतें की, हाच तो मूळ वृक्ष कशावरून ! कदाचित् तो जीर्ण होऊन पतन

पावला असेल आणि त्याच्या जागीं दुसऱ्या रोपाची नव्याने लावणी झाली असेल. म्हणूनच १९५२ सालीं सांची येथे सारीपुत्त मोग्गलान ह्या सुप्रसिद्ध बुद्धशिष्याच्या अस्थि पुनश्च तिथल्या स्तूपांत ठेवण्याचा समारंभ झाला, त्या वेळीं जी बोधिवृक्षाची फांदी लावली गेली, ती बुद्धगयेच्या वृक्षाकडून न घेतां लंकेंतल्या अनुराधपुराहून आणण्यांत आली. त्याआधी काशीस मूलगंधकुटी-विहार उभारण्यांत आला, त्या वेळींहि बोधिवृक्षाच्या फांदीसाठी लंकेकडेच धाव घेण्यांत आली. अनुराधपूरचा वृक्ष हाच आजमितीस मूळ बोधिवृक्षाचा खरा वारस ठरला आहे.



बोधिवृक्ष व बुद्धमंदिर–गया

बोधिवृक्ष हा पिंपळ आहे हें वरील विवेचनावरून कळण्यासारखे आहे. पिंपळालाच अश्वत्थ असे दुसरे नांव आहे. भारतीय संस्कृतीत अश्वत्थाचें स्थान असाधारण आहे. वेदकालांतच नव्हे; तर त्याच्याहि पूर्वीपासून तो पवित्र आणि सर्वपूज्य ठरला आहे. त्याच्या ठिकाणी अनेक देवतांचा अधिवास

असतो, अशी श्रद्धा पुरातनकालापासून भारतांत दृढमूल आहे. भगवान् श्रीकृष्णांनी गीतेच्या दहाव्या अध्यायांत आपला विभूतियोग सांगितला. त्यांत चराचर वस्तूंतल्या आपल्या विभूति कोणत्या हें सांगतांना 'अश्वत्थः सर्ववृक्षाणाम्' म्हणून आपली वृक्षजातींतली विभूति निर्देशिली. त्याला देवत्व बहाल केलें. इतकेंच नव्हे, तर पुढे पंधराव्या अध्यायांत त्रिकालव्यापी विश्वप्रपंचाचें निरूपण केलें तेंहि अश्वत्थाच्याच रूपकाचा आधर घेऊन.

> " ऊर्ध्वमूलमधःशाखमश्वत्थं प्राहुरव्ययम्
> छंदांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित् "

हा अश्वत्थ एक विचित्र वृक्ष आहे. याचें मूळ आहे वर अन् ताळ आहे खाली. पण तरीहि हा उन्मळलेला नाही. उन्मळून पडला असता, तर त्याचे शाखापल्लव हिरवेगार दिसले नसते. सूर्य आकाशांत वर तळपतो; पण त्याचे किरण मात्र खाली सर्वत्र पसरतात. तशीच या अश्वत्थ वृक्षाची वाढ खाली खाली होत राहिली आहे. याचें मूळ मायेंत आहे आणि तें ब्रह्माच्या ठिकाणीं बळ बांधून पोसलें आहे. हा आहे सनातन. दिसतो शाश्वत. पण वस्तुतः हा क्षणभंगुर आहे. हा प्रत्येक क्षणाला नाश पावत असतो. म्हणूनच ज्ञाते लोक याला 'अश्वत्थ' ( अ + श्व + स्थ = उद्यापर्यंतहि न टिकणारा ) म्हणतात. पण हा नाशवंत असला तरी आश्चर्याची गोष्ट ही, की याचें अशाश्वतपण लोकांना जाणवत नाही. आणि त्याचें कारण ह्या अश्वत्थाची प्रचंड गति. ज्ञानेश्वर या गतीचें दृष्टांताने विवरण करतात—

> " जातां वेगें बहुवसें । न वचे कां भमी रुतलें असे
> रथाचें चक्र दिसे । जिया परी ॥
> तैसें काळातिक्रमें जे वाळे । ते भूतशाखा जेथ गळे
> तेथ कोडीवरी उमाळे । उठती आणिक ॥
> परी येकी केधवां गेली । शाखाकोडी केधवां जाली
> हें नेणवें जेवीं उमललीं । आषाढअभ्रें ॥ "

रथाचें चाक अतिवेगाने फिरूं लागलें की तें फिरत नसून जमिनीत रुतून बसलें आहे असे ज्याप्रमाणें दिसतें, आषाढांत डवरून आलेल्या मेघांत एक मेघ केव्हा विरला अन् त्या जागीं दुसरे अनेक केव्हा दाखल झाले, तें जसें कळत नाही, त्याचप्रमाणे कालाच्या प्रचंड गतीने या संसाररूपी अश्व-

त्याच्या प्राणिरूपी फांद्या केव्हा गळून पडल्या आणि त्या ठिकाणीं कोट्यवधि धुमारे केव्हा उगवले तें कळतच नाही.

भारतीय जनतेने अनेक वृक्षांना आपल्या संस्कृतिसंवर्धनांत महत्त्वाचें स्थान दिलें आहे. वड, पिंपळ, औदुंबर इत्यादि वृक्षांवर देवता वास्तव्य करतात हा हिंदु संस्कृतींतला संकेत बौद्धांनीहि मानलेला आहे. उरुवेला ग्रामीं अन्य छायावृक्ष काय कमी असतील ! पण बोधिसत्त्व गौतम, विश्वाला दुःखमुक्त करणाऱ्या ज्ञानाच्या प्राप्तीसाठी पिंपळाच्या झाडाखाली वज्रासन घालून बसला, त्याच्या मागे अश्वत्थाविषयींची केवढी तरी सांस्कृतिक संकेतांची परंपरा उभी होती !



# अर्धनारीश्वर

सृष्टिरचनेच्या प्रारंभीं ब्रह्मदेवाने दक्षादि मानसपुत्र निर्माण केले आणि त्यांना प्रजा उत्पन्न करण्याची आज्ञा दिली. त्याला वाटलें कीं, हे आपले मानसपुत्र 'प्रजापति आपलें बरेंचसें कार्य करतील. पण अनुभव आला तो उलटा. त्यांच्याकडून प्रजावृद्धि होईना. त्यामुळे विधाता विवंचनेंत पडला. त्याने मग तपश्चर्या आरंभली. असाध्य तें साध्य करायला तोच एक प्रभावी उपाय होता. त्या तपाच्या सामर्थ्याने आद्य शक्ति त्याच्या अंतरांत प्रविष्ट झाली. विधाता 'सशक्त' बनला. तिच्या बळावर त्याने शंकराची आराधना केली. तेव्हा शिव प्रसन्न झाला आणि त्याच्यापुढे प्रकटला.

विधाता डोळे उघडून पाहतो, तों केवढें अद्‌भुत ! शिवाचें रूप अर्धें नराचें आणि अर्धें नारीचें. दोन विरुद्ध तत्त्वांची मिळून ती एक मूर्ति बनली होती. त्याला पुरुष म्हणावें, तर अर्धें अंग कोवळें, नाजूक. स्त्री म्हणावें, तर अर्धें अंग निबर, पिळदार. बरें; सांधा कुठे दिसत नाही. शिवाचें हें अर्धनारीश्वर रूप आकाराला आलें तें सृष्टीच्या प्रारंभिक अवस्थेंत. मूर्तिशिल्पाच्या प्रारंभकालापासून तें एक सर्वमान्य आणि दृष्टीला, मनाला, आकर्षक असें प्रतीक ठरलें आहे. कवि आणि तत्त्वज्ञ यांना त्याने सारखेंच लोभवलें आहे. कविकुलगुरु कालिदासाने रघुवंशाच्या प्रारंभीं नांव न घेतां याच अर्धनारीश्वराला वंदन केलें आहे.–

> " वागर्थाविव संपृक्तौ वागर्थप्रतिपत्तये
> जगतः पितरौ वंदे पार्वतीपरमेश्वरौ "

पार्वती आणि परमेश्वर दोघे एकमेकांत मिळून एकाकार झाले आहेत. जसे वाणी आणि अर्थ. वाणी आणि अर्थ जेव्हा एकरूप होतात, तेव्हाच भावसृष्टीला बहर येतो. पार्वतीपरमेश्वर एकरूप होतात म्हणजे अर्धनारीश्वर होतात, तेव्हाच विश्वप्रपंच उभा राहतो. अतएव जगाच्या या मायबापांना मी प्रथमारंभीं वंदन करतों, असें कालिदास म्हणतो.

हें अर्धनारी पुरुषरूप पाहिल्यावर मग ब्रह्मदेवाला प्रतीत झालें कीं, प्रजा

उत्पन्न व्हायला हवी असेल, तर नराइतकीच नारीचीहि आवश्यकता आहे. म्हणून मग त्याने त्या संयुक्त रूपाला प्रार्थिलें कीं, 'तुम्ही स्त्री-पुरुषात्मक मिथुनसृष्टि निर्माण करण्यासाठी विभक्त व्हा. एकाचीं दोन व्हा. द्वैत करून अद्वैत साधा.' अर्धनारीश्वराने ती प्रार्थना ऐकली आणि त्याच्यांतलें नारीतत्त्व विभक्त झालें. तीच पुढे दक्षकन्या 'सती' झाली. विभक्त होऊनहि पुनश्च शिवाशीं भावनात्म दृष्टीने संयोग पावली. आणि त्यानंतर एवढा काळ बीजरूपाने ताटकळत राहिलेली जारजसृष्टि एकदम कोंबावली.


अर्धनारीश्वर

अर्धनारीश्वराची ही कल्पना लोकमानसाला एकदम रुचली. केवढी विलक्षण जादूगिरी होती त्यांत! एकाच रूपांत स्त्री अन् पुरुष. जसे एकाच शब्दांत दोन आशय. नराची मर्यादा कुठे संपते अन् नारीची नव्हाळी कुठून सुरू होते, हें अनाकलनीय. दिवस अन् रात्र यांचा सांधा कळूं नये तसें. केवढी गूढरम्यता! याचें शिल्प किंवा चित्र बनवायचें, तर केवढी सूक्ष्म दृष्टि अन् केवढी कलाचातुरी हवी! म्हणून मग मत्स्यपुराणाने त्या बाबतींत शिल्पकारांना तपशीलवार मार्गदर्शन केलें—

'शिवाचें डावें अंग नारीरूप बनवावें. मस्तकाच्या उजव्या भागावर जटाजूट बांधावा. त्यावर बीजेची चंद्रकोर अलगद खोचून द्यावी. दुसऱ्या अर्धांत केसांचा सरळ भांग दाखवावा. त्यांत पिंजर भरावी. उजव्या कानीं वासुकि नाग लोंबता ठेवावा. डाव्या कानीं रत्नकुंडलाची रचना करावी. उजव्या दोन हातांत त्रिशूळ आणि नरकपाल द्यावें. डाव्या दोन हातांत आरसा अन् कमळ द्यावें. त्याच हातांत

कंकणें आणि त्याच भुजयुग्मांत बाजूबंद चढवावे. त्याच अंगीं एकच पुष्ट पयोधर निर्मावा. कृशकटीच्या तेवढ्याच भागीं रत्नखचित कमरपट्टा बसवावा. उजवें अर्धांग नागभूषित करावें. उजवा पाय कमळावर हळुवार टेकलेला दिसावा. डाव्या पायांत पैंजण घालावे. करांगुलींत मुद्रिका चढवाव्या. उजवा पाय शंकराचा; तो हिमगौर असावा. डावें पदतल पार्वतीचें. तें रातोत्पला-सारखें असावें. मूर्ति द्विभुज; वाटल्यास चतुर्भुजहि करावी. '

शिल्पकारांना एवढें वर्णन भरपूर झालें. त्यांनी मग शास्त्रमर्यादा न सोडतां त्यांत स्वतःच्या कल्पनेने आणखी कांही अलंकारांची भर टाकली. भारताच्या कलाक्षेत्रांतून अर्धनारीश्वराच्या अनेक मूर्ती शिल्पकारांनी घड-विल्या आहेत. श्री. ग. ह. खरे यांनी आपल्या ग्रंथांत त्यांचें विशद वर्णन दिलें आहे. मथुरा हें कुशानकालीन शिल्पाचें माहेरघर होय. तिथल्या शिला-पट्टांत अर्धनारीश्वराची उभी आणि द्विभुज मूर्ती आहे. बोधिसत्त्व अवलोकिते-श्वराप्रमाणे या मूर्तीचा उजवा हात अभयमुद्रा दाखवतो. डाव्या हातांत वाटोळा आरसा आहे. दोन्ही कुंडलें एकाच प्रकारचीं आहेत. मेखलेखाली ऊर्ध्वलिंग आहे. डावा पाय उमेचा असल्यामुळे तो किंचित् आखडलेला दिसतो. उजव्यावर घोट्यापर्यंत धोतर आहे.

बदामीच्या गुहेंतील अर्धनारीश्वराच्या चतुर्भुज मूर्तींत खालच्या दोन हातांत नारदाने वीणा आडवी धरावी, तसा एक दंड धरलेला आहे. वरच्या उजव्या हातांत नागाने विळखा घातलेला परशु आणि डाव्या हातांत कमल आहे. 'उपमाश्लोक कोंदाकोंदी' म्हणतात त्याप्रमाणे अंगावर अलंकारांची गर्दी आहे. मुखाभोवतीं प्रभावलय आहे. उजव्या भागीं सन्मुख नंदी आणि अंजुळि जोडून भृंगी हे दोन गण आहेत. डावीकडे हातांत पात्र धरणारी एक नारी आहे. ही कोण असावी बरें? शिवपुराणांत सांगितल्याप्रमाणे अर्धनारीश्वर रूप प्रकट होतांच त्याने एक आद्या अथवा परमा शक्ति उत्पन्न केली, तीच ही नारी असेल. हीं वर्णनें एकमुखी मूर्तींचीं झालीं. पण धारासुरम् येथील अर्ध-नारीश्वराला तीन मुखें आणि आठ हात आहेत.

अगदी प्रारंभीं योनि-लिंग हीं दोन प्रतीकें स्वतंत्र होतीं. पुढे मानवाने अनुभवाच्या आधारें त्या दोन प्रतीकांना एकत्र आणलें आणि त्यांची उपासना सुरू केली. पुढे जेव्हा मानव मूर्ति घडवण्याइतका सुसंस्कृत आणि कला-वंत झाला, तेव्हा हेंच लिंग-शाळुंकेचें प्रतीक त्याने अर्धनारीश्वराच्या रूपांत पुढें

मांडलें. दोहोंतलाहि भाव एकच. प्रजावृद्धि व्हायची, तर उभयांचा एकीभाव होणें अपरिहार्य आहे.

सृष्टीच्या पूर्वी स्त्री-पुरुष भेद होता, की नव्हता आणि असल्यास तो कशा प्रकारचा होता, त्याचें उत्तर देण्याचा प्रयत्न या शिल्पाच्या द्वारें केलेला आहे. प्रारंभिक अवस्थेंत स्त्रीतत्त्व आणि पुरुषतत्त्व हीं अविभक्त आणि अविभिन्न होतीं. पहिल्यांत दुसरें होतें आणि दुसऱ्यांत पहिलें होतें, हेंच त्याचें उत्तर आहे. आजहि अत्यंत खालच्या थराच्या जीवांत स्त्रीतत्त्व आणि पुरुष-तत्त्व हीं दोनहि एकाच शरीरांत वास्तव्य करतात. अशा जीवांना 'हार्मोफ्रोडाइट' असें नांव आहे. ते स्वतःमध्येच नर-नारी असतात आणि स्वतः-मधूनच निर्मिति करतात.

स्त्री ही प्रकृति आणि नर हा पुरुष. त्यांचा अन्योन्याश्रय आहे. पुरुषा-वाचून प्रकृति अनाथ आहे आणि प्रकृतिवाचून पुरुष अकिंचित्कर आहे.

**"जे अनंग तो पेंधा। निकवडा निसुधा**
**जर्णि अतिवृद्धा— । पासोनि वृध्दु**
**तो तरी अकर्ता । उदास अभोक्ता**
**परी इया पतिव्रता । भोगविजे"**

असें पुरुषाबद्दल ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. आणि प्रकृति? ती तर चमत्कारांचें वेळाउळच! सगळा खेळ तिचाच.

**"कळा येथूनि जाळिया । विद्या इयेचिया केलिया**
**इच्छा—ज्ञान—क्रिया । वियाली हे"**

विश्वांतलें सारें नररूप म्हणजे शिव आणि विश्वांतलें यच्चयावत् नारीरूप म्हणजे उमा. हें उभय म्हणजेच जगत्कारण! रुद्रहृदयोपनिषदांत जे अनेक मंत्र आहेत, ते स्पष्टपणें हेंच सांगतात—

**"रुद्रो नर उमा नारी तस्मै तस्यै नमोनमः**
**रुद्रो ब्रह्मा उमा वाणी तस्मै तस्यै नमोनमः**
**रुद्रो विष्णुरुमा लक्ष्मीस्तस्मै तस्यै नमोनमः"**

रुद्र हा सूर्य आणि उमा त्याची प्रभा. रुद्र हा यज्ञ आणि उमा त्याची वेदी. रुद्र हा गंध आणि उमा त्याचें फूल. रुद्र हा लिंग आणि उमा त्याची शाळुंका....

'अग्नीषोमात्मकं जगत्' असें एक वचन आहे. अग्नीषोम म्हणजे अग्नि आणि सोम ( रस ). प्रजापतीनें अग्नीषोम यज्ञ केला आणि त्यांतून सारें विश्व, चारी खाणी, चौऱ्यांयशी लक्ष योनी उदय पावल्या, विस्तारल्या. अग्नि हें पुरुषतत्त्व असून तें स्त्रीच्या रजांत आहे. सोम हें स्त्रीतत्त्व असून तें पुरुषाच्या शुक्रांत आहे. म्हणजे सूक्ष्म दृष्टीनें विचार केल्यास पुरुषांत स्त्री आहे आणि स्त्रींत पुरुष आहे. हीं दोन्ही तत्त्वें एकमेकांना आकर्षक होतात, 'काम्य' होतात.

'काम' हा त्यांच्यामधला संयोजक भाव आहे. खालच्या सृष्टींत सूक्ष्म रूपानें असलेल्या कामभावाचा उच्च कोटीच्या प्राण्यांत विकास होतो आणि हे स्त्रीपुरुष विभाग स्वतंत्र होतात. त्यांच्या कामचेष्टाहि भिन्न प्रकारच्या होत असतात. आणि आश्चर्याची गोष्ट ही की, अशा प्रकारें उभयांचें विभक्तीकरण होऊनहि दोघांच्याहि मध्यें विरुद्ध तत्त्वाचा भावनात्मक अंश थोड्या फार प्रमाणांत शिल्लक राहतोच.


तंजावरचा अर्धनारीश्वर

मानव प्राण्यांत कामभावनेचा सर्वांगीण विकास झालेला आहे. त्याचें स्वरूप केवळ शारीरिक न राहतां तो आत्म्यापर्यंत जाऊन भिडला आहे. त्याला एका बाजूनें शास्त्रीय आणि दुसऱ्या बाजूनें ललितस्वरूप प्राप्त झालें आहे. मनोविज्ञान शास्त्र सांगतें कीं, प्रत्येक प्राण्यांत नर आणि नारी या दोन्ही भावना वास्तव्य करतात. जें शारीरिक लिंग असेल ती भावना प्रधान आणि प्रबळ असते आणि भिन्नलिंगी भावना गौण आणि सूक्ष्म असते. ही विरोधी भावना स्वाभाविक भावनेच्या दडपणामुळे दबत दबत चेतन मनांतून अचेतन मनांत प्रविष्ट होते. विरोधी भावनेचें दमन करण्याची प्रक्रिया नर-नारींत स्वाभाविकपणें चाललेली असते. त्यामुळे त्या व्यक्तीचा एका बाजूनें विकास होत जातो व

दुसऱ्या बाजूने तिच्यावर ताणहि पुष्कळ पडतो. जागृत मनांत दाबलेलीं ही विरोधी भावना मग स्वप्नरूप घेते. या स्वप्नांत माणूस आपल्या दमित भावनांचीं विविध चित्रें निर्माण करतो आणि त्यांच्या दर्शन-स्पर्शनानें हर्ष-शोकांचा अनुभव घेतो. हें एक प्रकारें दमित भावनांचें मूर्तीकरणच असतें.

हेंच मूर्तीकरण जेव्हा जागृत अवस्थेंत होतें, तेव्हा त्यांतून अनेक प्रकारच्या कला जन्म घेतात. कथा, काव्यें, चित्रें, शिल्पें आणि भक्तीचीं विविध रूपें यांतून प्रकट होतात. माणसानें जीं अनेक सांस्कृतिक प्रतीकें निर्माण केलीं आहेत, त्यांचा साक्षात्कार त्याला आधीं अचेतन मनांतच झालेला आहे. अर्धनारीश्वराच्या प्रतीकांत त्या पहिल्या कलाकारानें आपल्यांतल्या दमित भावनेचाच कलात्मक आविष्कार करून उभय भावनांचा सुरेख मेळ दाखवला आहे.

या रूपाची उपासना कशासाठी करायची, तर नररूप आणि नारीरूप अशा उभयविध कामांवर विजय मिळविण्यासाठी. काम हा मानवी जीवनाला अत्यावश्यक आहे. पण तो स्वाधीन राहिला पाहिजे. तरच तो मानवाला सुख समाधान देऊन त्याच्या विकासालाहि साहाय्यक होऊं शकतो. कामाच्या आहारीं जातां कामा नये आणि त्याच्याकडे घृणेच्या दृष्टीनेंहि पाहतां कामा नये. अर्धनारी प्रतीक दाखवितांना शिवाचें रूप पसंत केलें, तें याचसाठीं. मदनाचें दहन करूनहि त्यानें पार्वतीचें पाणिग्रहण केलें आणि तिला आपल्या अर्धांगांत समाविष्ट करून टाकली. शिवानें या गोष्टींत काय साधलें ? तर स्वतःमधल्या भिन्न लिंगी भावनेचें उदात्तीकरण !

पुरुषाच्या अंतरांतल्या स्त्रीभावाचें उदात्तीकरण झालें, तर त्या अवस्थेंत त्याच्या ठिकाणीं करुणेचा उत्कर्ष होतो. तो कृपाळू शिक्षक बनतो. तो कवि आणि कलाकार या रूपांनी प्रगट होतो. कलाकाराचें अंतःकरण हळुवार आणि संवेदनाक्षम असायला हवें असें म्हणतात. हे तर उघड उघड नारी प्रकृतीचे धर्म आहेत.

याचप्रमाणे स्त्रीचेंहि आहे. तिच्याहि अंतरांत सूक्ष्मरूपानें पौरुष असतें आणि प्रसंगविशेषीं तें फुटून प्रकट होतें. अशा वेळीं कोवळिकेची मूर्ति असलेली सावित्री धिटाईनें यमाचा मागोवा घेते. विनयशालिनी लक्ष्मीबाई रणरागिणी बनून शत्रूच्या आग ओकणाऱ्या सैन्याशीं मुकाबला करते. स्वप्नांतल्या

पतिविरहानेहि घाबरून घामाघूम होणारी एखादी साध्वी, पतीबरोबर चितारोहण करून ज्वालामय बनते. हीं सगळीं अर्धनारीश्वराचींच जितीं जागतीं प्रतिबिंबं आहेत. याचा अर्थ असा कीं, नराने आत्मरूपांत नारीरूपाला उदात्त करून, त्याची जोपासना करायला हवी. स्त्रीनेहि आपल्या विनयादिगुणांचा विकास करीत पौरुषाचा स्फुलिंग जागृत ठेवायला हवा. स्त्रीत्व किंवा पुरुषत्व याला विरोधी भावाची आंतून जोड मिळायला हवी. अन्यथा जीवन एकारेल, एकांगी बनेल.

तत्त्वज्ञानहि हेंच प्रतिपादतें. शिव हा शक्तियुक्त होतो, तेव्हाच समर्थ होतो. शक्तीच्या अभावीं शिव हा 'शिव' नसून केवळ 'शव' आहे. शिवागमांतल्या अद्वैतांत मायेचा म्हणजे शक्तीचा त्याग केलेला नाही; तर उलट ब्रह्मशक्ति म्हणून तिचा संग्रहच केलेला आहे. त्यांच्या मतें शिव–शक्तीची नित्य समरसता म्हणजेच अद्वैत होय. माया ही प्रकृति असून महेश्वर हा मायी म्हणजे तिचें धारण करणारा आहे. या माया-महेश्वरांच्या संयोगांतून सर्व विश्व निर्माण झालें आहे. मनु म्हणतो—

" द्विधा कृतात्मनो देहमर्धेन पुरुषोऽभवत्
अर्धेन नारी तस्यां स विराजमसृजत्प्रभुः "

परमेश्वराने स्त्री आणि पुरुष अशा उभय रूपांत आत्मदेह विभक्त केला आणि मग स्त्रीच्या ठिकाणीं विराजाला, म्हणजे चराचर विश्वाला जन्म दिला. आणि एवढें करूनहि तो नरांत नारीरूपाने आणि नारींत नररूपाने शाश्वत राहिला आहे.



# नटराज

कैलासाचें स्थळ आहे. प्रदोषकाळची वेळ आहे. हिमाचलाच्या बर्फ पांघुरलेल्या शिखरांवर अंधाराचें पटल हळू हळू गडद होऊं लागलें आहे. शिवशंकराच्या नृत्यानंदाचा हा समय. तो त्याची सिद्धता करतो आहे. सर्व गणांत प्रमुख असलेल्या नंदीला त्याची सूचना मिळाली आहे. तो नृत्यभूमीवर दाखल होऊन विश्वाला इशारा देत आहे—

" लोकपाल हो ! आपलीं आसनं सोडून दूर व्हा. आकाशांत गर्दी करणाऱ्या कृष्णमेघांनो ! बिनपायांनी पळा. हे धरित्रि ! तूं पाताळांत खोल उडी घे. गगनचुंबी पर्वतांनो ! तुम्ही पृथ्वीच्या पदराखालचीं लेकरं व्हा. हे ब्रह्मन् ! तुमचा सत्यलोक अंतराळांत खूप वर जाऊं द्या. माझा स्वामी नृत्यासाठी गजचर्म आवळतो आहे. जटाजूट बांधतो आहे. त्याला विश्वाची रंगभूमि मोकळी करून द्या."

नंदीने असें सर्वांचें उत्सारण केलें आणि सांब सदाशिव विश्वाच्या रंगभूमीवर प्रविष्ट झाला. जगज्जननी उमा ही त्या नृत्याची सन्मान्य प्रेक्षिका. ती समोर रत्नजडित सिंहासनावर बसली. लागलीच शुभ्रवसना सरस्वतीने वीणेचा झंकार केला. देवेंद्राने मुरली उचलली. ब्रह्मदेवाने मंजीर वाद्य घेतलें. श्रीविष्णूने मृदंग गळ्यांत अडकवलें. लक्ष्मीने एक गीत सुरू केलें. सकल वाद्यांनी त्याची सम पकडली. शिवाने त्या समेवरच पदाघात केला. मृदंगाचे बोल अन् मुखडे यांना धरून नृत्य सुरू झालें. विशिष्ट आवर्तनांनंतर लय वाढली. तालाची दुगुण चौगुण झाली. नृत्यांत वेग आणि आवेश संचरला. त्याच्या गिरक्यांनी अंतराळ गरगरूं लागलें. हातवाऱ्यांनी नक्षत्रांना तडाखे बसूं लागले. पदाघातांनी सप्तस्वर्ग दुमदुमले. हुंकारांनी सप्तपाताळें घुमलीं. देव आणि देवांगना, यक्ष–किन्नर आणि त्यांच्या कलाकामिनी, हीं सर्व मंडळी तें नृत्य पाहण्यासाठी अंतराळांत गर्दी करूं लागली. शिव हा स्वभावतः रुद्र खरा; पण तें संध्यानृत्य नाचतांना आपला मूळ स्वभाव विसरला.

त्याचें स्वरूप सौम्य आणि मनोहर झालें. त्यासरशी त्याने आपल्या देहावर मुक्त हस्ताने माखलेल्या चिताभस्माचा अंगराग बनला. भाळींच्या तृतीय नेत्रांतली अग्नि-ज्वाला कस्तुरीचा टिळा बनली. गळ्यांतल्या सर्पांचे मणिहार झाले.



नटराजाची कांस्यमूर्ति

पार्वतीने तें नृत्य देहभान विसरून पाहिलें. तिला कलास्वादाचें 'परगुणें' झालें. शिवाने संहारतांडव सुरू केलें की ती थोड्याच वेळांत त्याला म्हणे, 'प्रभो! आता पुरे करा; नाहीं तर विश्वाचा प्रलयकाल ओढवेल.' पण हें नृत्य म्हणजे प्रसन्नतेचा मळा! त्यामुळे स्वतःची पूर्ण तृप्ति होईपर्यंत उमेने त्याला 'पुरे' म्हटलें नाही. मग कधीतरी त्याच्या इच्छेनेच तें थांबले. मग सृष्टिरमणीने शिवाच्या त्या नृत्य-मुद्रेवरून कशा प्रकारें आरती उतरली, तें कविवर्य तांबे यांना विचारा—

" नीलमणिरचित तबकिं गगनीं
निरांजन रवि-शशि पाजळुनी
आरती करी सृष्टिरमणी
झांज झं झणण

वायु दण् दणण
नगारा गगन
भास्कर भक्ति तुझी याची
जय जय सान्त अनन्ताची ''

या शिवतांडवाचे अनेक प्रकार आहेत. आनंद, संहार, त्रिपुर, संध्या, गौरी, इत्यादि त्यांचीं नांवें आहेत. नाटयशास्त्राचा प्रणेता भरत त्यांची संख्या १०८ सांगतो. चिदंबरम्च्या गोपुरावर ते सर्व प्रकार खोदून दाखवलेलेहि आढळतात. एक सांध्यनृत्य सोडलें तर बाकीचे बहुतेक नृत्यप्रकार रोमांचकारी आणि हृदयप्रहारी आहेत. रावणाने आपल्या ' शिवतांडव ' स्तोत्रांत तितक्याच दणकेबाज भाषेंत त्यांचें वर्णन केलें आहे.

या नृत्यांत दोन्ही सामर्थ्यें आहेत. सर्जक आणि संहारक. संजीवक आणि दाहक. हीं उभयविध सामर्थ्यें लक्षांत घेऊनच ऋषिमुनींनी त्याला 'नटराज' ही उपाधि समर्पित केली. शिवाने त्या पदवीचें भूषण मानलें. तो नृत्य-नाटयाचा मूलस्तंभ मानला गेला. या दोन ललितकलांचें तो प्रतीक ठरला. नृत्य-नाटयांत पारंगत व्हायचें असेल, तर नटराजाची आराधना करायला हवी, त्याच्या कृपेला पात्र व्हायला हवें, अशी श्रद्धा कलावंतांच्या हृदयांत पैठी झाली.

शिवाच्या सात्त्विक आणि सुमंगल नृत्यप्रकारांत सांध्यनृत्याप्रमाणेच आणखी एका नृत्याची गणना आहे. त्याचें नांव 'नादन्त नृत्य.' भगवान् कैलासनाथाने हें नृत्य मर्त्यलोकांत प्रथम केलें तें तिलईच्या रंगभूमीवर. ही तिलई म्हणजेच आजचें चिदंबरम्. या क्षेत्रांत शिव हा नटराजाच्या स्वरूपांत राहिला आहे. तिथल्या मंदिरप्राकारांत एक विस्तर्ण मंडप आहे, त्याचें नांव 'कनकसभा.' नटराजाने या क्षेत्रांत ज्या जागीं नृत्य केलें, त्याच जागेवर या कनकसभेची उभारणी झाली आहे. नटराज या ठिकाणीं प्रकट झाला, तो वामाचारी लोकांचें पाखंड मोडून जनांना सन्मार्ग दाखवण्यासाठी. गोष्ट घडली ती अशी–

तिलई हें दक्षिणापथांतलें एक महत्त्वाचें ठिकाण. वाममार्गी उपासकांनी तिथे आपला अड्डा जमवला आणि तें आपल्या पंथाचें केंद्र बनवलें. हे वाममार्गी शक्तीचे उपासक होते. त्यांच्या उपासनेंत अनेक अनैतिक गोष्टींचा समावेश होता. धाकदपटशा दाखवून ते लोकांना आपल्या पंथांत ओढीत अन् बायां बापड्यांनाहि नादीं लावीत.

शिवाला त्यांचे हे चाळे ज्ञानचक्षूंनी दिसले. त्याने त्यांचें पारिपत्य करायचें ठरवलं. तो त्या ठिकाणीं साक्षात् प्रकट झाला. त्याच्या दर्शनाने ते पाखंडी नमले नाहीत; तर त्याच्याशीं सामना द्यायला उभे राहिले. त्यांनी अग्नि प्रज्वलित करून विशिष्ट मंत्रांनी हवन केलें. त्यांतून तीन व्यक्ती बाहेर आल्या. एक फणीचा नाग, दुसरा ढाण्या वाघ अन् तिसरा एक काळा कुरूप ठेंगू.



शाक्तपंथीयांचा शिवावर हल्ला

त्या तिघांनी मिळून शिवावर एकदम हल्ला चढवला. शिव नुसता हसला. त्याच्या एकाच दृष्टिपाताने नाग मलूल पडून पायांशीं घोटाळूं लागला. शिवाने लगेच त्याला उचलून गळ्यांत घातलें. शिव 'नागभूषण' झाला. वाघाला त्याने करांगळीने उभें चिरलें आणि त्याचें चर्म पाठीवर परिधान केलें. शिव 'व्याघ्रांबर' झाला. उरतां उरला तो विद्रूप बुटका. शिवाने त्याला आडवें घातलें आणि त्याच्या पाठीवर नाचनाचून त्याचें हाडन्हाड खिळखिळें करून टाकलें. हें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रमांक नटराज ........ वि: ...[..५५.......
क्रमांक ........ नों: दि: ........

सर्व पाहून त्या पाखंड्यांची गाळण उडाली: ते थरथरा कांपत शिवाला लोटांगणीं गेले आणि पुढे त्याच्याच उपदेशाने शिवभक्त बनले.

दाक्षिण भारतांत नटराजाच्या मूर्तींची विपुलता आहे. दाक्षिणात्यांचें तें परमप्रिय प्रतीक आहे. चोल राजाच्या कारकीर्दींत, म्हणजे नवव्या-दहाव्या शतकांत तिकडचे स्थपती नटराजाच्या मूर्ति घडवूं लागले. या सर्वांत मद्रास येथील संग्रहालयांत असलेली भव्य कांस्यमूर्ति उत्कृष्ट समजली जाते. नटराजाची कल्पना त्या मूर्तींत परिणत स्वरूपाला गेलेली आढळते. ही आणि अशीच त्रिवन्द्रम् येथे असलेली दुसरी, या दोन्ही मूर्ति पंधराव्या शतकांतल्या आहेत, असें म्हणतात.

नटराजाच्या या प्रतिमेचें सांग, सपरिवार, आणि सशक्तिक वर्णन केल्यावाचून त्याची प्रतीकात्मकता पुरतेपणीं लक्षांत येणार नाही.

तो पाहा तो नटराज! तो उभा आहे; पण एकाच पायावर. या अवस्थानाला 'अतिभंग' अशी संज्ञा आहे. यांत सर्व शरीराचा तोल एका पायावर संभाळायचा असतो आणि त्यांतूनच गति दाखवायची असते. उचललेला डावा पाय, उजवे दोन्ही हात आणि डावा पुढचा हात, या सर्व अवयवांचा झोक उजवीकडेच असल्यामुळे तोल संभाळणें अधिक अवघड झालें आहे. त्याच्या मस्तकावर जटाजूट बांधलेला आहे. त्यांत अनेक रत्नें खोचलेलीं आहेत. तिथेच गंगेचें मुखमंडळ आणि बीजेची चंद्रकोरहि विराजित आहे. जटाजूटाखालच्या केसांच्या बटा भुरुभुरु उडत आहेत. त्याच्याखाली रुमाल आहे तोहि दोही अंगीं फडफडत राहिला आहे. एका कानांत पुरुषकुंडल अन् दुसऱ्या कानांत स्त्रीकुंडल झळकत आहे. गळा नागभूषित असून त्याच्या जोडीने अशोकपत्रांची माळ आहे. मूर्ति चतुर्भुज आहे. डाव्या मागच्या हातांत अग्निज्वाळा फुरफुरते आहे. डावा पुढचा हात उजव्या अंगाला येऊन हत्तीच्या सोंडेसारखा पायाकडे झुकला आहे. उजव्या मागच्या हातांत डमरू गिडबिडतो आहे. उजवा पुढचा हात अभयमुद्रेचा आहे. उजवा पाय 'मुयलक' राक्षसाच्या पाठीवर घट्ट रोवलेला आहे. वर उल्लेखलेला कुरूप ठेंगू तो हाच! यालाच 'अपस्मार' असेंहि म्हणतात. मुयलकाजवळ एक सर्प आहे. मुयलक पालथा पडला आहे, तो पालथ्या कमळावर. तिचें नांव कमलपीठिका. त्या पीठिकेंतूनच 'तिरुवशी' म्हणजे प्रभावळ निघाली आहे. ही प्रभावळ नटराजमूर्तीला समग्र आपल्या वर्तुळांत घेते. त्या प्रभावळीला मधून मधून अग्निज्वाळांचे अंकुर फुटले आहेत.

उचललेला पाय आणि अग्निधारण करणारा हात, हे नटराजाचे दोन अवयव त्या तिरुवशीला स्पर्श करीत आहेत.

या मूर्तीतला प्रत्येक अवयव सचेतन आहे. प्रत्येक रेखा बोलकी आहे. त्याच्या आयुधांतून, अवस्थानांतून अनेक आशय सूचित होतात. या मोठ्या प्रतीकांत आणखी कांही छोटीं छोटीं प्रतीकें समाविष्ट झालीं आहेत. तीं सर्व मिळून नटराजाचें पूर्ण प्रतीक तयार होतें. तो डमरू नादाचा जनक आहे. आपली स्वर-वर्णमाला या डमरूंतूनच प्रथम प्रकट झाली. त्या नादाच्या आघाताने विश्वांतल्या चराचराचीं बीजें फुटून अंकुरलीं. चारी वाणी आणि चौऱ्यांयशी लक्ष योनी यांचा निर्माता शिवच आहे, हें कलाकाराने त्याच्या हातीं डमरू देऊन सूचित केलें आहे.

तसाच तो डाव्या हातांतला ज्वलंत अग्नि. अग्नीला 'पावक' असेंहि नांव आहे. तो मालिन्य नष्ट करून वस्तूची शुद्धि करतो. विश्वांतल्या वस्तूंत बदल करणें, नित्य नवीं सौंदर्यें आविष्कृत करणें, हें अग्नीचें काम. नटराजाच्या नृत्यगतींतून तो प्रज्वालित झाला आहे. अग्नि हाच रुद्र ही वैदिक काळांतली धारणा, नटराजाच्या हातीं अग्नि देऊन कलाकाराने चिरंजीव करून टाकली आहे. शिवाच्या कर्पूरगौर देहावर या अग्नीनेच तांबूस कांति चढवली आहे.

नटराजाचा तिसरा हात अभयमुद्रा दर्शवितो. कोपरापासून पुढचा हात उभा करून तळवा सरळ दाखवणें हें अभयमुद्रेचें लक्षण. शिव हा रुद्र असल्यामुळे वेदकाळांत त्याच्या क्रोधाची धास्ती असलेली दिसते. तो वैदिक ऋषि कुत्स त्याला कसें विनवतो पाहा—

" हे रुद्रा ! तूं आमच्या मुलांना मारूं नको. तूं आमच्या वीरांना, गुरांना, अश्वांना, कोणालाहि मारूं नको. आम्ही तुला हवि समर्पित करूं. "

अतएव या रुद्राने नटराजाच्या स्वरूपांत भक्तजनांना जणू अभयाचें अन् सुरक्षेचें आश्वासन सदाचें देऊन ठेवलें आहे. वर उचललेल्या डाव्या पायाने तो जणू सांगतो की ' मुक्ति हवी असेल, तर माया-मोहापासून असे अलग व्हा, उंच व्हा. ' तो अपस्मार म्हणजे अविद्या आणि अज्ञान यांचा काळा पुतळा. किंवा अपस्मार म्हणजे भौतिक वासना. या वासनेचा चेंदामेंदा केल्यावाचून मोक्ष दुरापास्त होय ! ' वासनाप्रक्षयो मोक्षः ! '

नटराजाभोवती मखर करणारी ती प्रभावळ हें प्रकृतीचें प्रतीक आहे. तिलाहि अधूनमधून ज्वालांचे अंकुर फुटले आहेत. जणू तेजाची फुलें उमललीं

आहेत. त्या ज्वालांच्या रूपाने प्रकृतीहि जणू नाचत आहे. निसर्गातली, अंतराळांतली, सारी हालचाल, सारे प्रक्षोभ, सारे उन्मेष या प्रभावळीने सूचित झाले आहेत. नटराजाची नृत्यप्रेरणा जणू त्रिगुणात्मक प्रकृतीच्या रोमरोमांत भिनली आहे.

नटराजाचें हें नादन्त नृत्य विश्वांतल्या पांच महान् क्रियांचें निदर्शक आहे, असें श्री. आनंद कुमारस्वामींसारखे कलातत्त्वज्ञ सांगतात. सृष्टि, स्थिति, प्रलय, तिरोभाव आणि अनुग्रह हे ते पांच भाव होत. विश्वांतल्या अणुरेणूंत शिवतत्त्व भरून राहिलें आहे. त्याचें त्रैलोक्यमंगल नृत्य त्रिभुवनांत अखंड चाललें आहे. या नृत्याला कधीहि विराम नाही. विश्वांतल्या अनंत ब्रह्मांडांचें केंद्र म्हणजे हें 'चिदम्बरम्' क्षेत्र. तिथली 'कनकसभा' हें नटराजाचें नृत्यस्थल. पिंड-ब्रह्मांडन्यायाने आपल्याहि हृदयांत 'चिदम्बरम्' आहे आणि तिथेहि नटराज सदैव नाचत राहिला आहे. पण तें नृत्य जीवात्म्याला दिसत नाही की, भावत नाही. कां ? त्याचें कारण ज्ञानचक्षु अज्ञानाच्या पटलाने झाकलेले आहेत हें होय . तो पडदा जेव्हा दूर होईल, तेव्हा नटराज आपल्या अंतर्विश्वांत झळाळून उठेल. मग त्याचें तें नृत्य आंतल्या आंत पाहतां, अनुभवतां येईल.




ऊर्ध्वतांडव शिव

रसिकाला, प्रेक्षकाला, बाह्य विश्वांतून अंतर्विश्वांत घेऊन जाणें, भावसृष्टींतलीं सौंदर्यस्थळें आणि रत्नभांडारें त्यांच्यापुढे उघडीं करणें, हेंच कलेचें कार्य! नटराजाची मूर्ति घडवणाऱ्या कलाकाराने तें कार्य उत्तम प्रकारें साधलें आहे. रसिक, मर्मज्ञ

आणि तत्त्ववेत्तेहि या महनीय कलाकृतीवर मुग्ध होतात. त्या मूर्तीकडे कांही काल टक लावून पाहिलें तर तो उभा आहे असें वाटतच नाही. भोवरा आपल्या चरमगतींत आल्यावर जसा फिरत असूनहि स्थिर वाटतो, तसा त्या मूर्तींत भास होतो. कोणाला त्यांतून हिंडोल, मालकंस अशांसारखे रागहि अनाहत नादाने उठत आहेत, असें वाटतें.

शास्त्र-धर्म-कला, यांचा त्रिवेणीसंगम म्हणजे नटराजाची मूर्ति. हें कलावंताला पडलेलें निरुपमेय स्वप्न आहे. अद्भुत प्रतिभा आणि प्रखर साधना यांच्या द्वारें त्या कलवंताने आपल्या त्या स्वप्नाला मूर्त रूप दिलें आहे. त्याची साधना इथे परतत्त्वाला स्पर्श करून पुढे गेली आहे. भौतिकतेच्या मर्यादा ओलांडून तिने जणू अध्यात्माच्या सरोवरांत बुडी दिली आहे. या कलावंताचें नाम-गोत्र जगाला अज्ञात आहे आणि अज्ञातच राहील. कारण तो आपल्या कलेहून वेगळा उरलाच नाही. जें नांव नटराजाचें, तेंच त्याचें!



# त्रिमूर्ति

मानवाच्या प्रारंभिक अवस्थेंत त्याचा देव हा कुठेतरी अंतराळांत राहत होता. त्याला रंग, रूप, आकार, कांही नव्हतें. तो अदृश्य, अव्यक्त होता; पण पदोपदीं आघातांच्या आणि उत्पातांच्या रूपाने आपला साक्षात्कार दाखवीत होता. त्या काळीं माणूस देवाला विलक्षण घाबरत होता. तो आपल्या दैनंदिन व्यवहारांत न पडो; आपल्याला सुखा-समाधानाने जगायला देवो, म्हणून एखाद्या झाडाखाली अथवा एखाद्या दगडापुढे त्याला पशुबालि देऊन संतुष्ट करीत होता. खरें म्हणजे तो देवाची कटकट मिटवीत होता.

पण माणसाचें मन हळूहळू विकासित होऊं लागलें, तसतशा त्याच्या देवविषयक कल्पनाहि विकास पावूं लागल्या. तो त्याच्या रूपाची कल्पना करूं लागला. त्याच्या शक्तीचा शोध घेऊं लागला. त्याचीं स्तोत्रें रचून गाऊं लागला. आपल्या भल्यासाठी त्याला दैनंदिन व्यवहारांत पाचारूं लागला; त्याच्याशीं भीत भीत का होईना पण सलगीहि करूं लागला.

आणि अखेर एक दिवस असा उजाडला, की त्या दिवशीं एका प्रतिभावंत मानवाने, म्हणजेच त्या वेदांतल्या नारायण ऋषीने देवाला पुरुषरूपांत पाहिलें. देव हा अन्य कोणी नसून तो 'पुरुष' आहे, असा त्याला साक्षात्कार घडला. निसर्गशक्तींचें दिव्य स्वरूप विकसित होतां होतां तें पुरुषांत म्हणजे मानवांत येऊन दाखल झालें. ईश्वराच्या पुरुषकल्पनेने समग्र दैवतेतिहासांत एक विलक्षण क्रांति घडली. माणूस आत्मरूपांत देव पाहूं लागला. ही गोष्ट सर्व धर्मांच्या इतिहासांत क्रांतिकारक आहे, असें तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात. इथूनच अध्यात्मविद्येला प्रारंभ होतो.

'ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति'

हा आश्वासक उद्‌घोष त्यानंतरच संभवतो. भक्तीचें किंवा उपासनेचें युगहि इथूनच पुढे सुरू होतें.

ईश्वर हा पुरुषांतला पुरुषोत्तम आहे, हा शोध लागतांच माणूस त्याच्याकडे एकदम निराळ्या दृष्टीने पाहूं लागला. ती दृष्टि प्रेमाची होती, 'तमेव शरणं गच्छ' या भावनेची होती आणि कलेचीहि होती. मग माणसाला वाटलें की,

आपल्या आवडत्या पण निराकार देवाला आकार द्यावा. त्याला हात, पाय, तोंड लावावें. त्याला अलंकारांनी नटवावें. 'येथे अलंकार शोभती सकळ' हा गोड अनुभव द्यावा, घ्यावा.

म्हणून मग त्यानें छन्नी, कोरणें, अशा प्रकारचें सोयिस्कर पडेल, तसलें उपकरण उचललें. पूर्वी तो ज्या दगडाला देव मानीत होता, त्याच दगडावर त्याने रेषा उमटवून तिथे देवाला साकार केलें. मग तो अशा अनेक दगडांतून मूर्ति आणि मंदिरें कोरूं लागला. आपल्यापेक्षा देवाची शक्ति कितीतरी अफाट आहे, हें त्याला ठाऊक होतें. म्हणून त्याने विष्णूला चार अन् देवीला आठ हात जोडले. ब्रह्मदेवाला चार तोंडें लावलीं. शिवाला भालप्रदेशीं तिसरा डोळा जडवला. अग्नीला चार शिंगें अन् तीन पाय निर्माण केले. देवांच्या अंगींचें इच्छा, ज्ञान, आणि क्रिया असें त्रिविध सामर्थ्य अचाट असल्याचें दाखवण्यासाठी नानाविध क्लृप्त्या योजल्या.



कलाकार मूर्ति घडवतो

मग कलावंताची कल्पना त्याहून पुढे धावली. त्याला वाटलें की, शिव आणि पार्वती हीं जर मनानें अभिन्न आणि एकरस असतील, तर त्यांना देहानेंहि अभिन्न कां दाखवूं नये? या विचारांतून अर्धनारीश्वररूप प्रकटलें. 'शिवस्य हृदयं विष्णुर्विष्णोश्च हृदयं शिवः' असें जर तत्त्ववेत्ते सांगतात, हरिहरांत जर फक्त एका वेलांटीचाच फरक असेल, तर विश्वांतल्या ह्या दोन महान् मूलस्तंभांचें ऐक्य मूर्तींत कां आणूं नये? यांतून हरि-हरमूर्ति संलग्नपणें आकाराला आल्या. उपास्यांचें ऐक्य

साधलें, तर शैव-वैष्णवांचीं मनेंहि सांधतील, हा त्यांत उदार आणि उपकारक भाव होता. महादेवाचें उग्ररूप तो रुद्र आणि सौम्यरूप तो शिव. एकाच तत्त्वाची ही द्विविध प्रकृति.

त्याचबरोबर महादेवाची उभयत्र सारख्याच प्रमाणांत कार्य करणारी ती शक्ति. ती रुद्राला तर धरून आहेच अन् शिवालाहि सोडीत नाही. ती स्वतः कार्यरूप आहे आणि हीं दोन्ही रूपें तिला प्रेरक आहेत. रुद्रानें 'जाळ' म्हणावें, तिनें जाळावें. शिवानें 'संभाळ' म्हणावें, तिनें संभाळावें. यांतूनच विश्वाची उत्पत्ति, स्थिति आणि लय. हें सर्व लक्षांत घेतल्यावर त्या कलाकाराला वाटलें की, रुद्र, शिव आणि शक्ति म्हणजे उमा, या तिघांना एकत्रच कां घडवूं नये ? त्यांचा 'अविनाभाव' मूर्तिरूपांत सर्वांना सुगम कां करूं नये ?

आणि या प्रतिभेच्या नवोन्मेषांतूनच त्रिमूर्तीचें शिल्प सगुण साकार झालें.

इथे एक गोष्ट लक्षांत ठेवायला हवी ती ही, की त्रिमूर्तिशिल्प हें ब्रह्मा–विष्णु–महेशांचें नाही. तें आहे रुद्र, शिव आणि उमा यांचें. कार्य तेंच. विश्वाची उभारणी, जोगवणी आणि संहारणी. पण इथे तोच आशय शैव परिभाषेंत प्रकट केलेला आहे.



घारापुरीची त्रिमूर्ति

या त्रिमूर्तीच्या मूळ कृतीचें भव्योदात्त दर्शन घडतें तें घारापुरीच्या लेण्यांत. घारापुरी हें एक बेट आहे. जणू समुद्रमंथनांतून वर आलेलें भूमिलिंग. मुंबईच्या अपोलो बंदरापासून ईशान्येस अवघ्या सहा सात मैलांच्या अंतरावर तें आहे. तिथलें 'कैलास' नांवाचें गुहामंदिर हें या त्रिमूर्तीचें निवासस्थान. ही भव्य मूर्ति पश्चिम सागराच्या सान्निध्यांत राहून उपासक, रसिक आणि कलावंत यांना जणू सहा ओठांनी पाचारण करते आणि 'कोण येतो आहे' म्हणून सात नेत्रांनी न्याहाळते.

या शिल्पाच्या वरच्या भागीं एक कोरलेला आडवा पाषाण आहे.

त्रिमूर्तीवर त्याची झिरझिरीत झाकुळती छाया सदैव पडलेली असते आणि मूर्तीला आगळीच गूढरम्यता आणते. तुमच्याहि मनावर ती एक अनामिक दडपण आणील. पण तुम्ही न कचरतां पुढे चला. अगदी थेट समोर जाऊन उभे राहा आणि मग मूर्तीचें ठाणमाण, तिचें सौष्ठव, तिची भव्यता, तें एकत्वांतलेंच भिन्नत्व, तें व्यक्त करण्यासाठी कलावंताने दैवतशास्त्राला धक्का न लावतां योजिलेल्या चतुराईच्या युक्त्या, त्या आकारांतून व्यक्त होणारें दार्शनिक रहस्य, हें सर्व यथामति समजून घ्या आणि मग त्या विश्ववंद्य कलाकाराला त्याच्या कलाकृतीच्या चरणाशींच तुमचा भावप्रणाम सादर करा.

आता तुम्हांला त्या मूर्तीचें निरीक्षण करायचें आहे. त्यासाठी डावीकडून उजवीकडे ही सर्वमान्य पद्धति अवलंबिणें बरें. पहिला मुखवटा रुद्राचा हें तुम्हाला त्याच्या मिशीच्या आकड्यावरून कळेल. पिळदार मिशी म्हणजे चेहऱ्याला उग्रता आणण्याची किमयाच! त्या मुखमुद्रेंतला सगळाच तपशील भयोत्पादक आहे. डोळे मिटलेले खरे; पण त्यांचीं झांकणें जाड अन् सुपारीसारखीं वर आलेलीं आहेत. जणू ते उघडले की, त्यांतूनच आगीचे लोळ ब्रह्मांड ग्रासायला उठावे. त्याच्या जटाजूटांत वळवळ करणारे ते नाग. त्या नागांनीच तो जटाजूट आवळलेला असला, तरी त्यांतल्या कांही नागदोऱ्या सुटून मोकळ्या होऊं पाहत आहेत. त्याच जागीं नरकपाल दिसतें. तिथेच बिल्वदळहि आहे. त्रिमूर्तीत त्रिदळ म्हणजे एकाच रूपाचीं हीं तीन दळें असल्याची सूचक खूण. उजवा हात हृदयावर उभा केलेला. त्याचा तळवा दिसतो तो आहे अभयहस्त! पण तो रुद्राचा आहे, याचा विसर पडूं नये म्हणून त्यालाहि नागाचा विळखा. जीभ थोडीशी बाहेर डोकावते तीहि जणू कालसर्पिणीच !

रुद्र म्हणजे मानवांना रडवणारा. 'रोदयति सर्वमन्तकाले इति रुद्रः' अशी त्या शब्दाची व्याख्या. म्हणूनच त्याला 'घोर' असें दुसरें नांव मिळालें आहे. अग्नीचा आणि रुद्राचा जिवलग संबंध आहे. अग्नि हें रुद्राचें वीर्य आहे, हें त्याच्या 'कृशानुरेतस्' ह्या दुसऱ्या एका नांवावरून कळतें. रुद्र पशुपति आहे; पण तो पशूंवर धाडहि घालतो, म्हणून त्याच्या प्रसन्नतेसाठी 'शूलगव' नांवाचा याग करावा आणि त्याला बैलाचा बळी द्यावा, असें श्रौतसूत्रांत सांगितलें आहे.

मधला मुखडा शिवाचा. तें ध्यान रुद्राहून वेगळें आहे आणि त्याचें

अलंकरणहि वेगळें आहे. तो शांत आहे, समाहित आहे, राग-लोभादि विकारांच्या अतीत आहे. त्याच्या जटाजूटांत कीर्तिमुख आहे. कीर्तिमुख हें अतिरंजित असें सिंहमुख असतें. त्याचा अन् शिवाचा संबंध अतूट आहे. त्याने तसा वरच मिळवला आहे. पण आश्चर्याची गोष्ट ही की, इथे त्याचें उग्रत्व जाणवत नाही. ती शांत, सौम्य, सुंदर अशी चंद्रकोर. जिच्यासाठी शिव-पार्वतींमध्ये कित्येकदा ईर्षाकलह निर्माण झाले आहेत. तीहि तिथेच जटाजूटावर आरूढ झाली आहे. आणि ती धाकुटी असली, तरी शिवाचें सौम्यत्व अनेक पटींनी वाढवते. कानांतलीं मकरकुंडलें डौलदार आहेत. अधरोष्ठ किंचित् जाड अन् बाहेर वळलेला आहे. असें वाटतें की, शिवाला कांहीतरी संदेश द्यायचा आहे. मानवजातीला कल्याणाचें एखादें सूत्र सांगायचें आहे. तीं अक्षरें जणू त्या ओठाच्या मागे दाटून आलीं आहेत अन् त्याला पुढे रेटीत आहेत.

शिव म्हणजे मंथनांतून निघालेलें हालाहल स्वतः पिऊन जगाला वांचवणारा. स्वतः स्मशानांत राहून जगांत मंगलतेचे मळे फुलवणारा. स्वतः लंगोटी लावून भक्तांना समृद्ध करणारा. विश्वकल्याणासाठीच ध्यानमग्न! थोड्याशाच भावभक्तीने संतुष्ट होणारा भोळा चक्रवर्ती!

तिसरें म्हणजे उजव्या हाताचें मुखकमल आहे शक्तीचें म्हणजे उमेचें. उमा म्हणजे मूर्तिमती सुंदरता. अलंकारांनाहि 'बरवेंपण' देणारी रूपसम्राज्ञी! तिची ती मुद्रा घडवतांना कलाकाराचा हात अतिकोमल झाला आहे. इतकेंच नव्हे; तर तो काळवत्री पाषाणहि कलाकार देईल तो आकार घेण्यासाठी जणू मेणाहून मऊ बनला आहे. उमेच्या कानांत शंखपत्रें असून त्याखाली कलिकेसह एक कमल प्रफुल्ल झालें आहे. मुकुटावर रत्नमाला लोंबत



वेगळ्या प्रकारची त्रिमूर्ति

आहेत. तिच्या मऊ, रेशमी केसांच्या आखूड बटा वेणीबंधांत न सापडून हळूंच मुकुटाखालून बाहेर निसटल्या आहेत. त्या मुकुटावर सर्वांत वर आहे

त्रिमूर्तीवर त्याची झिरझिरीत झाकुळती छाया सदैव पडलेली असते आणि मूर्तीला आगळीच गूढरम्यता आणते. तुमच्याहि मनावर ती एक अनामिक दडपण आणील. पण तुम्ही न कचरतां पुढे चला. अगदी थेट समोर जाऊन उभे राहा आणि मग मूर्तीचें ठाणमाण, तिचें सौष्ठव, तिची भव्यता, तें एकत्वांतलेंच भिन्नत्व, तें व्यक्त करण्यासाठी कलावंताने दैवतशास्त्राला धक्का न लावतां योजिलेल्या चतुराईच्या युक्त्या, त्या आकारांतून व्यक्त होणारें दार्शनिक रहस्य, हें सर्व यथामति समजून घ्या आणि मग त्या विश्ववंद्य कलाकाराला त्याच्या कलाकृतीच्या चरणाशींच तुमचा भावप्रणाम सादर करा.

आता तुम्हांला त्या मूर्तीचें निरीक्षण करायचें आहे. त्यासाठी डावीकडून उजवीकडे ही सर्वमान्य पद्धति अवलंबिणें बरें. पहिला मुखवटा रुद्राचा हें तुम्हाला त्याच्या मिशीच्या आकड्यावरून कळेल. पिळदार मिशी म्हणजे चेहऱ्याला उग्रता आणण्याची किमयाच ! त्या मुखमुद्रेंतला सगळाच तपशील भयोत्पादक आहे. डोळे मिटलेले खरे; पण त्यांचीं झांकणें जाड अन् सुपारीसारखीं वर आलेलीं आहेत. जणू ते उघडले की, त्यांतूनच आगीचे लोळ ब्रह्मांड ग्रासायला उठावे. त्याच्या जटाजूटांत वळवळ करणारे ते नाग. त्या नागांनीच तो जटाजूट आवळलेला असला, तरी त्यांतल्या कांही नागदोऱ्या सुटून मोकळ्या होऊं पाहत आहेत. त्याच जागीं नरकपाल दिसतें. तिथेंच बिल्वदळहि आहे. त्रिमूर्तीत त्रिदळ म्हणजे एकाच रूपाचीं हीं तीन दळें असल्याची सूचक खूण. उजवा हात हृदयावर उभा केलेला. त्याचा तळवा दिसतो तो आहे अभयहस्त ! पण तो रुद्राचा आहे, याचा विसर पडूं नये म्हणून त्यालाहि नागाचा विळखा. जीभ थोडीशी बाहेर डोकावते तीहि जणू कालसर्पिणीच !

रुद्र म्हणजे मानवांना रडवणारा. 'रोदयति सर्वमन्तकाले इति रुद्रः' अशी त्या शब्दाची व्याख्या. म्हणूनच त्याला 'घोर' असें दुसरें नांव मिळालें आहे. अग्नीचा आणि रुद्राचा जिवलग संबंध आहे. अग्नि हें रुद्राचें वीर्य आहे, हें त्याच्या 'कृशानुरेतस्' ह्या दुसऱ्या एका नांवावरून कळतें. रुद्र पशुपति आहे; पण तो पशूंवर धाडहि घालतो, म्हणून त्याच्या प्रसन्नतेसाठी 'शूलगव' नांवाचा याग करावा आणि त्याला बैलाचा बळी द्यावा, असें श्रौतसूत्रांत सांगितलें आहे.

मधला मुखडा शिवाचा. तें ध्यान रुद्राहून वेगळें आहे आणि त्याचें

अलंकरणहि वेगळें आहे. तो शांत आहे, समाहित आहे, राग-लोभादि विकारांच्या अतीत आहे. त्याच्या जटाजूटांत कीर्तिमुख आहे. कीर्तिमुख हें अतिरंजित असें सिंहमुख असतें. त्याचा अन् शिवाचा संबंध अतूट आहे. त्याने तसा वरच मिळवला आहे. पण आश्चर्याची गोष्ट ही की, इथे त्याचें उग्रत्व जाणवत नाही. ती शांत, सौम्य, सुंदर अशी चंद्रकोर. जिच्यासाठी शिव-पार्वतींमध्ये कित्येकदा ईर्षाकलह निर्माण झाले आहेत. तीहि तिथेच जटाजूटावर आरूढ झाली आहे. आणि ती धाकुटी असली, तरी शिवाचें सौम्यत्व अनेक पटींनी वाढवते. कानांतलीं मकरकुंडलें डौलदार आहेत. अधरोष्ठ किंचित् जाड अन् बाहेर वळलेला आहे. असें वाटतें की, शिवाला कांहीतरी संदेश द्यायचा आहे. मानवजातीला कल्याणाचें एखादें सूत्र सांगायचें आहे. तीं अक्षरें जणू त्या ओठाच्या मागे दाटून आलीं आहेत अन् त्याला पुढे रेटीत आहेत.

शिव म्हणजे मंथनांतून निघालेलें हालाहल स्वतः पिऊन जगाला वांचवणारा. स्वतः स्मशानांत राहून जगांत मंगलतेचे मळे फुलवणारा. स्वतः लंगोटी लावून भक्तांना समृद्ध करणारा. विश्वकल्याणासाठीच ध्यानमग्न ! थोड्याशाच भावभक्तीने संतुष्ट होणारा भोळा चक्रवर्ती !



वेगळ्या प्रकारची त्रिमूर्ति

तिसरें म्हणजे उजव्या हाताचें मुखकमल आहे शक्तीचें म्हणजे उमेचें. उमा म्हणजे मूर्तिमती सुंदरता. अलंकारांनाहि 'बरवेंपण' देणारी रूपसम्राज्ञी ! तिची ती मुद्रा घडवतांना कलाकाराचा हात अतिकोमल झाला आहे. इतकेंच नव्हे; तर तो काळवत्री पाषाणहि कलाकार देईल तो आकार घेण्यासाठी जणू मेणाहून मऊ बनला आहे. उमेच्या कानांत शंखपत्रें असून त्याखाली कलिकेसह एक कमल प्रफुल्ल झालें आहे. मुकुटावर रत्नमाला लोंबत आहेत. तिच्या मऊ, रेशमी केसांच्या आखूड बटा वेणीबंधांत न सापडून हळूंच मुकुटाखालून बाहेर निसटल्या आहेत. त्या मुकुटावर सर्वांत वर आहे

तें कमलपत्र. तिथेच अशोकपत्रहि दिसतें. तो साराच सुंदरतेचा आणि कोमलतेचा आविष्कार आहे.

" चंद्रं गता पद्मगुणान्न भुंक्ते पद्माश्रिता चांद्रमसीमभिख्याम्
उमामुखं तु प्रतिपद्य लोला द्विसंश्रयां प्रीतिमवाप लक्ष्मीः "

लक्ष्मीचीं अधिष्ठानें दोन : चंद्र आणि कमळ. पण लक्ष्मी जेव्हा चंद्र-मंडलावर आरूढ होते, तेव्हा तिचें कमलगत सौंदर्य खालीच राहतें. कमळा-वर येते, तेव्हा चंद्राचें संजीवकत्व तिला अंतरतें. पण जेव्हा लक्ष्मी उमेच्या मुखावर आधिष्ठित होते, तेव्हा मात्र चंद्र आणि कमळ या दोन्ही अधि-ष्ठानांचें कांतिवैभव तिला प्राप्त होतें, हें कालिदासकृत उमावर्णन इथे आठवा.

उमा म्हणजेच शक्ति. हिचें वर्णन महाराष्ट्रांतल्या एका कलगीवाल्या शाहिराने पुढीलप्रमाणे केलें आहे. शक्ति ही प्रथम अव्यक्त, निर्गुण, निरा-कार. नारायण चहू शून्यांत म्हणजे वर, खाली, आगे, मागे कांहीच नाही अशा अवस्थेंत निजला होता. त्याला मग स्फुरलें की आपल्याला शक्ति हवी. मग त्याच्या इच्छामात्रे ती उत्पन्न झाली. ब्रह्मा-विष्णु-महेशांची उत्पत्ति त्या-नंतर. पुढे नारायण तोच शिव झाला आणि शक्ति ही उमा होऊन त्याची अर्धांगी बनली.

त्रिमूर्तीतलीं हीं तिन्ही रूपडीं पाहतांना एवढा विशाल आशय लक्षांत आणायला हवा. कारण मी पहिल्यांदाच सांगितलें आहे, की ही त्रिमूर्ति म्हणजे कलेच्या माध्यमांतून, दगडाच्या भाषेतून प्रकट झालेलें एक महान् रहस्य आहे. हे विश्वांतलें आणि विश्वाच्याहि पलीकडचें त्रिकालाबाधित सत्य आहे.

भारताच्या संस्कृतीला त्रिकाचें विशेष प्रेम अन् कौतुक वाटत आलें आहे. तीन आकड्यांच्या परिभाषेत बोलायचें अशी ही आवडी आहे. एका वैदिक ऋषीने तीन आकड्यांचें एक सूक्तच लिहिलें आहे. पुराणांत, नीति-शास्त्रांत, वेदांतांत त्रिकाचीच महत्ता. तीन लोक-स्वर्ग, मृत्यु, पाताळ ! तीन अवस्था–आदि, मध्य, अंत किंवा जागृति, स्वप्न, सुषुप्ति. तीन संध्या–प्रातः, सायं, माध्याह्न. तीन मार्ग–कर्म, भक्ति, ज्ञान. तीन ऋणें-देवांचें, ऋषींचें अन् पितरांचें. तीन आत्मस्वभाव–सत्, चित्, आनंद. असा हा सगळा त्रिकाचाच मामला आहे. या त्रिकाने विश्व व्यापलें आहे. त्रिकानेच मानवी जीवन भरून टाकलें आहे. सांख्यशास्त्र तर त्रिगुणांवरच आधारलेलें आहे—

विश्वाचें स्वरूप त्रिगुणात्मकच आहे. सुख अन् प्रकाश हा सत्त्वगुणाचा परिणाम. प्रवृत्ति, हालचाल, घडामोडी, हा रजोगुणाचा प्रभाव. आवरण, प्रतिबंध, मोह, अज्ञान, हीं तमोगुणाचीं लक्षणें. त्रिगुण हेंच विश्वाचें मूळ कारण. तीन लहान दोऱ्यांचा तिपेडी मोठा दोर बनवावा, त्याप्रमाणे त्रिगुणांच्या मिश्रणापासून हा विश्वप्रपंच उभा झाला आहे. जगांतल्या प्रत्येक वस्तूंत कमी-अधिक प्रमाणांत हे तीनहि गुण असतातच. हाच आशय या त्रिमूर्तिशिल्पांतून व्यक्तवलेला आहे. शक्ति हें रजोगुणाचें स्वरूप. शिव हा सत्त्वागळा पुतळा. आणि रुद्र म्हणजे निखळ तमोगुण. हें विश्व म्हणजे या त्रिमूर्तींचाच लीलाविलास !

डॉ. वासुदेवशरण अग्रवाल लिहितात—

"भारतीय कलेने आपल्या अर्थाच्या अभिव्यक्तीसाठी अनेक मनोहर सूत्रें निर्माण केलीं आहेत. या त्रिमूर्तीच्या मागे दार्शनिक चिंतनाचा केवढा रहस्यमय संकेत आहे! प्रणवापासून तो त्रैगुण्यापर्यंतच्या विराट् भावांच्या अभिव्यक्तीसाठी कलेने 'त्रिमूर्ति' हें एक प्रतीक निर्माण केलें आणि तें सर्वांना संतोषप्रद झालें. त्रिमूर्ति म्हणजे भारतीय दर्शनाची प्रतिमा आहे. तत्त्वज्ञानाच्या प्रांगणांत उभे राहून आपण जेव्हा 'एकैव मूर्तिर्बिभिदे त्रिधा सा' या रहस्याचा उद्घोष करतों, तेव्हा कलेने घडवलेली ही प्रतिमा जणू त्या उद्घोषाचा साक्षात्कारच दाखवते. घारापुरीच्या कैलासमंदिरांतली ही प्रतिमा भारतीय दर्शनाचें अमर प्रतीक बनून भारताच्या सामुद्रिक महाद्वाराच्या उंबरठ्यावर उभी आहे. 'दर्शन' हाच भारताचा आत्मा आहे, असेंच ती सांगत आहे."



# गजलक्ष्मी

वेरूळच्या डोंगरांत जी लेण्यांची रांग आहे, तिच्यांत कैलास नांवाचें अतिभव्य आणि कलाकुसरीचें एक लेणें आहे. त्याच्या प्रवेशद्वारांतच गज-लक्ष्मीचें दर्शन घडतें. त्या प्रवेशद्वाराच्या आंतल्या अंगाला जवनिकेसारखी एक शिळा मधोमध उभी केलेली असून तिच्यावर त्या गजलक्ष्मीला साकार केलेलें आहे. तें समग्र चित्रच विशाल आहे. खालीं क्षीरसागराच्या दुग्धधवल लहरी उचंबळत आहेत. त्यांतूनच एक सहस्रदल कमल उमलून वर आलें आहे. त्या कमलावर लक्ष्मी विराजित झाली आहे. तिच्या दोन्ही अंगांना जलपृष्ठावरच दोन गजराज उभे आहेत, तसेच अंतराळांत अधांतरीं आणखी दोघे आहेत. चौघांचाहि मोहोरा लक्ष्मीकडेच वळलेला आहे. चौघेहि मिळून लक्ष्मीला अमृताभिषेक करीत आहेत. खालचे दोघे कलश भरून वर देतात आणि वरचे ते कलश आपल्या शुण्डादण्डांत पकडून तिच्या मुकुटमंडित मस्तकावर एकत्र जुळवून तिला स्नान घालतात.



गजलक्ष्मी

हें कैलास-लेणें राष्ट्रकूट राजांनी इ. स. च्या ८ व्या शतकांत निर्माण केलें आणि आपल्या गजान्त वैभवाचें द्योतक म्हणून वर उल्लेखिलेलें लक्ष्मीचें चित्र त्यांनी या ठिकाणीं उभें केलें. त्या लेण्यांत प्रवेश करतांना यात्रिकाला या गजलक्ष्मीचें दर्शन चुकवितां येत नाही. त्यानंतर लक्ष्मीची जीं अनेक चित्रें आणि शिल्पें कलाकारांनी निर्माण केलीं, तीं बहुधा याच धर्तीचीं आहेत.

मत्स्य आणि विष्णुधर्मोत्तर या दोन पुराणांत लक्ष्मीची मूर्ति कशी आणि कोणत्या वस्तूंनी युक्त अशी निर्मावी, या संबंधांत कलावंतांना पुढील तपशील घालून दिलेला आहे —

संपत्तींत सुवर्णाला अग्रमान आहे आणि लक्ष्मी ही संपदेचें प्रतीक आहे. त्यासाठी तिचा वर्ण तप्त कांचनासारखा असावा. लक्ष्मी ही ' आर्द्रा ' आहे, असें वेदाचें श्रीसूक्त सांगतें. त्यासाठी तिची नेहमी जळाशीं जवळीक दाखवावी. अष्टदल अथवा सहस्रदल असें उमलतें कमळ हें तिचें आसन असावें. तिला चार हात असावे. एका हातीं कमळ असावें. दुसऱ्या हातीं अमृतपात्र असावें. तिसऱ्या हातीं शंख असावा. शंख हें समृद्धि, सौभाग्य आणि प्रतिभा यांचें प्रतीक आहे. शिवाय शंख हा विष्णूलाहि प्रिय आहे. चौथ्या हातीं श्रीफल म्हणजे बेलफळ असावें. बेलफळ हें वाटोळें असल्यामुळे हें पृथ्वीचें प्रतीक म्हणून तिच्या हातीं देण्याची योजना केलेली आहे. पृथ्वीदेवता आणि लक्ष्मी यांचा अविभाज्य संबंध आहे, हें यावरून सूचित केलेलें आहे. पण वाटोळें म्हणून बिल्वफलच कां? त्याचें कारण बिल्व हा लक्ष्मीच्या तपांतून निर्माण झालेला वृक्ष आहे म्हणून.

"आदित्यवर्णे तपसोऽधिजातो वनस्पतिस्तव वृक्षोऽथ बिल्वः"

या झाल्या लक्ष्मीच्या हातांतल्या वस्तू. यांशिवाय स्नान घालायला दोन हत्ती तिच्याजवळ असावे. चवऱ्या ढाळायला पाठीमागे दोन स्त्रिया असाव्या. आणि स्तोत्र करायला विद्याधर, यक्ष, गंधर्व, गुह्यक तिच्या अवतीभोवती किंवा अंतराळांत उडते असावे. म्हणजे गजलक्ष्मीचें साङ्ग, सपरिवार आणि सायुध असें चित्र पूर्ण झालें.

याशिवाय दुसऱ्या एका प्रकारचें लक्ष्मीस्वरूप मूर्तिकलेच्या इतिहासांत आढळतें. यांत तिच्याजवळ हत्ती नसतात आणि तिला भुजाहि दोनच असतात. तिने हातांत कमल आणि शंख या वस्तू घेतलेल्या असतात. तिच्या मस्तकावर अंतराळांत दोन विद्याधर तरंगत असतात. आणि राजलक्ष्मी, स्वर्गलक्ष्मी, ब्रह्मलक्ष्मी आणि जयलक्ष्मी, अशा तिच्याच अंशभूत असलेल्या चार नारी तिचीच परिचर्या करतात.

लक्ष्मी ही सागरकन्या आणि विष्णुवल्लभा आहे. देव-दैत्यांनी क्षीरसागराचें मंथन केलें आणि त्यांतून ही वर आली. तिच्या आविष्कारासरशीं समुद्र घुसळणाऱ्या सुरासुरांचे हात एकदम स्तंभित झाले. देखतां देखतां तिने सर्वांच्या नजरा चोरल्या आणि पाठोपाठ मनेंहि चोरलीं. देव, दैत्य, यक्ष, गंधर्व, ऋषी, मुनी, सारे तिच्या विश्वमोहक रूपावर पतंग झाले. तिच्या दंत-

पंक्तीचा रंग झळकतांच पाषाणांचे पद्मराग बनले. स्मिताने भूतलावर रत्न-राशी विखुरल्या. तिच्या पावलापावलागणिक सुवर्णकमळें उगवलीं.

तिला पाहतांच देवांचें दातृत्व सढळ झालें. प्रथम तिच्या पित्याने म्हणजे क्षीरसागराने तिला पिवळें रेशमी वस्त्र दिलें. वरुणाने वैजयंती माला दिली. विश्वकर्म्याने नाना परींचे अलंकार लेववले. सरस्वतीचें आणि लक्ष्मीचें निदान त्या वेळीं तरी वाकडें नसावें. कारण सरस्वतीने आपल्या गळ्यांतला रत्नहार काढून तिच्या गळ्यांत घातला. नागांनी तिच्या कानीं कुंडलें चढविलीं. ओक्या अवयवांनी वर आलेली लक्ष्मी एका क्षणांत सालंकृत झाली. आणि अशा त्या लक्ष्मीचें स्तोत्र करण्यासाठी ऋषि-मुनी लगेच पुढे आले. त्यांनी तिला श्रीसूक्ताने स्तविलें.

" कां सोस्मितां हिरण्यप्राकारामार्द्रां ज्वलन्तीं तृप्तां तर्पयन्तीम्
पद्मे स्थितां पद्मवर्णां तामिहोपह्वये श्रियम् ।"

तूं साक्षात् ब्रह्मरूपा आहेस. तुझ्या मुखावर मंदस्मित विलसत आहे. तूं स्वर्णावरणाने वेष्टिलेली आहेस. तूं आर्द्र, तेजोमयी, पूर्णकाम, भक्तांवर अनुग्रह करणारी, पद्मासना आणि पद्मवर्णा आहेस. तुला मी या ठिकाणीं आवाहन करीत आहें.

" चन्द्रां प्रभासां यशसा ज्वलन्तीं श्रियं लोके देवजुष्टामुदाराम्
तां पद्मिनीमीं शरणमहं प्रपद्येऽलक्ष्मीर्मे नश्यतां त्वां वृणे ।"

तुझी कांति चंद्राप्रमाणे सौम्य असून तूं यशाने दीप्तिमान् आहेस. तूं उदार आहेस आणि पद्महस्त आहेस. स्वर्गांत देव तुझी पूजा करतात. तुला मी शरण आलों आहें. तूं माझें दारिद्र्य दूर कर.

तिला आतां ताबडतोब आपलें स्वयंवर उरकून घ्यायचें होतें. म्हणून तिथे एकत्र झालेल्या समुदायांत आपल्याला योग्य असा वर कोण आहे, हें ती पाहूं लागली. स्तवनार्थ आलेले ऋषी तिच्या पुढेच होते. पण 'हे आज स्तोत्रें गातील आणि उद्या जरा कांहीं बिघडलें तर शाप देतील; तेव्हा असल्या कोपिष्टांचा संबंध नको,' असें मानून तिने ऋषींचा निरादर केला. गुरु-शुक्रांसारखे कांहीं ज्ञानवंत तिथे होते, पण त्यांच्या अंतरांतली आसक्ति तिला रुचली नाही. शिवशंकराजवळ आयुष्य अतूट होतें, पण तो पडला स्मशानवासी. असे अनेकांच्या गुणांबरोबरच त्यांचे दोषहि तिला आढळले. सगळे 'मला वर, मला वर'

म्हणून तिच्या पुढे पुढे करीत होते. पण कोणासाठीहि तिने आपले माळेचे हात वर उचलले नाहीत. तिच्या दृष्टीने सकलगुणालंकरण होता तो एकटा वैकुंठींचा राणा. पण तो तर तिच्याकडे पहातहि नव्हता. पण लक्ष्मी अभिमान दूर ठेवून आपण होऊन त्याच्याकडे गेली आणि तिने त्याच्या गळ्यांत माळ घातली. विष्णूने तिचा सप्रेम स्वीकार केला. वैकुंठांत जागा देण्याच्या आधी त्याने तिला आपल्या हृदयाच्या ठिकाणीं जागा दिली. विष्णूच्या सांवळ्या हृदयावर चांपे-गोरटी लक्ष्मी विराजित झाली. तें रंगसंगतीचें सौंदर्य निरखून कविमन उल्हासलें आणि त्याने आपला लक्ष्मीविषयींचा आदरभाव पुढील उपमांनी व्यक्त केला—

'निळ्या कमळांत जशी केसरांची रचना, कसोटीच्या दगडावर जशी सोन्याची रेघ, मेघमंडलावर जशी सौदामिनी, तशी विष्णूच्या हृदयावर विसावलेली ही लक्ष्मी आमचें रक्षण करो.'

लक्ष्मीला श्री असें दुसरें नांव आहे. आजमितीस श्री आणि लक्ष्मी हे एकमेकांचे पर्यायशब्द झाले आहेत. पण इतिहासाचा मागोवा घेतला तर श्री ही प्राचीन असून लक्ष्मी ही तिच्या मानाने अलीकडची आहे, असें दिसतें. वेदांच्या काळांत आणि वैदिक साहित्यांत शोभा, सुंदरता आणि सजावट या अर्थांनी 'श्री' शब्दाचा प्रयोग होत होता. जें जें सुंदर, कान्तिमान् आणि मांगलिक असेल, तें तें श्रीर (श्लील) या शब्दाने व्यक्तविलें जात असे. त्या प्राचीन काळीं या श्रीला मूर्ति नव्हती. ती केवळ भावात्मक होती. पुढे हळूहळू तिला मूर्त स्वरूप येऊं लागलें. शतपथ ब्राह्मणांत याविषयी एक कथा आहे—



विष्णु-लक्ष्मी मूर्ति

प्रजापति हा तप करीत होता. त्या तपश्चर्येच्या बळानें त्याच्या हृदयांतून श्री ही देवता देदीप्यमान अशा नारीरूपाने बाहेर आली आणि त्याच्यापुढे उभी राहिली. याचा अर्थ असा की, वैदिक मानवाच्या अंतरांत भावरूपाने वास्तव्य करणाऱ्या श्रीने प्रजापतीच्या काळांत देवीचें स्वरूप धारण केलें.

या देशांतली अवैदिक अशी दुसरी संस्कृति म्हणजे सिंधुसंस्कृति. त्या लोकांत मातृपूजा प्रचलित होती. माता म्हणजेच महामाया ही त्यांची प्रधान देवता होती. संस्कृति-संगमाच्या प्रक्रियेंत कोणत्या तरी काळांत श्री आणि माता या दोन देवता एकरूप झाल्या असणें शक्य आहे. श्री-देवतेचा लक्ष्मीशीं संबंध ऋग्वेदांत सांपडत नाही. तैत्तिरीय संहितेंत विष्णूची स्त्री या नात्याने लक्ष्मीच्या ऐवजीं अदितीचें आवाहन केलेलें आढळतें. तो मन्त्रद्रष्टा म्हणतो—

'पुष्कळ दूध देणारी आणि तेंहि सोपेपणें देणारी, कृपाळू आणि विश्वप्रपंचावर अधिराज्य गाजवणारी अदिति आमच्यावर अनुग्रह करो.'

मातृत्व हे लक्ष्मीचें वैशिष्ट्य आहे. कुठे कुठे तिची तुलना पृथ्वीशीहि केलेली असून तिच्या सहस्र स्तनांतून स्फूर्तिदायक दुग्धधारा सदैव स्रवत असतात, असेंहि म्हटलेलें आहे. क्वचित् स्तनांतून दूध गळत असल्याचें दाखवणाऱ्या श्रीमूर्तीहि आढळतात. यावरून वैदिकांची श्री अदितीशीं संलग्न होऊन मग अवैदिकांच्या मातृदेवतेशी संयोग पावलेली असावी, असा तर्क करतां येतो. मातृदेवता ही पृथ्वीचेंच प्रतीक आहे. अदिति, माता आणि पृथ्वी ह्यांचे हें जुने नातें लक्ष्मीच्या हातांत बिल्वफळ देऊन शिल्पकार सूचित करतात, असे समजायला हरकत नाही. अदिति ही पूर्ण रूपाने श्री नाही; पण तिचे कांही गुण नंतरच्या काळांत श्रीस्वरूपांत दाखल झाले आहेत, असें डॉ. अग्रवाल सांगतात. पुढे हीच श्री लक्ष्मीच्या रूपांत समाविष्ट झाली. लक्ष्मी क्षीरसागरांतून वर येतांच ऋषींनीं श्रीसूक्ताने तिचें स्तवन केलें, हें पुराणांतलें वर्णन श्री ही लक्ष्मीस्वरूपांत आपलें व्यक्तिमत्त्व विलीन करून मोकळी झाल्याचेंच निदर्शक मानतात.

भारतीय इतिहासांतला गुप्त साम्राज्याचा काल हा पुराणांच्या उत्कर्षाचा काल होय. या कालांत लक्ष्मीच्या पूजेला असामान्य महत्त्व मिळालें. गुप्त सम्राटांना आपल्या साम्राज्याचा विस्तार करायचा होता. उत्पादन व व्यापार यांच्याद्वारे संपत्तीचा संचय करायचा होता. साहित्यांत, ललित कलांच्या क्षेत्रांत, इतकेंच नव्हे; तर जीवनाच्या सर्व अंगांत सौंदर्य आणि समृद्धि आणायची होती. आणि याच कारणासाठी त्या काळचे राजे, वाणी, उदमी सारे लोक लक्ष्मीची उपासना करीत होते. गुप्त सम्राटांच्या शिक्क्यांवरहि लक्ष्मीचीच मूर्ति ठसवलेली असे. उज्जयिनी येथे सांपडलेल्या राजमुद्रांवरहि लक्ष्मीचें

चित्र दिसतें. तत्पूर्वींच्या बौद्धयुगांत मात्र लक्ष्मीचा विशेषसा आदर दिसत नाही. मिलिन्दपन्ह या ग्रंथांत तिच्या संप्रदायाला गुह्य मानलें असून ब्रह्मजाल-सुत्तांत तिची उपासना वर्ज्य ठरवलेली आहे. मात्र बौद्धांच्या कलेनें असले निषेध आणि नियंत्रणें मानलीं नाहीत.

उदाहरणार्थ, भरहूत येथील शिल्परचनेंत सिरिमा नांवाची एक देवता कोरलेली दिसते. तिच्या भोवती लक्ष्मीचा परिवार नाही. तथापि तिने उजव्या हातांत धरलेल्या कमलावरून आणि 'सिरि + मा' या सादृश्यावरूनहि तीं श्री म्हणजे लक्ष्मी आहे, हें सहजपणें ओळखतां येतें. सांची येथील एका स्तूपावर कमलवनांत उभी असलेली आणि दोहीं हातांत उत्फुल्ल कमलें धारण करणारी जी स्त्रीमूर्ति आहे, ती लक्ष्मीवाचून दुसरी कोण असूं शकेल! मथुरेचें शिल्प हाहि बौद्धांचाच कलाविलास आहे. तिथलें लक्ष्मीचित्र या सर्वांहून अधिक कलात्मक आणि रमणीय आहे. तिथे सर्वांत खाली पूर्ण कलश आहे. त्यांत एक सपत्र कमलगुच्छ आहे. त्यांतून लक्ष्मीची मूर्ति वर आलेली आहे. तिच्या-जवळ एक मोरांची जोडी आहे. आणि तिनें आपला डावा उरोभाग दाबून धरलेला आहे.



अभिनव लक्ष्मी

दक्षिणेंत महाबलिपुरम् या ठिका-णची लक्ष्मीमूर्ति भद्रासन घालून कमलावर बसली आहे. राजा रवि-वर्म्याचें कमलारूढ लक्ष्मीचें चित्र तर सर्वत्र पहायला मिळतें. आधुनिक कलाकारांपैकी श्री. सुनील पाल यांनी रेखाटलेलें लक्ष्मीचें चित्र अभिनव असून तें भारताच्या आगामी श्रीमंतीचें आणि महत्त्वाकांक्षेचें द्योतक आहे. गजलक्ष्मी आता मागे पडली. यापुढे भारतांतल्या आम जनतेसाठी अन्न-वस्त्राने परिपूर्ण अशा ग्रामलक्ष्मीचा उदय व्हायचा आहे. म्हणून या कलाकाराने आपल्या लक्ष्मीच्या उजव्या अंगाला शेतकामाचीं आणि डाव्या

अंगाला विणकामाचीं कांहीं दृश्यें चित्रित करून भारतलक्ष्मीला त्या परिवारांत उभी केली आहे.

क्षीरसागर हें लक्ष्मीचें माहेर. वैकुंठ हें तिचें सासर. पण ती या दोन्ही ठिकाणीं फारशी रहात नाही. तिचा पृथ्वीवर अखंड संचार चालू आहे. ती देशदेशान्तरीं हिंडते. कोणाकडे मोहरा करते तर कुणाकडे पाठ फिरवते. ती चपलचरणा आहे. सारे लोक तिच्या पाठीमागें धापा लागेपर्यंत धावतात. तसें करतांना गरीबदुबळ्यांना मागे रेटतात. आपल्यालाच तिची प्राप्ति व्हावी म्हणून पुष्कळदा दुसऱ्यांच्या मार्गांत काटे पेरतात. नीति-अनीतीचा विधिनिषेध न बाळगतां तिला खेंव देऊं पाहतात. पुष्कळदा अशाहि लोकांच्या कवेंत आणि कोशांत लक्ष्मी कोंडलेली दिसतेहि. निरुपाय म्हणून ती त्यांच्या हवेल्या उंच करते आणि घरींदारीं लखलखाट दाखवते. पण लक्ष्मीला मनापासून असे लोक आवडत नाहींत. आपलें खरें निवासस्थान कोणतें तें तिने स्कंदपुराणांत सांगून ठेवलें आहे. ती म्हणते—

धर्मपरायण, संयमी, निरहंकार, परोपकारी, प्रियभाषी आणि जनांवर प्रेम करणारा पुरुष मला आवडतो. त्याग, पावित्र्य आणि सत्य हे तीन महागुण ज्याने आपल्या अंगीं बाणवले, त्या सत्पुरुषाचें घर हें मी माझें निजाचें माहेर करतें. सत्त्वशील पुरुष आणि पतिव्रता स्त्रिया यांच्या भांडारांत मी कदाचित् नसेन. पण मी त्यांच्या मुद्रेवर झळकतें. मला कलह आणि मत्सर आवडत नाहीं. संकुचित मन आणि आपस्वार्थीपणा यांचा मी तिटकारा करतें. मी जिथें वास्तव्य करतें, तिथें धनधान्य, सुखसमृद्धि आणि यश-कीर्ति यांची विपुलता होते.

लक्ष्मीच्या मनांत सदैव एक शल्य आहे, तें आता सांगतों.

जे तिला अप्रिय असतात, तेच तिच्याभोंवती पिंगा घालतात. आणि जे तिला आवडतात ते—'लक्ष्मीं तृणाय मन्यन्ते।'

# सरस्वती

लक्ष्मी आणि सरस्वती. सुसंस्कृत जीवनाचीं दोन तुल्यबल अंगें. गणपतीच्या जशा ऋद्धि-सिद्धि, तशाच व्यक्तीच्या अथवा राष्ट्रपुरुषाच्या अधिदेवता—प्रत्यधिदेवता. जीवनविकासाला दोघींचीहि सारखीच आवश्यकता आहे. दोघीहि नसतील तर जीवन शून्य, शुष्क आणि निरानंद होईल. दोघींपैकी एकटीच असेल अन् दुसरी नसेल, तर जीवन एकारेल. जीवनांत लक्ष्मी किंवा श्री नसेल तर सरस्वतीने कशाचें गुणगायन करायचें ! आणि सरस्वती नसेल तर लक्ष्मी तरी आपला बडेजाव कशाच्या साह्याने दाखवणार ! लक्ष्मीला गौरवास्पद बनवलें तें तरी सरस्वतीनेच. रघुवंशाच्या, गुप्तराजांच्या आणि अशाच अनेक नरपतींच्या राजलक्ष्मीचीं वर्णने वाचा; म्हणजे त्यावरून लक्ष्मीचें मुख उज्ज्वल व्हायला सरस्वतीचा कुरवाळणारा हात त्याच्यावरून फिरला पाहिजे, हें कळून येईल. या दोघी जेव्हा 'आम्ही दोघी मैत्रिणी जोडीच्या' होतील, तेव्हाच जीवनाला दैवी कळा प्राप्त होईल.

या दोन्ही देवता प्राचीन आहेत, यांत वाद नाही. पण या दोघींत वडील कोण आणि धाकुटी कोण, का दोघीहि समकालीन, असा प्रश्न जिज्ञासु मनापुढे उभा राहील. याचें उत्तर पौराणिकांना शरण गेल्यास मिळूं शकतें. समुद्रमंथनांतून लक्ष्मीचा उदय झाला, तेव्हा तिच्या स्वागत-सत्कारासाठी जे देव, दैत्य, ऋषी, मुनी पुढे झाले, त्यांत सरस्वतीहि होती आणि तिने आपल्या गळ्यांतला रत्नहार काढून लक्ष्मीच्या गळ्यांत घातला होता, असें पुराणांवरून कळतें. आणि त्यावरून सरस्वती ही लक्ष्मीच्या आधीची ठरते.

मानवी इतिहासाकडे दूरवर नजर दिली तरीहि या गोष्टीची सत्यता पटेल. सरस्वतीइतकी प्राचीन देवता कोणतीच नाही. मानवाला पहिला साक्षात्कार झाला तो सरस्वतीचा. त्याने संपादिलेली पहिली कला म्हणजे वाणी अर्थात् सरस्वती. तिच्या प्राप्तीमुळेच तो पशूहून वेगळा ठरला. या वाणीच्या द्वारेंच जगांतल्या प्राथमिक मानवसंघाने एकमेकांना हाकारलें, एकमेकांच्या विचाराने शिकारी केल्या आणि शिकार मारल्यावर त्याला

स्फुरली नी गाणीं एका सुरांत गाऊन आपला आनंद व्यक्त केला. दगडाचीं, धातूचीं हत्यारें, मातीचीं भांडीं, मूर्ती, चित्रें इत्यादि साऱ्या विद्या-कला वाणीचा साक्षात्कार झाल्यानंतरच मानवाने मिळवल्या आहेत.



सरस्वतीमूर्ति

वाणी जेव्हा संस्कारिली जाते, तेव्हा तिला सरस्वतीचें स्वरूप प्राप्त होतें. पहिल्याप्रथम वाणीने सरस्वतीचा आकार धरला तो ऋषींच्या अंतःकरणांत. ऋषींनी प्रथम विश्वांतल्या वस्तूंना नामें देण्यासाठी तिला प्रेरणा दिली. निरागस आणि श्रेष्ठ असे जे भाव त्यांनी आजवर हृदयांत जतन करून ठेवले होते, ते त्यांनी सरस्वतीच्या साहाय्याने प्रकट केले. सुपाने सातू पाखडावे त्याप्रमाणे विचारवंतांनी जेव्हा शब्द आसडून पाखडून भाषा निर्माण केली, तेव्हा त्या वाणींत भद्र लक्ष्मीने आपला निधि ठेवून दिला. वाग्देवतेचा विस्तार झाला तो यज्ञाच्या मार्गांत, असे वेद सांगतो. ऋषींनी तिचा अंगीकार केला आणि तिला पुष्कळ विभागांत वांटलें.

याचा अर्थ सरस्वती ही वेदकालाइतकी प्राचीन आहे असा होतो. ऋग्वेदांत तीस पस्तीस ठिकाणीं सरस्वतीचे उल्लेख आणि प्रार्थना आल्या आहेत. मात्र त्यांतले बरेचसे उल्लेख सरस्वती नांवाच्या नदीविषयी आहेत.

'अंबितमे नदीतमे देवितमे सरस्वति'

या मंत्रांत आढळते ती सरस्वती नदी आहे. कारण सर्व नद्यांत श्रेष्ठ असें तिचें विशेषणच तिथे आहे. पण—

" प्रणो देवी सरस्वती वाजेभिर्वाजिनीवती । धीनामवित्र्यवतु "

या मंत्रांतली सरस्वती ही नदी नसून वाग्देवताच असली पाहिजे. कारण बुद्धीचें परित्राण करण्याचें सामर्थ्य वाग्देवतेंतच असूं शकतें; नदींत नव्हे.

सरस्वतीला 'भारती' असें दुसरें एक नांव आहे. आर्य भरतकुलाने या देशांत प्रथम पदार्पण केलें, प्रदेश मिळवला आणि नंतर त्याच्या बरोबरीने आलेल्या ऋषींनी येथे प्रथम यज्ञाग्नीची स्थापना केली आणि त्या अग्नीलाहि 'भरत' असें नांव ठेवलें. तसेंच त्या यज्ञांत देवतांचें आवाहन करणाऱ्या वाणीलाहि 'भारती' म्हणून गौरवलें. पुढे सरस्वती नदीच्या तीरावर जे शेकडो यज्ञ विस्तारले, जो अनेक कुलांतल्या ऋषींनी तिथे एकत्र जमून जो वेदघोष केला, कथा, गाथा, ऋचा यांचा संग्रह केला, त्यावरून लक्षणेने वाणीलाच सरस्वती हें नांव मिळालें असणें शक्य आहे.

पौराणिकांना या नदीरूप आणि वाणीरूप अशा दोन्ही सरस्वतीना एका सूत्रांत गुंफायचें होतें. त्यांच्यामध्ये घनिष्ट नातें आहे, हें दाखवायचें होतें. त्यासाठी त्यांनी एक कथा निर्माण केली आणि ती पद्मपुराणाच्या सृष्टिखंडांत दाखल करून टाकली–

या विश्वांत 'वडवाग्नि' नांवाचा एक निराळाच अग्नि चेतला. त्याची मानवांनाच नव्हे, तर देवांनाहि झळ पोचली. देव तापले, घामाघूम झाले. त्यांनी सरस्वतीला सांगितलें की, ' तूं हा अग्नि समुद्रांत नेऊन टाक आणि विश्वाचा ताप शमव. ' सरस्वती म्हणाली, ' मी नाही जा ! ' देव म्हणाले, ' कां एवढी हटून बसतेस ! ' ती म्हणाली की, ' मी कुमारी आहें. अग्नीच्या स्पर्शानें माझं कौमार्य भंगेल. '

यावर देव उठले आणि विधात्याकडे गेले. त्याला त्यांनी गळ घातली की, ' तुम्ही तुमच्या मुलीकडून एवढें काम करून घ्या आणि आमचा ताप दूर करा. ' देवांची विनंती मोडवेना म्हणून ब्रह्मदेवाने सरस्वतीला तशी आज्ञा केली. ती बिचारी रडत रडत त्या कामावर निघाली. रडतां रडतां ती सगळीच्या सगळी द्रवरूप, जलरूप झाली. मुलगी होती ती नदी बनली आणि पृथ्वीतलावर उत्तंक ऋषीच्या आश्रमाजवळ अवतरली. लगेच तिथे श्रीविष्णु प्रकट झाला. त्याने तो वडवाग्नि एका सुवर्णपात्रांत भरून तिच्या हवालीं केला. तो घेऊन तिने गुप्तरूपाने पश्चिम दिशेचा मार्ग धरला. मग ती

पुष्कर सरोवरापाशी वर आली आणि त्यानंतर तिचा प्रवाह तिथल्या अरण्यांतून वाट काढीत पुढे सुरू झाला.



ब्रह्मदेवाची प्रार्थना

यां कथेवरून कळतें तें हें की प्रथम ब्रह्मकुमारी होती, तीच पुढे कारणपरत्वे नदी झाली.

सरस्वती म्हणजे वाणी. हिच्या जन्माबद्दल वेदांत एवढेंच सांगितलें आहे कीं—

' देवीं वाचमजनयंत देवाः '

या दिव्य वाणीला देवांनी जन्माला घातलें. महाभारतांत तिला ब्रह्मदेवाची कन्या मानलें आहे. देवी भागवतांत मात्र तिच्या उत्पत्तीविषयीं स्वतंत्र कथा आहे—

गोपालकृष्णाची परमप्रिय राधा हिच्या जिव्हाग्रापासून सरस्वती जन्मली. मूर्तरूपाने अवरतांच तिने श्रीकृष्णाची कामना धरली. त्यावर श्रीकृष्ण तिला म्हणाला, ' देवी शारदे! तूं माझ्या या द्विभुज रूपाची कामना धरूं नको. माझें मूळचें चतुर्भुज आणि शाश्वत असें नारायणरूप आहे; त्यालाच तूं शरण जा आणि त्याच्याशीं संबंध जोडून कृतार्थ हो. '

या कथेंतला गर्भितार्थ निराळा आहे, असें मला वाटतें. ' परोक्षप्रिया इव हि देवाः ' असें वेदवचन आहे. देवांना सरळ अन् उघड बोलण्यापेक्षा वक्रोक्तीने किंवा ध्वनीने बोललेलें आवडतें. वरील कथेंत एक लपवलेला अर्थ आहे आणि तो अधिक हृदयंगम आहे. राधा म्हणजे आराधना, उपासना आणि तन्मूलक सिद्धि. ' राध् ' धातूचे पूजणें, प्रसन्न करणें, सिद्धीस नेणें, असे अर्थ आहेत, त्यावरूनच हें सूचित होतें. राधेवाचून म्हणजे आराधना-उपासना यावांचून सरस्वतीचा आविर्भाव होणें नाहीं. कविकुलगुरु कालिदासाने कालीची खडतर आराधना केली आणि मगच तो महामूर्खाचा महाकवि बनला. तुकोबांची

अभंगवाणीहि विठ्ठलाच्या आराधनेंतूनच प्रकट झाल्याचें आपल्याला माहीत आहे. वाल्ह्या कोळयाचा वाल्मीकि बनला तोहि आराधनेच्याच बळावर, हेंहि आपण पाहतों. तसेंच जयदेव, तुलसीदास इत्यादि अनेक कवींच्या रसवंतीला आराधनाच कारणीभूत आहे. काव्य हाहि एक योग आहे आणि तो 'ईश्वर-प्रणिधाना'वांचून साधायचा नाही.

याच कथेतला दुसरा अंश असा की, श्रीकृष्णाने सरस्वतीला द्विभुज-रूपाची म्हणजेच आपल्या नाशिवंत देहाची कामना न धरतां मूळ अविनाशी रूपाला मिठी घालायला सांगितलें. याचा सरळ अर्थ असा आहे की, सरस्वतीने जीवनांतल्या शाश्वत मूल्यांची जाणीव करून घेऊन त्यांचा आदर करायला हवा. पुष्कळदा हीं मूल्यें तात्कालिक आणि फसव्या मूल्यांच्या फेसाखालीं झाकोळलीं जातात. तीं शोधून आणि त्यांचा कलात्मक आविष्कार करून, त्यांना मानवी जीवनांत सुप्रतिष्ठित करणें, रसिक मानवाला त्यांच्या मोहरे लावणें, हेंच सरस्वतीचें जन्मसाफल्य आहे. जग फसलें, भोवऱ्यांत सापडलें तरी एक वेळ चालेल. पण सरस्वतीने कधीहि फसतां कामा नये. तिने कृत्रिम मोत्यांचे अलंकार धारण करून मिरवतां कामा नये. नारायणरूप म्हणजेच विश्वीं विश्वंभर जागवणें हेंच तिचें भूषण आणि हीच तिची कृतार्थता!

सरस्वती ही ब्रह्मदेवाची कन्या खरी; पण पुढे गायत्री आणि सावित्री ह्या दोन ब्रह्मपत्नींशीं एकजीव झाल्यामुळे पर्यायाने त्याची पत्नीहि ठरली. यजुर्वेदांत तिचें अश्विनौ देवांशीं नातें जोडून दिलें आहे. गणपति हा विद्या-दानी देव. तेव्हा कांही पुराणकारांनी सरस्वतीला त्याची अर्धांगी बनवली आहे. लक्ष्मीप्रमाणे सरस्वतीहि वैकुंठपतीचीच पत्नी असल्याचे उल्लेखहि पुराणां-तरीं आढळतात. तात्पर्य सरस्वतीचें गृहिणीपद नक्की कुठे आहे तें सांगणें कठीण झालें आहे.

यापुढे प्रश्न येतो तो वाहनाचा. देवतेला वाहन हें हवेंच. तें नसलें, तर ती कोणत्या साधनाने भक्तकाजासाठी धावून येईल! ब्रह्मदेवाचें वाहन हंस हें सुप्रसिद्ध आहे. अर्थात् घरचें आणि हक्काचें म्हणून सरस्वतीनेहि तेंच वाहन स्वीकारावें, हें सयुक्तिक वाटतें. 'आता नमूं ब्रह्मकुमारी। हंसारूढ वागीश्वरी' असें मराठी प्राकृत वाङ्मयांत तिचें नमन येतें. कांही ठिकाणीं तर सरस्वती ही स्वतःच हंसरूपिणी मानलेली आहे. भेडाघाटावरच्या सरोवरांत ती हंस-रूपाने विहार करते आणि आपलें 'सरस्वती' हें अभिधान सार्थ करते, असें

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........ नि: ..................
नों: दि: ..................

राजतरंगिणीकर्ता कल्हण सांगतो. इ. सनाच्या सहाव्या व सातव्या शतकांतलीं जीं सुवर्णनाणीं सापडतात, त्यांवर सरस्वतीच्या चरणांशीं हंसच बसलेला दिसतो, असें प्रा. गोडे सांगतात. सोळाव्या शतकापर्यंत झालेल्या हस्त-लिखित पोथ्यांवर सरस्वतीचीं चित्रें काढलेलीं दिसतात, त्यांतहि तिला हंसावरच बसवलेलें आहे. जैनांचा पहिला तीर्थंकर भगवान् ऋषभदेव हा होय. त्याच्या शासनदेवतेचें नांव 'चक्रेश्वरी' असें आहे. ही चक्रेश्वरी म्हण-जेच आपली सरस्वती. तिचें वाहनहि हंस हेंच आहे.

मग सांप्रत कालीं तिला मोरावर बसवतात तें कां ? आपलीं मुलें पाटी-पूजनाच्या वेळीं मोरावरची सरस्वती काढतात तें कां ? ग्रंथारंभीं गणपति-सरस्वतीचें नमन होतें, त्याप्रमाणे कोकणांत दशावतारी खेळ होतात. त्यांत पहिलें सोंग गणपतीचें आणि दुसरें सरस्वतीचें यायचें हें ठरलेलें आहे. ही सरस्वती नेसलेल्या लुगड्यावर मोराचें उत्तमांग बांधून नाचत नाचत रंग-भूमीवर येते. ' तुझें नियोजित नाटक लोकरंजक आणि यशस्वी होईल ' असा सूत्रधाराला आशीर्वाद देते आणि निघून जाते. तेव्हा हंसाला मागे टाकून मोराने तें स्थान पटकावलें तें कां असा साहजिकच प्रश्न येतो. त्याचें उत्तर प्रा. गोडे पुढीलप्रमाणे देतात—

' जैन ग्रंथांची या दृष्टीने पाहणी करतांना असें समजून येतें की जैनांची श्रुतदेवी किंवा विद्यादेवी ही आपल्या सरस्वतीसारखी आहे. श्वेतांबर जैनांची सरस्वती हंसवाहना तर दिगंबर जैनांची मयूरवाहना आहे. तेव्हा महाराष्ट्रांत प्राचीन काळाच्या दिगंबर जैनांच्या प्रभावामुळे हिंदु धर्मीयांत मयूरवाहना सरस्वती रूढ झाली असली पाहिजे. '

सरस्वतीच्या ध्यानाचा सर्वपरिचित श्लोक पुढीलप्रमाणे आहे—

" या कुंदेंदुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता
या वीणावरदंडमंडितकरा या श्वेतपद्मासना ।
या ब्रह्माच्युतशंकरप्रभृतिभिर्देवैः सदा वंदिता
सा मां पातु सरस्वती भगवती निःशेषजाड्यापहा ॥ "

सरस्वतीचें हें ध्यान शुभ्रवर्णी व शुभ्रवस्त्रांनी वेष्टित आहे. हंस हें तिचें प्राचीन वाहनहि शुभ्र वर्णाचेंच आहे. विद्या किंवा ज्ञान हें सत्त्वगुणाचें कार्य आहे आणि सत्त्वाचा वर्ण शुभ्रच मानलेला आहे. सरस्वती ही लक्ष्मी-

प्रमाणे अलंकारांनी झळकत नाही. ती हृदयांत ठसते ती तिच्या धवलकांतीने आणि सत्त्वगुणाच्या सौंदर्याने.

महाराष्ट्रांत सरस्वतीचीं मूर्तिशिल्पें सहसा आढळत नाहीत, असें श्री. ग. ह. खरे सांगतात. सरस्वती ही ब्रह्मा, विष्णु किंवा गणपति यांची पत्नी या नात्याने असेल, तेव्हा ती त्यांच्या डाव्या अंगास वीणा घेऊन उभी असते. स्वतंत्र असेल तेव्हा बहुधा बसलेली असते. 'रूपावतार' या ग्रंथांत तिची मूर्ति बनवतांना अक्षमाला, पुस्तक आणि कमल या तीन वस्तू तिच्या तीन हातांत दिल्या पाहिजेत, असा नियम घालून दिलेला आहे.



वीणावादिनी
चित्रकार : नंदलाल बसु

अक्षमाला ही जप, आवृत्ति किंवा अभ्यास या गोष्टी सूचित करते. स्वाध्याय आणि चिंतन यावांचून विद्येला स्थैर्य आणि गांभीर्य नाही, हें तत्त्व या अक्षमालेच्या द्वारें सांगायचें आहे. पुस्तक हें सरस्वतीच्या विलासाचें स्थान आहे आणि कमल हें सहसा कोणत्याहि देवतेचा संबध सोडीत नाहींच. श्री, शोभा आणि मंगल, या गोष्टी सुचवणारें तें सम्राट् प्रतीक आहे.

आश्विनाच्या शुक्लपक्षांत मूळ नक्षत्रावर सरस्वतीचें आवाहन करावें, पूर्वा-उत्तराषाढा या नक्षत्रांवर तिचें पूजा-बलिदान करावें आणि श्रवणावर तिचें विसर्जन करावें, असें धर्मशास्त्राने सांगितलेलें आहे. नवरात्रांत येणाऱ्या त्या तिथींना घरांतलीं पोथ्या पुस्तकें झाडून झटकून एकत्र मांडून त्यांची पूजा करण्याची रूढि महाराष्ट्रांत सर्वत्र आहे. ते चार दिवस अनध्यायाचे समजतात.

सरस्वती ही सकळ मानवांना उपास्य आहे. तें दिव्य आणि अव्यय असें 'परम धाम' आहे. ती मोहरूपी अंधकार नष्ट करून ज्ञानाचा प्रकाश देते.

ती बुद्धीचें जडत्व दूर करून तिला प्रगल्भता आणते. योग्य प्रकारें तिची उपासना केल्यास ती 'कामधेनु' होते. जिव्हेला दुष्प्राप्य असा 'मधू'चा प्रवाह ती वाहवते.

"करबदरसदृशमखिलं भुवनतलं यत्प्रसादतः कवयः ।
पश्यंति सूक्ष्ममतयः सा जयति सरस्वती देवी ॥"

हिच्या प्रसादाने क्रांतदर्शी कवींना अखिल ब्रह्मांड हें तळहातावरच्या बोराप्रमाणे पाहतां येतें, जाणतां येतें. अशा या सरस्वतीचा जयजयकार असो !



# दीपज्योत

दिवाळीचे दिवस हे आश्विनाच्या अखेरीचे असतात. वद्य चतुर्दशी आणि अमावास्या म्हणजे ऐनजिनसी अंधाराच्या रात्री. त्या दिवसांत चंद्र-सूर्यांची एका घरीं गाठ पडते आणि त्या भेटींत चंद्रमा आपल्या सगळ्या कळा हरवून बसतो. त्यामुळे त्या दोन रात्रीं पृथ्वीतलावर अंधाराचें आवरण पसरतें. त्यांतून शरत्कालीन पळपुटे मेघ दाटून आलेले असले, तर तो अंधार अधिकच काळाकुट्ट होतो. असल्या या घन अंधकाराचें वर्णन एका संस्कृत कवीने पुढीलप्रमाणे केलें आहे—

“ लिम्पतीव तमोऽगानि वर्षतीवाञ्जनं नभः
असत्पुरुषसेवेव दृष्टिर्निष्फलतां गता ”

सर्वांगाला तमाचा जणू लेप बसतो. आभाळ जणू काजळाचा वर्षाव करतें. आणि आपली दृष्टि ? ती असत्पुरुषाच्या केलेल्या सेवेप्रमाणे निष्फळ होते.

पण दिवाळी येते ती ह्या अमावास्येचा अंधार उजळीत अन् प्रकाशाची पखरण करीत. दिवाळी याचा अर्थ दिव्यांची रांग, दीपशोभा किंवा दीपोत्सव. दिवाळीचा पहिला दिवा लागतो तो धनत्रयोदशीच्या रात्रीं. ती पणती यम-राजाच्या प्रसन्नतेसाठी प्रज्वलित करायची असते. या विधीला ‘यमदीपदान’ असेंच नांव आहे. यम म्हणजे कृतान्त काळ ! सान-थोर, राव-रंक, सज्जन-दुर्जन, यांपैकी कोणाचीहि गय न करतां फास घालून त्यांचा जीव बाहेर काढणारा. त्याला दीपदान करायचें ? म्हणजे सापाला दूधच पाजायचें कीं ! पण ही आशंका दूर होण्यासाठी पुढची कथा वाचावी--

एक दिवस यमाने आपल्या दूतांची सभा बोलावली. त्यांच्याकडून काम-काजाचें इतिवृत्त ऐकलें. मग सहज खेळीमेळींत आल्यासारखें करून त्याने यमदूतांना विचारलें.

“तुम्ही जीवांचे प्राणहरण करतां, त्यांच्या गळ्याभोवती फास आवळतां, तेव्हा तुम्हांला कधी दुःख होत नाही का रे ? ”

त्यावर एक यमदूत हात जोडून नम्रपणें म्हणाला.

ती बुद्धीचें जडत्व दूर करून तिला प्रगल्भता आणते. योग्य प्रकारें तिची उपासना केल्यास ती 'कामधेनु' होते. जिव्हेला दुष्प्राप्य असा 'मधू'चा प्रवाह ती वाहवते.

" करबदरसदृशमखिलं भुवनतलं यत्प्रसादतः कवयः ।
पश्यंति सूक्ष्ममतयः सा जयति सरस्वती देवी ॥ "

हिच्या प्रसादाने क्रांतदर्शी कवींना अखिल ब्रह्मांड हें तळहातावरच्या बोराप्रमाणे पाहतां येतें, जाणतां येतें. अशा या सरस्वतीचा जयजयकार असो !



# दीपज्योत

दिवाळीचे दिवस हे आश्विनाच्या अखेरीचे असतात. वद्य चतुर्दशी आणि अमावास्या म्हणजे ऐनजिनसी अंधाराच्या रात्री. त्या दिवसांत चंद्र-सूर्यांची एका घरीं गाठ पडते आणि त्या भेटींत चंद्रमा आपल्या सगळ्या कळा हरवून बसतो. त्यामुळे त्या दोन रात्रीं पृथ्वीतलावर अंधाराचें आवरण पसरतें. त्यांतून शरत्कालीन पळपुटे मेघ दाटून आलेले असले, तर तो अंधार अधिकच काळाकुट्ट होतो. असल्या या घन अंधकाराचें वर्णन एका संस्कृत कवीने पुढीलप्रमाणे केलें आहे—

"लिम्पतीव तमोऽङ्गानि वर्षतीवाञ्जनं नभः
असत्पुरुषसेवेव दृष्टिर्निष्फलतां गता"

सर्वांगाला तमाचा जणू लेप बसतो. आभाळ जणू काजळाचा वर्षाव करतें. आणि आपली दृष्टि? ती असत्पुरुषाच्या केलेल्या सेवेप्रमाणे निष्फळ होते.


पण दिवाळी येते ती हा अमावास्येचा अंधार उजळीत अन् प्रकाशाची पखरण करीत. दिवाळी याचा अर्थ दिव्यांची रांग, दीपशोभा किंवा दीपोत्सव. दिवाळीचा पहिला दिवा लागतो तो धनत्रयोदशीच्या रात्रीं. ती पणती यम-राजाच्या प्रसन्नतेसाठी प्रज्वलित करायची असते. या विधीला 'यमदीपदान' असेंच नांव आहे. यम म्हणजे कृतान्त काळ! सान-थोर, राव-रंक, सज्जन-दुर्जन, यांपैकी कोणाचीहि गय न करतां फास घालून त्यांचा जीव बाहेर काढणारा. त्याला दीपदान करायचें? म्हणजे सापाला दूधच पाजायचें कीं! पण ही आशंका दूर होण्यासाठी पुढची कथा वाचावी––

एक दिवस यमाने आपल्या दूतांची सभा बोलावली. त्यांच्याकडून काम-काजाचें इतिवृत्त ऐकलें. मग सहज खेळीमेळींत आल्यासारखें करून त्याने यमदूतांना विचारलें.

"तुम्ही जीवांचे प्राणहरण करतां, त्यांच्या गळ्याभोवती फास आवळतां, तेव्हा तुम्हांला कधी दुःख होत नाही का रे?"

त्यावर एक यमदूत हात जोडून नम्रपणें म्हणाला.

" महाराज, रोज उठून तेंच काम करायचं, तेव्हा तिथे दुःखाला कुठली जागा ! 'रोज मरे त्यास कोण रडे' अशी माणसांनीच एक म्हण बनवून ठेवली आहे. तीच गत आमची. पण एका प्रसंगीं मात्र खूप वाईट वाटलं आम्हांला. "





दीपलक्ष्मी

"कोणत्या वेळीं ?" यमानें विचारलें.

" त्या हेमराजाच्या तरुण पुत्राचा जीव आणतेवेळीं. तो नवसासायासानं झालेला मुलगा. पण सटवीनं येऊन राजाला सांगितलं, की 'तुझा हा मुलगा लग्न झाल्यानंतर चार दिवसांत मरेल.' हेमराजाच्या काळजांत भाला बसला. त्यानं त्या मुलाला राजवाड्याच्या बाहेर काढून यमुनेच्या एका खोऱ्यांत लपवून ठेवलं. तिथेच तो वाढला. त्याला सोळावं वर्ष लागलं. राणीच्या आग्रहा खातर त्यानं राजपुत्राचं लग्न करायचं ठरवलं. सोयरीक जमली. लग्नसोहळा थाटामाटानं पार पडला. पुढे लग्नाचा चौथा दिवस उजाडला. त्या दिवशीं सटवीनं त्याचा मृत्यु नेमला होता; म्हणून आम्ही तिथे गेलों आणि पाश टाकून त्याचा प्राण बाहेर काढला. त्यासरशी त्याच्या नव्या नवरीनं जो हंबरडा फोडला, तो हृदयभेदक होता. तो ऐकून आमचं काळीज दुभंगलं. पण करायचं काय ! आम्ही आपल्या हुकमाला बांधलेले. त्या राजपुत्राला आम्ही यमलोकीं आणलं. पण पुढे कितीतरी दिवस त्या नववधूचा तो आक्रोश आमच्या कानांत घुमत राहिला होता... महाराज ! आपल्याला एक विचारायचं आहे. "

" काय विचारणार आहेस ?" यमराज बोलला.

" ऐन तारुण्यांत होणारे हे मानवी प्राण्यांचे अपमृत्यु टळायला एखादा उपाय नाही का ?"

" नाही कां ? एक उपाय आहे. माणसं जर धनत्रयोदशीला प्रदोषकाळीं मला दीपदान करतील, तर त्यांचा अपमृत्यु टळेल. "

तें ऐकून यमदूतांना आनंद वाटला.

वरील कथेंत दीपदानाचें माहात्म्य सांगितलेलें आहे. अंधार म्हणजे मृत्यु आणि प्रकाश म्हणजे जीवन, असाच अर्थ यांतून निष्पन्न होतो. अंधारांत चिंता, रोग, मृत्यु आणि यमदूत यांना राहायला जागा मिळते. प्रकाशात या सर्वांचा परिहार होतो. जिथे जिथे दीपज्योत पाजळते, तिथे तिथे प्रकाश तर येतोच; पण त्याचबरोबर तो उल्हास, पावित्र्य आणि शुभकामना यांनाहि घेऊन येतो. दिव्यतेचें लक्षण काय, तर प्रकाश! 'प्रकाशलक्षणा देवाः!' आपल्या तत्त्वज्ञानांत आत्म्याला ' स्वयंप्रकाश ' आणि ' स्वयंज्योति ' असें म्हटलें आहे. दीपज्योत ही अशा स्वयंप्रकाशित आत्मराजाचें प्रतीक म्हणून पुढे आली आहे. दीपज्योत म्हणजे उपाधींच्या आवरणांतून मुक्त होऊन स्वतः-सकट इतरांनाहि प्रकाश देणारी आत्मज्योत होय.


म्हणूनच भारतीय संस्कृतीने दीपोत्सव आणि दीपदान यांना फार मोठें स्थान दिलें आहे.

"दीपज्योतिः परं ब्रह्म दीपज्योतिर्जनार्दनः
दीपो हरतु पापानि संध्यादीप नमोऽस्तु ते"

या श्लोकांत सांध्यदीपाला पापहारक मानून त्याला परब्रह्माशीं तुळिलें आहे. म्हणूनच भारतीय गृहिणी तिन्हीसांजा झाल्या की, देवघरांत देवाजवळ आणि अंगणांत तुळशीवृंदावनापुढे सांजवात लावते आणि आपल्या मुलांना म्हणायला लावते–' दिव्या दिव्या दीपत्कार, कानीं कुंडल मोतीहार, दिव्याला देखून नमस्कार. '

ही दीपज्योत भारतीय संस्कृतींत अनेक नामरूपांनी वावरते. दिवाळीच्या वेळीं आकाशांत उंच जाऊन लटकणाऱ्या दिव्याला 'आकाशदिवा' म्हणतात. तो स्वर्गांत कुळाच्या पितरांना प्रकाश देतो आणि त्यांचा प्रवास-मार्ग उजळून टाकतो. लग्नकार्यांत एक लामणदिवा रोवळींत ठेवतात आणि त्या रोवळीभोवती खण गुंडाळतात. लग्नाच्या वेळीं करवली तो दिवा हातीं धरून वधू-वरांच्या मागे उभी राहते. त्याला म्हणतात ' शकुनदिवा. ' पिठोरी आमावास्येला कणकेचे किंवा तांदळाच्या उकडीचे दिवे करून त्यांची पूजा

करतात. मंगळागौरीच्या पूजेंत आणि लग्नांतल्या ऐरिणीदानाच्या झालीं- तहि असेच दिवे असतात, त्यांना 'पिष्टदीप' असें म्हणावें. देवपूजेच्या वेळीं किंवा कोणत्याहि मंगलविधींत साक्षी म्हणून एक दिवा तेवत ठेवलेला असतो, त्याला 'स्थापित दीप' म्हणतात. शिवाच्या देवालयांत बारा मास आणि अष्टौप्रहर अखंड तेवत राहणारा एक दिवा असतो त्याला 'नंदादीप' असें नांव आहे. शोधूं गेल्यास आणखीहि असे वेगवेगळया प्रकारचे दिवे आढळूं शकतील.



दीपाराधना

दिवाळीच्या पाडव्यास पत्नी पतीला ओवाळते. भाऊबिजेच्या दिवशीं बहिण भावाला ओवाळते. मांगलिकांत पुरंध्री वधू-वरांना ओवाळतात. 'वाजिनीराजनाविधि' म्हणून घोड्यांना ओवाळण्याच्या रूढीचा कालिदास उल्लेख करतो. आजहि आपण पोळयाच्या दिवशीं बैलांना आणि दिवाळीच्या पाडव्यास गाईवासरांना ओवाळतों. या ओवाळण्याला 'औक्षण' म्हणतात. औक्षण म्हणजे आयुष्यवर्धन. तें दीपज्योतीच्या साधनाने करायचें व चिंतायचें.

विष्णूच्या अथवा विठ्ठलाच्यां देवळांत रात्रीं शेजारती आणि पहाटे कांकडारती करतात हे सर्वांना परिचित आहेच. काशी, प्रयाग, हरिद्वार या ठिकाणीं जाणारे यात्रेकरू संध्यासमयीं घाटावर जातात. तिथे एका द्रोणांत फुलें भरतात. त्यांत एक फुलवात ठेवून ती प्रज्वलित करतात. आणि अशा या सपुष्प दीपज्योती मग हलक्या हाताने गंगामैय्याच्या प्रवाहांत सोडून देतात. त्या शेकडो दीपज्योती प्रवाहाबरोबर वाहतांना एकमेकींना खेटूं लागल्या, किंवा विलग होऊं लागल्या, किंवा खालच्या जललहरींवर नाचत नाचत

कधी संथ तर कधी द्रुतगतीने जलप्रवास करूं लागल्या, की ती शोभा पाहून आपली आत्मज्योतहि हृदयांत ‘ टिम् टिम् ’ करायला लागते. त्यावेळीं असें वाटतें, की आकाशांतल्या तारकासुंदरीच पृथ्वीतलावर गंगास्नानासाठी उतरल्या आहेत. हे सर्व दीपज्योतींचे मनाला प्रसन्नता देणारे मधुर उपयोग आहेत. कोणतेंहि मांगलिक असो, अथवा कोणताहि सोहळा असो, त्यांत दीपज्योत अधिकाराने मिरवते. तिला वगळा की, सगळा उदासवाणा देखावा !

दीपदानाचा महिमाहि तसाच आहे. कार्तिकमासांत अथवा माघमासांत पहाटे स्नान केल्यावर दीपदान करायचें असतें. अधिकमासाला पुरुषोत्तममास असें नांव आहे. त्या मासांत पुरुषोत्तमाच्या प्रसन्नतेसाठी अनरश्यांच्या वाणापेक्षाहि दीपदानाला विशेष महत्त्व आहे. भाविक माणसें परलोक सुखावह व्हावा म्हणून जीं अनेक दानें, महादानें इहलोकींच देऊन ठेवतात, त्यांमध्ये दीपदानहि वगळलें जात नाही. आपला प्राणपक्षी देहाच्या पिंजऱ्यांतून उडून गेल्यावर, कुडी अन् आत्मराज यांचा वियोग झाल्यावर, अव्यक्ताच्या तमोमय प्रदेशांतून कराव्या लागणाऱ्या त्या महाप्रवासांत दान दिलेल्या दीपज्योतीने अचानक पुढे प्रकट होऊन, जात्या जिवाला मार्ग दाखवावा, ही त्या दानांत अपेक्षा असते.

दीपज्योतीने नृत्यकलेच्या प्रांगणांतहि प्रवेश केला आहे. हातांत, तोंडांत अन् डोक्यावर पेटत्या समया घेऊन नृत्य करतात, त्याला ‘ दीपनृत्य’ अशी संज्ञा आहे. व्रजमंडलांतल्या लोकनृत्यांत ‘चरकला नृत्य’ नांवाचें एक मनोहर नृत्य आहे. हेंहि दीपनृत्यच असून होळीच्या नंतर द्वितीया ते पंचमी या तीन दिवसांत त्याचे प्रयोग होतात. चरकला म्हणजे लाकडाचा पिंजरा. त्यांत दिवे लावतात आणि तो एका लोखंडी घड्याच्या तोंडावर ठेवतात. हा लोहघट सुमारे वीस शेर वजनाचा असतो. तो घडा एका विवक्षित स्त्रीच्या डोक्यावर देतात. घडा डोक्यावर घेऊन नाचणारी ही ग्रामनर्तिका एक वर्ष आधी निवडली जाते. एवढें अवजड ओझें शिरावर पेलतां यावें म्हणून वर्षभर दह्यादुधाचा रतीब लावून तिला पुष्ट करतात. तिच्या जीवनांत स्वास्थ्य निर्माण करून देतात.

आणि मग ती नृत्याची रात्र उगवते. त्या प्रसंगीं गावांतला सारा स्त्रीपुरुषसमाज एका मोठ्या मैदानांत एकत्र जमतो. लगच ढोल वाजूं लागतात.

नृत्यासाठी नियुक्त केलेली ती ललना नटूनथटून नृत्यस्थानीं दाखल होते. तो दीपज्योतींनी पाजळणारा अवजड 'चरकला' डोक्यावर घेते. त्याशिवाय आणखीहि दोन दिवे आपल्या दोन्ही हातांत घेते. मग तें लोकप्रिय नृत्य सुरू होतें. कित्येक तास तें चालतें. नृत्य करीत असतांना तिला डोक्यावरच्या त्या घड्याचा तोल हात न लावतां संभाळायचा असतो. कारण तिचे हात मोकळे नसतात. पण वर्षभराच्या अभ्यासाने तिला तेवढें नैपुण्य प्राप्त झालेलें असतें. तिच्या शिरावरच्या त्या दीपज्योती विझतहि नाहीत आणि पडतहि नाहीत. वसंतऋतूच्या प्रकाशमय स्वागतासाठी या नृत्याचें आयोजन होतें.



दीपनृत्य

आमच्या गोव्यांत 'दिवजांची जत्रा' प्रसिद्ध आहे. त्यासाठी देवस्थानांत डेऱ्याच्या आकाराचीं मातीचीं मालीं करून ठेवलेलीं असतात. तीं बनवतांनाच त्यांत पणत्यांसारख्या खोलगट जागा सर्वत्र तयार केलेल्या असतात. जत्रेच्या वेळीं तें 'मालें' तेलवात करून सर्वांगीं परजळायचें आणि मग ज्याचा तो मान अथवा नवस असेल, त्याने तें डोक्यावर घेऊन देवळाला प्रदक्षिणा घालायची.

दीपज्योत म्हणजे ज्योतिर्मयी लक्ष्मी ! ज्या ज्या वस्तूंत तेज आणि सौंदर्य यांचा आविष्कार दिसतो, त्या त्या वस्तूची कल्पना आपण दीपकाच्या रूपकानेच करतों. म्हणूनच भारतीय संस्कृतीने कुलाला प्रकाश देणाऱ्या सुपुत्राला 'कुलदीपक' म्हणून गौरवलें आहे. एवढें कशाला; एका कवीने ईश्वराचें ध्यानहि दीपकरूपानेच केलें आहे.

" जय जगमंदिरदीपक सुंदर श्रीव्रजदूलह देवसहायी "

इथे व्रजमोहन श्रीहरीला विश्वमंदिरांतला दीपक मानलें आहे. सूर्याचें एक नांवहि दीपक असेंच आहे. ' प्रभाते दीपको रविः ! '

काव्याच्या प्रांतांत रसरसल्या लावण्यसुंदरीला, यौवनाच्या उद्यानांत सलील पदार्पण करणाऱ्या नवतरुणीला, दीपज्योत म्हणूनच कांही कवींनी गौरविलें आहे. रघुवंशाचा सहावा सर्ग पहा. त्यांत वैदर्भी इंदुमतीच्या स्वयंवराचा प्रसंग आहे. देशोदेशींचे राजपुत्र इंदुमतीच्या प्राप्तीच्या आशेने त्या स्वयंवर मंडपांत आसनस्थ झाले आहेत. इंदुमती हातांत वरमाला घेऊन त्या राजपुत्रांच्या रांगेंतून एकेकाचा परिचय करून घेत पुढे पुढे चालली आहे. त्या प्रसंगीं कालिदास म्हणतो—

"संचारिणी दीपशिखेव रात्रौ यं यं व्यतीयाय पतिंवरा सा ।
नरेंद्रमार्गाट्ट इव प्रपेदे विवर्णभावं स स भूमिपालः ॥"

अंधारांत राजमार्गावरून दीपज्योत जाऊं लागली, की जवळचीं घरें एकदम प्रकाशित होतात आणि ती पुढे गेली की पुनश्च त्यांवर अंधार पसरतो. तशीच ही 'दीपशिखा' इंदुमती ज्या ज्या राजपुत्राच्या जवळ गेली, त्याचें त्याचें मुख आशेने उज्ज्वल झालें आणि तिथून ती पुढे सटकतांच त्या त्या सर्व राजपुत्रांचीं मुखें निराशेच्या अंधाराने काळवंडलीं.

हें झालें संस्कृत काव्यासंबंधी. पण तुम्ही निरनिराळ्या भाषांच्या जनपदांत गेलांत तर तिथल्या लोकसाहित्यांतहि पणती किंवा दिवा यांच्याविषयींच्या कांही काव्यपंक्ती तुमच्या कानीं झळकून जातील. हिंदी लोकसाहित्यांतल्या अशा कांही 'पहेलियाँ' म्हणजे उखाणे श्री. देवेंद्र सत्यार्थी यांनी एका ठिकाणीं दिले आहेत.

"एक राजाकी अनोखी रानी; नीचेसे वह पीवे पानी"

एका राजाची ही खालून पाणी पिणारी सुंदर राणी पणतीवांचून दुसरी कोण असूं शकेल !

तसाच हा आणखी एक दुसरा उखाणा. हा तुमच्या बुद्धीला संकट घातल्यावांचून राहणार नाही—

"एक नारने अचरज किया, साँप मार पिंजरेमें दिया
ज्यों ज्यों साँप तालको खाय, सूखे ताल साँप मर जाय !"

एका नारीने म्हणे आश्चर्य केलें. तें कोणतें ? तर साप मारून पिंजऱ्यांत टाकला. तो मेलेला साप हळू हळू तळें चाखूं लागला. पुढे काय झालें ? तळें आटलें अन् त्या सुकलेल्या तळ्यांत साप मरून पडला. यांतली नारी म्हणजे

ज्योत, साप म्हणजे वात आणि तळें म्हणजे पोटांत तेल भरून घेणारी पणती, एवढा अर्थ लक्षांत यायला थोडा वेळ तरी मेंदू शिणवावा लागेलच.

यावरून आपल्याला कळतें, की नागर संस्कृतीपासून तो जानपद संस्कृतीपर्यंत दीप-ज्योतीने केवढें साम्राज्य प्रस्थापित केलें आहे. दीपज्योत ही खरोखर भारतीय संस्कृतीची लाडकी लेक आहे. बाह्य जगांत तसेंच आंतर जगांतहि तिने स्वतःला मानाचें स्थान मिळवून घेतलें आहे. 'तमसो मा ज्योतिर्गमय' म्हणजे 'मला अंधकारापासून प्रकाशज्योतीकडे घेऊन जा' ही उपनिषदांतल्या ऋषींची प्रार्थना मोक्षसाधकांच्या मुखांतूनच नव्हे; तर रोम-रोमांतून बाहेर पडत असते. ती एक सार्वभौम प्रार्थना झाली आहे. दुसऱ्या एका ऋषीने 'बुद्धिर्दीपकला' म्हणून बुद्धीलाच दीपकळी मानलें आहे. भगवान् बुद्ध एका प्रसंगीं आपल्या भिक्षूंना उपदेश देतात, की 'अत्तदीपा भवथ !' तुम्ही आत्मदीप व्हा. आत्मप्रकाशानेच उजळून निघा.

परमार्थ-मार्गांत ही दीपज्योत म्हणजेच आत्म्याची चित्कला ! ती प्रकाशित असतेच; पण कित्येकदा झांकुळते, फुरफुरते, फटफटते. या किंवा त्या बाजूला डोल घेते. वाऱ्याच्या झुळकेबरोबर वेडीवाकडी नाचतेसुद्धा. त्या दीपज्योतींतलें हें कार्पण्य आहे. ही अपूर्णता आहे. ही अतृप्ति आहे. ही विकारजनित चंचलता आहे. ती नाहीशी झाली पाहिजे. यासाठीच त्या आत्म-ज्योतीला शीत-उष्ण, प्रिय-अप्रिय, सुख-दुःख, हर्ष-शोक, इत्यादि द्वंद्वांच्या वाऱ्यापासून दूर ठेवली पाहिजे. निर्वात प्रदेशांत तिची स्थापना केली पाहिजे. मग ती ताठ उभी राहील. मग हालणार नाही की डोलणार नाही. स्थिर आणि अविच्छिन्न असा प्रसन्नतेचा प्रकाश तिच्यांतून पसरेल. विकारांची काजळी धरणार नाही. 'तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता !' हीच सच्चिदानंद आत्म्याची स्थितप्रज्ञावस्था. हीच ब्राह्मी स्थिति. हिलाच वाखाणतांना भगवान् श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात. आत्मज्योत कशी राहिली पाहिजे ?

"यथा दीपो निवातस्थो नेंगते सोपमा स्मृता"



# योगीश्वर आणि शेषशायी

यज्ञ, दान आणि तप हीं भारतीय संस्कृतीचीं तीन प्रधान अंगें होत. यालाच 'त्रिस्कंध धर्म' असें छांदोग्य म्हणतें. तप हा त्यांतला व्यक्तिगत साधनेचा भाग होय. भूमि सूर्याच्या धगीने ताप ताप तापली, कीं मग पावसाच्या एकाच सरीने तिच्यांत जोरकस अंकुर फुटतात. तपाचेंहि तसेंच आहे. आपल्या डोक्यावरची अवकाशाची अनंत पोकळी असंख्य तारारत्नांनी खचून भरलेली आहे. ह्या तारकांच्या दृश्य संख्येपेक्षा अदृश्य संख्याच फार मोठी आहे. ही अदृश्य रत्नसंपदा साध्या डोळ्यांना कधीच दिसत नाही. ती दृष्टिगोचर होण्यासाठी घासून पुसून सामर्थ्यसंपन्न बनवलेली दुर्बिणीची काच डोळ्यांना लावावी लागते. मग त्या अदृश्य तारका दिसूं लागतात.

जीवन हेंहि असेंच आकाशासारखें पोकळ आहे. ह्या पोकळ जीवनांत अनंत आशय, अनेक सूक्ष्म सिद्धान्त भरलेले आहेत, असें महर्षि विनोबा सांगतात. हे जीवनसिद्धान्त तपाची दुर्बीण लावली तरच प्रत्ययाला येतात. नवीं तत्त्वें, नवे विचार, नव्या शक्ती, नव्या ज्योती, तपानेच प्राप्त होतात. तप हा आपल्या संस्कृतीचा मेरुदंड आहे. मानवाचें चिंतन तपानेच रसमय आणि प्राणवान् बनतें, हा सनातन अनुभव आहे.

शिव, बुद्ध, महावीर, नर-नारायण, भगीरथ, पार्वती ह्यांच्या जीवनांतून जें आगळें सौंदर्य सांडत आहे, तें तपाचेंच सौंदर्य आहे. ह्या दिव्य विभूतींनी महान् ध्येयासाठी, महत्तत्त्वाच्या प्राप्तीसाठी, जें उग्र तप आचरलें, तेंच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचें प्रबल आकर्षण ठरलें आहे. हें आकर्षण भारतीय शिल्पकारांच्या प्रतिभेला सर्वांआधी जाणवलें आणि भारतीय संस्कृतींतल्या 'तपोयोग समाधि' ह्या महान् आशयांच्या अभिव्यक्तीसाठी त्यांनी 'योगीश्वर' हें शिल्प निर्माण केलें.

मोहेंजोदडो येथील उत्खननांत योगीश्वर मूर्ति आढळली आहे. आजवरच्या अशा शिल्पसंभारांतली तीच सर्वप्रथम मूर्ति ठरते. तिथल्या उत्खन-

नांतून अनेक वस्तू बाहेर आल्या आहेत. तत्कालीन आधिभौतिक जीवनावर त्या थोडाबहुत प्रकाश टाकूं शकतात. पण त्यांतली योगीश्वर ही एकच मूर्ति अशी आहे, की ती सिंधुसंस्कृतीच्या आध्यात्मिक आशयावर प्रकाशझोत पाडते. तप आणि योग ह्या दोन साधना वैदिक संस्कृतीच्याहि पूर्वीपासून भारतांत प्रचलित होत्या, हें त्यावरून ठरतें.



योगमग्न शिव

पुढे मूर्तिकलेच्या विस्तारांत स्वतंत्रपणें हें योगीश्वरप्रतीक निर्माण झालें. त्याला महत्त्वहि तसेंच मिळालें. बुद्ध व महावीर यांचीं योगस्थ शिल्पें अनेक कलाकारांनीं अनेक ठिकाणीं निर्माण केलीं. शिवशंकराच्या योगस्थ मूर्तींहि निर्माण होऊं लागल्या. गुप्त काळांत अशा मूर्तींना सुबद्ध, प्रतीकात्मक आकार आला. योग आणि तप हीं नांवें भिन्न असलीं, त्यांच्या परिभाषाहि स्वतंत्र असल्या, तरी तपांत योगाचा अंश येतोच. मंत्रार्शी, त्यांच्या अर्थाशीं मनोयोग साधल्याशिवाय तपाला धार चढत नाही. योगांतहि तपाचा भाग आहेच. तिथेंहि मनोनिग्रह, इंद्रियनिरोध म्हणजे यमनियमांची आवश्यकता अगदी प्राथमिक असते. त्यावांचून अष्टांग योगाचें समाधि हें शिखर गाठतां येत नाही. त्यामुळे ह्या दोन साधना भिन्न असल्या तरी त्या एकमेकींत समाविष्ट आहेत. तप—मग तें बुद्धाच्या जीवनांतलें असो, वा शिवाच्या जीवनांतलें असो—त्याची परिभाषा सारखीच. तत्त्वांत मतभेद असला, तरी तपांत मतभेद नाही. ब्राह्मण, बौद्ध व जैन ह्या वैदिक संस्कृतीच्या तिन्ही शाखांनीं तपाला सारखेंच महत्त्व दिलें आणि कलावंतांनी त्या तपाचा अव्यक्त आशय व्यक्त करण्यासाठी 'योगीश्वर' हें प्रतीक निर्माण करून स्वतःला धन्य मानलें. पद्मासन, योगमुद्रा, दोन मांड्यांवर दोन्ही करकमलें, 'समं कायशिरोग्रीवम्' असें अवस्थान, नासाग्र पण मुकुलित दृष्टि, अशा ह्या 'लिपीं'तून तप आणि योग यांचा अर्थ सामान्यांच्या दृष्टीलाहि समजेल, उमजेल अशा प्रकारें ठसठशीतपणें विशद केला.

भगवान् बुद्धाची योगमूर्ति भारतीय संस्कृतीचा पालव धरून देश-देशांतरीं गेली आणि तिने त्या त्या देशांतल्या जनतेच्या हृदयावर आपलें स्वामित्व प्रस्थापित केलें. अनेक देशांना आणि द्वीपांना भारताची ओढ लागली. आपल्या शाश्वत कल्याणासाठीं, जीवनांतल्या महन्मंगल अनु-भूतीसाठी, त्यांनी भारतीय आदर्शांचा आदरपूर्वक स्वीकार केला.

मूर्तिकाराची लिपि एक प्रकारें उघड असते, ठळक असते. पण तिच्यांतला आशय खोल असतो, गंभीर असतो. तो जितका उघड असतो, त्याहून अधिक झाकलेला असतो. तो उलगडून दाखवायला कोणीतरी प्रतिभेचा पुरुष पुढे यावा लागतो. कविकुलगुरु कालिदासाने तें काम चांगल्या प्रकारें केलें आहे. योगमग्न शिवाचें वर्णन त्याने कुमारसंभवाच्या तिसऱ्या सर्गात पुढीलप्रमाणे केलें आहे—

" शिव पर्यंकबंध साधून बसला आहे. त्याने आपला ऊर्ध्वदेह ताठ अन् निश्चल ठेवला आहे. खांदे किंचित् नमवले आहेत. दोन्ही हातांचे तळवे दोन्ही मांड्यांवर उताणे ठेवले आहेत. जणू त्याच्या मांड्यांतून तीं दोन प्रफुल्ल कमलेंच वर आलीं आहेत. त्याने आपल्या मस्तकींचा जटाकलाप वर उचलून सर्पाच्या दोरीनें घट्ट बांधला आहे. त्याच्या उजव्या कानांत रुद्राक्षांची दुहेरी माळ लोंबत आहे. कृष्णसारमृगाचें कातडें पांघरून त्याने त्याच्या दोन्ही टोकांना घट्ट गाठ दिली आहे. तें मृगचर्म आधीच काळें. त्यांतच त्यावर शिवाच्या नीलकंठाची प्रभा पडली. त्यामुळे त्याचा कृष्णवर्ण अधिकच गहिरा झाला आहे. तिन्ही नेत्रांतल्या तरल पुतळ्यांना स्थिर करून त्याने आपली संपुंजित दृष्टि नासाग्रावर जडवली आहे. नेत्र अर्धोन्मीलित असल्या-मुळे त्याचा किंचित्सा प्रकाश तें नासाग्र उजळून टाकतो आहे. देहांत सर्वत्र संचार करणाऱ्या प्राणांचें निरोधन करून तो निवातींच्या निष्कंप दीपासारखा अविचलित राहिला आहे. जणू डवरून आलेला पण वृष्टि न करणारा मेघ. जणू आपल्या अवखळ लाटांना आंत जिरवून शांत दिसणारा महासागर ! नवद्वारांनी बाहेर पाझरणाऱ्या मनाला रोखून त्याने तें आपल्या हृदयांत पेटें केलें आहे. त्याच्या बाहेरच्या मोर्डी नाहीशा करून तें अंतर्मुख बनवलें आहे. आणि इतकें सगळें करून तो सर्वांतर्यामी आत्मतत्त्वाचें आत्म्यांतच दर्शन घेत राहिला आहे."

योगीश्वर शिवाच्या ह्या प्रतीकाने आजवर असंख्य मुमुक्षूंच्या मनांत

तपाची, साधनेची प्रेरणा उत्पन्न केली असेल. शून्याशीं झोंबी घेण्याच्या ह्या अवघड मार्गांत आजवर असंख्य साधकांना ह्याच प्रतीकाने धैर्य आणि आश्वासन दिलें असेल. कामक्रोधादि विकारांशीं दोन हात करतांना साधकांना हेंच प्रतीक वज्ररूप झालें असेल. भारतभूमींतल्या अनंत ऋषिमुनींचें पुंजाळलेलें तपच जणू ह्या प्रतीकाच्याद्वारें आकाराला आलें आहे. हें प्रतीक आपल्याला संयम शिकवतें. आपल्या प्राणांत तेजाची धार ओततें. आपल्याला बाह्य विश्वाच्या पसाऱ्यांतून आणि भवजंजाळांतून चिंतनाच्या प्रदेशांत घेऊन जातें. नव्या नव्या आशयांचीं द्वारें आपल्याला खुलीं करतें. सुप्त मुमुक्षेला जागृत करून तिला दिव्य जीवनाची ओढ लावणारें याच्याइतकें समर्थ प्रतीक दुसरें कोणतेंहि नाही. 'आत्मा वा रे श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्यः' हा बृहदारण्यांतला आदेश जणू त्या प्रतीकावर ठळकपणें कोरूनच ठेवला आहे....



शेषशायी विष्णु

भारतीय कलेची आणखी एक अर्थपूर्ण परिभाषा म्हणजे शेषशायी विष्णु! वेदांतला नारायण ऋषि म्हणतो, की तो सहस्रशीर्षा असून अनंत आहे. सर्व विश्वाला व्यापून तो दशांगुळें शिल्लक उरला आहे. हा जो शिल्लक उरलेला तो 'शेष.' विश्वप्रलयानंतर शून्यावस्थेंत तोच एकटा राहतो. विश्वांत व्याप्त असलेला विष्णु ह्या 'अनंत' शेषाच्या आधारावरच स्थित आहे.

हा एक दार्शनिक विचार आहे. तो आकृतिबद्ध आणि चिरस्थायी

करण्यासाठी कलाकारांनी 'शेषशायी विष्णु' किंवा 'अनंतशयन' हे प्रतीक निर्माण केलें. दक्षिणेंत श्रीरंगम् येथे, देवगडच्या दशावतार मंदिरावर, वैजनाथच्या क्षेत्रांत आणि अन्यत्राहि शेषशायी विष्णूचीं शिल्पें आढळतात. ह्या प्रतीकाची पौराणिक कल्पना सामान्यतः पुढीलप्रमाणे असून कलावंतांनी त्यांत स्वतःच्या कल्पनेची थोडीबहुत भर घातलेली आहे—

सभोवती सर्वत्र अंधाराचें आवरण. त्याच्या खाली अथांग निळा दरिया. क्षीरसागर हें त्याचें नांव. सगळीकडे पाणीच पाणी. अशा त्या प्रलयजळाच्या निळावंतीवर शेषनाग पसरला आहे. वेडावाकडा नव्हे; तर आपल्या जुंबाडाची शय्येसारखी लांबट वळकटी करून. त्यावर घननीळ सांवळा योगनिद्रेंत डाव्या कुशीवर पहुडला आहे. त्याच्या मस्तकावर शेषानें आपल्या सहस्र-फणांचें छत्र फुलवून धरलें आहे. शंख, चक्र, गदा, पद्म ह्या त्याच्या वस्तू त्याच्या हातांतच; क्वचित् हातांजवळ विसावल्या आहेत. त्याचा एक पाय आपल्या मांडीवर घेऊन श्रीलक्ष्मी तो आपल्या गोंडस कोमल हातांनी चुरीत आहे. त्याच्या नाभींतून एक कमलनाल वर येऊन उमललें आहे. त्या सहस्र-पत्र कमलांत चतुर्मुख ब्रह्मदेवाचा जन्म झाला असून तो चार मुखांवरच्या आठ नेत्रांनी विश्वाच्या त्या अनंत पोकळीचा वेध घेत आहे. कांहींसा गोंधळून पाहत आहे. हा महाशून्याचा गाभारा त्याला चारी खाणी, चौऱ्यांयशी लक्ष योनी, ह्यांच्या लहानमोठ्या नाण्यांनी भरून काढावयाचा आहे. तो जणू त्यासाठी जनकाच्या आदेशाची वाट पाहत आहे.

शेषनागावरची विष्णूची ती गाढ निद्राहि समजून घ्यायला हवी. विश्व व्यापूनहि विश्वाबाहेर उरलेला म्हणजे विष्णु. तो शेषनागाची शय्या बनवूं शकतो याचा अर्थ कालावरहि सत्ता चालवणारा तो महाकाल आहे, असा होतो.

" यस्मिंस्तु पच्यते कालो यस्तं वेद स वेदवित् "

त्याचेंच हें गोठलेलें घनश्याम रूप. त्या रूपाच्या हृदयांत चराचर सृष्टीचीं बीजें सुरक्षित आहेत. शेतकऱ्यानें पुढच्या पेरणीसाठी बियाण्याचा ' मुडा ' बांधून ठेवावा, तशीं. या बीजांतून पुनरपि सकल सृष्टि उगवायची आहे, फुलायची आहे. पण हीं बीजें बाहेर कधी पडणार ? कोणत्या प्रकारें पडणार ? त्या कालाबद्दल कांही सांगतां येणार नाही. कारण काल ही संज्ञाच मुळी त्या अवस्थेंत शिल्लक नाही. पण एवढें खरें की कधींतरी संकल्पाचें आदिबीज त्या हृदयांतून स्फुरूं लागेल. 'एकोऽहं बहु स्याम् प्रजायेय!' ' मी

एकटा आहे. अगदी एकीएक. मी अनेक होईन. पुष्कळ होईन. प्रजांची अभिवृद्धि करीन.' असा अर्थ त्या संकल्पबीजांतून त्यां शेषशायी नारायणाला अविरत जाणवूं लागेल. आणि मग तें कमलनाल त्याच्या नाभिचक्रांतून एकदम तरारून बाहेर पडेल. विधाता ब्रह्मा त्यांतूनच जन्म घेईल.



ध्यानस्थ महावीर

नारायणाचें हें स्फुरण रजोगुणात्मक आहे. रजोगुणाचा वर्ण आरक्त मानलेला आहे. म्हणूनच शेषशायीचें चित्र रंगवतांना कमल आणि कमलासन ब्रह्मदेव यांचा रंग तांबूस दाखवायचा असतो. पुढचा प्रश्न हा, की विधात्याची उत्पत्ति विष्णूच्या नाभिस्थानांतूनच कां? मुखांतून कां नाही? हृदयांतून किंवा पायांतून कां नाही? त्याचें कारण नाभिचक्राच्या मुळांतच कुंडलिनी शक्तीचें स्थान आहे. जणूं विद्युल्लतेची विडीच अशी 'मोटकी ऑट वळणी' कुंडलिनी तिथे असल्यामुळे नाभिस्थान हें अनंत शक्तींचा स्रोत असें मानलें आहे. हा अर्थ व्यक्त करण्यासाठी ज्ञानेश्वरांनी एक कांतिमान् ओवी सहजपणें लिहिली आहे—

"ते कुंडलिनी जगदंबा । जे चैतन्यचक्रवर्तीची शोभा ।
जिया विश्वबीजाचिया कोंभा । साउली केली"

तसाच तो कमलाचा देठ. तो नाळेचें प्रतीक आहे. कोणताहि जीव गर्भावस्थेंत असतांना मातेच्या जठरांतला अन्नरस नाळेच्या द्वारेंच स्वतःला मिळवतो आणि त्यावर पोसतो. यावरून असें सूचित केलें आहे, की विधाता चराचर सृष्टि निर्मील खरा; पण त्यासाठी लागणारें अपार सामर्थ्य त्याला श्रीविष्णूकडूनच मिळवावें लागेल. तोच शक्तीचा झरा सदैव वापरावा लागेल. आता त्या कमलाकडे ध्यान द्या. तें कसें सर्वांगीं विकसित आहे. आगामी सृष्टिहि अशीच फुलायची आहे. रूप, रस, गंध, कर्म, ज्ञान, यांनी तिचा

विकास व्हायचा आहे. कमलाची कळी सामान्यतः अंड्यांसारखी म्हणजे लांबट फुगीर असते. त्या पाकळ्या, त्यांचा रंग, त्यांचा सौरभ, हें सर्व कांही त्या कळीच्या अंड्यांत सामावलेलें असतें. चराचर सृष्टीलाहि 'ब्रह्मांड' अशीच संज्ञा आहे. हें अंडें फुटलें आणि त्यांतूनच हा पांचभौतिक विश्वप्रपंच व्यक्त झाला.

आता तो विष्णूच्या हातांतला किंवा क्वचित् हाताजवळ ठेवलेला पांचजन्य शंख पाहा. शंख पोकळ असतो म्हणूनच त्यांतून नाद निघूं शकतो. तो शंख हें अनंत अवकाशाचें प्रतीक आहे. आकाश पोकळ आहे म्हणूनच त्यांतून 'शब्द' प्रकटला. तसेंच तें चक्र. चक्र म्हणजे मासचक्र, ऋतुचक्र म्हणजे पर्यायानें कालचक्र. 'पुनरपि जननं पुनरपि मरणं पुनरपि जननीजठरे शयनम्' असें भवचक्र. हें चक्र सदैव फिरत आहे म्हणून सृष्टींत बदल आहे, नावीन्य आहे, येणें-जाणें आहे आणि म्हणूनच 'राम' आहे.

विष्णूच्या गळ्यांतला तो कौस्तुभ मणिहि विचारांत घ्यायला हवा. तो कसा सदैव झळकतो आहे. त्याला मळ लागत नाही की लेप लागत नाही. त्यावर आवरण घातलें, तरीहि त्याचा प्रकाश बाहेर आल्यावांचून राहत नाही. तो निर्लेप आणि परिशुद्ध अशा आत्म्याचें प्रतीक आहे. तो हृदयावर रुळतो आणि आत्माहि हृदयस्थच आहे. ह्या कौस्तुभाच्या म्हणजे चैतन्यमय आत्म्याच्या प्रकाशांत विश्वाचें ज्ञान करून घ्यावें.

ती पायांगतीची लक्ष्मी म्हणजे विश्वाची आदिमाता. म्हणजेच त्रिगुणात्मक प्रकृति. तिला रूपा-गुणांचा चाळढाळ आहे. ती अमूर्ताची मूर्ति आहे. म्हणजेच तिच्या हौसेसाठी विष्णूनें हें घनसावळें, सांग सपरिवार रूप धारण केलें. ती विष्णूचें पादसंवाहन करते म्हणजे त्याची सेवा करून त्याच्या दादुलेपणाच्या सत्तेवर स्वतःचें सौभाग्य मिरवते. हा सर्व आशय कविकल्पित असला, तरी ती कल्पना पुराणकारांची आहे. विष्णुपुराणांत ह्या प्रतीकाचें समग्र विवेचन आढळतें. शिल्पी आणि चित्रकार ह्यांनी त्याच आधारावर ह्या प्रतीकांची मांडावळ केली आहे.

गुप्त कालांत ह्या शेषशायीच्या प्रतीकाला आदराचें स्थान मिळालें. त्याची खूप तोखणाई झाली. आणि मग कविकुलगुरूनें राम-सीता लंकेहून पुष्पक विमानांत बसून अयोध्येला परत येत असतां रामाच्या तोंडून पुढील अर्थगर्भ श्लोक वदवला—

" नाभिप्ररूढांबुरुहासनेन संस्तूयमानः प्रथमेन धात्रा
अमुं युगांतोचितयोगनिद्रः संहृत्य लोकान्पुरुषोऽधिशेते "

नाभींतून निघालेल्या कमलांत बसून पहिला विधाता ज्याचीं स्तवनें गात आहे, असा हा पुरुष म्हणजे शेषशायी विष्णु, प्रलयान्तीं सर्व लोकांचा संहार करून या महासागरांत युगान्तींची योगनिद्रा घेत पहुडला आहे.



# ओंकार

आपण माणसें मर्त्य आहोंत. इतकेंच काय; प्रत्येक प्राणी मर्त्य आहे. तो जन्माला येतो, तेव्हापासूनच मृत्यु त्याचा पाठलाग सुरू करतो. आणि अखेर ‘ अद्य वाऽब्दशतान्ते वा ’ केव्हाना केव्हा तरी मृत्युरूपी व्याधाचा बाण प्राण्याच्या उरांत घुसल्यावांचून राहत नाही. ह्या सर्वग्रासी मृत्यूच्या दाढेंतून सुटले ते स्वर्गातले देव मात्र. तेहि प्रथम माणसांप्रमाणेच मर्त्य होते. मृत्यु त्यांच्याहि पाठीस लागला होता. पण त्यांनी त्याला चुकवण्यासाठीं एक युक्ति केली. ते घाबरले तर खरेच; पण त्यांनी मृत्यूपुढे मान न टाकतां त्रयी विद्येचा म्हणजे ऋक्-यजुःसाम ह्या वेदत्रयीच्या गुहेचा आश्रय केला. ‘छद्’ धातु हा आच्छादनार्थक आहे. आच्छादन म्हणजे वस्तूवर आवरण घालून तिला लपवणें. देव वेदत्रयींत लपले, म्हणून वेदांना ‘छंदस्’ अशी संज्ञा प्राप्त झाली.

पण तेवढ्याने देवांच्या मागचा मृत्यूचा ससेमिरा सुटला नाही. पाण्याच्या पृष्ठभागाखालचा मासा बगळ्याने नेमका हेरून आपल्या चोचींत पकडावा, त्याप्रमाणे मृत्यूने तिथेहि देवांना गाठलेंच. देव पुनः भ्याले आणि तेथून धूम ठोकून ओंकाराच्या आश्रयाला गेले. वेदत्रयी हा जर किल्ला, तर ओंकार हा त्याचा बालेकिल्ला. तो शत्रूला दुर्गम आणि असाध्य. तिथे मृत्यूचा प्रवेश होऊं शकला नाही. तें स्थान देवांना निर्भय ठरलें आणि ते मृत्यूला टाळून अमर झाले. ओंकाराचें हें सामर्थ्य लक्षांत घेऊन मग उपनिषदांतल्या ऋषींनी माणसांना ग्वाही दिली. ‘ज्याला मृत्युभयापासून सुटायचें असेल, त्याने ओंकाराची उपासना करावी.’

ओंकाराचें माहात्म्य उद्घोषित करणारी ही आख्यायिका छांदोग्य उपनिषदांत सांगितलेली आहे. ओंकार म्हणजे त्रयीविद्येचें सार, असें तिच्यावरून जाणतां येतें. वेदांचें श्रेष्ठत्व अबाधित खरें; पण त्याहिपेक्षां ओंकार हा सर्वसमर्थ आहे. ओंकाराची विद्या ही अक्षरविद्या आहे. अक्षर म्हणजे अविनाशी आणि अविनाशी म्हणजे एकलें परब्रह्म. ‘ओमित्येकाक्षरं ब्रह्म’ ह्याच शब्दांत

भगवंताने त्याचा गौरव केला आहे. वेदांच्या उपासनेने फार तर स्वर्ग गाठतां येईल. पण ओंकाराच्या उपासनेने साक्षात् अमृतत्वाची प्राप्ति होते. ब्रह्म-पदवीवर आरूढ होतां येतें.

दुसऱ्या भाषेंत बोलायचें, तर ओंकार हा सर्व रसांतला श्रेष्ठ असा रस आहे. त्याची चढती भांजणी अशी–सकल भूतांचें सार म्हणजे ही आकाराला आलेली पृथ्वी. पृथ्वीचें सार म्हणजे जल. जलाचें सार वनस्पति. वनस्पतीचें सार मनुष्य. मनुष्याचें सार वाचा. वाचेचें सार ऋचा. ऋचांचें सार साम आणि सामाचें उद्‍गीथ होय. हें उद्‍गीथ म्हणजेच ओंकार. हा सात रसांच्या वरचा आठवा अत्यंत श्रेष्ठ असा रस आहे. महर्षि विनोबांच्या मताप्रमाणे सात गाळण्यांमधून पसार झालेला ' रसशेखर '.


**" स एष रसानां रसतमः परमः परार्ध्योऽष्टमो य उद्‍गीथः "**

ओंकारालाच 'प्रणव' आणि 'उद्‍गीथ' अशीं आणखी दोन नांवें आहेत. वाटल्यास त्या त्याच्या पदव्या समजा. 'नु' म्हणजे स्तुति करणें ह्या धातूला 'प्र' हा उपसर्ग जोडून ' प्रणव ' हा शब्द बनलेला आहे. त्याचा अर्थ प्रकर्षानें केलेली स्तुति किंवा उत्तम स्तोत्र असा होऊं शकतो. हें उत्तम स्तोत्र कोणाचें, तर परब्रह्माचें. परब्रह्माच्या स्तवनाला सगळें गद्यपद्यात्मक वाङ्मय अपुरें पडतें. तिथे शब्दांची चावटी चालत नाही. म्हणून सकल संकेत ज्याच्या साडेतीन मात्रांत सामावले आहेत, असा ॐ हा ध्वनिच परब्रह्माचा वाचक आणि स्तावक बनला.

ओंकाराची दुसरी पदवी 'उद्‍गीथ' होय. 'गै' गाणें ह्या धातूला 'उत्' हा उपसर्ग लावल्याने हा शब्द बनला आहे. ह्याचा अर्थ उच्च गायन म्हणजे उत्तम स्तुति असाच होतो. 'उद्‍गीथाक्षराण्युपासीत' म्हणजे उद्‍गीथांतल्या अक्षरांची उपासना करावी, असें विधान आहे. ह्या उद्‍गीथाचें रहस्य प्रकाशित करणारी आणखी एक आख्यायिका छांदोग्य आणि बृहदारण्यक ह्या दोन्ही उपनिषदांत आली आहे.

देव आणि असुर हे दोघेहि प्रजापतीचेच पुत्र. पण त्यांच्यामध्ये सदैव स्पर्धा चाले. कित्येकदा मोठमोठे संग्रामहि होत. अशाच एका संग्रामांत देवांनी असुरांचा पराभव करण्यासाठी ह्या उद्‍गीथाचा आश्रय केला. मात्र खरा उद्‍गीथ कोणता, तें प्रथम त्यांना कळलें नाही. त्यांना वाटलें की, नाकां-

तून आंतबाहेर करणारा वायु हाच उद्गीथ असेल. म्हणून त्यांनी त्याचीच उपासना सुरू केली. तेव्हा असुरांनी देवांचा बेत हाणून पाडण्यासाठी त्या घ्राणेंद्रियांतून येणाऱ्या जाणाऱ्या वायूवर पापाचा मारा केला. तो वायु पापविद्ध झाला. आणि पूर्वी तो जो नेहमी सुगंधच हुंगीत होता, तो आता सुगंधाबरोबरच दुर्गंधहि हुंगू लागला. तो उपाय फसलेला पाहून देवांनी वाणीची



दैत्य देवांवर पापाचा प्रहार करतात.

उद्गीथरूपाने उपासना सुरू केली. असुरांनी त्या वाणीवरहि पाप फेकून मारलें. त्यामुळे ती पापयुक्त झाली आणि तिथून पुढे सत्याबरोबरच असत्यहि बोलू लागली. तीहि युक्ति असफल झाली असें पाहून देवांनी डोळ्यांची, कानांची, मनाची, उद्गीथरूपाने उपासना केली. पण असुरांनी त्या सर्व इंद्रियांवर पापाचा मारा केल्यामुळे, डोळे जें पाहूं नये तें पाहूं लागले. कान अश्राव्य तें ऐकू लागले, अन् मन संकल्प-विकल्पांच्या भोवऱ्यांत पडलें.

असें सगळें विपरीत झाल्यावर मग खरा उद्गीथ कोणता हें देवांना उमगलें. मग मुख्य हृदयस्थ जो प्राण, त्याचीच त्यांनी उद्गीथरूपाने उपासना सुरू केली. असुरांनी त्याच्यावरहि पाप फेकून मारलें. पण त्या पापाची मात्रा प्राणावर मुळींच चालली नाही. हा पराभव असुरांना सहन झाला नाही. ते मग स्वतः त्या प्राणावर हल्ला करायला धावले, पण एखादा पदार्थ दगडावर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम वि: ........
नों: दि: ........

पडल्यानंतर तो जसा फुटून जावा, त्याप्रमाणे प्राणावरच्या त्या हल्ल्यांत सगळ्या असुरांचा धुव्वा उडाला.

यावरून उपनिषदांतल्या ऋषींनी ठरवलें, की हृदयस्थ प्राण हा निष्पाप आहे. ज्याच्यापाशी स्वार्थ नाही, त्याच्यापाशीं पाप नाही, हें ओघानेच ठरतें. 'लोभमूलानि पापानि!' प्राण जें खातो पितो, त्यांत त्याचा कांही लाभ नसून त्यामुळे इंद्रियांच्या शक्तीचेंच संरक्षण होतें. अशा प्रकारें प्राणाची उद्गीथाशीं सांगड घालून प्रणव हें प्राणाचें प्रतीक आहे, असें ऋषींनी ठरवलें.

छान्दोग्यांत एका मूलभूत दांपत्याची कल्पना केलेली आहे. 'तद्वा एतन्मिथुनं यद्वाक्प्राणश्च।' हें दांपत्य म्हणजे वाणी आणि प्राण. ह्या दोघांची एकत्र मिळणी झाली ती ह्या ओंकारांत. ह्याचा भावार्थ असा कीं वाणी आणि प्राण यांच्या विशिष्ट संयोगानेच ओंकाराचा उच्चार होत असतो. दुसऱ्या दृष्टीने बोलायचें, तर ओंकाररूपी बालकाला जन्म दिल्यावरच वाणी आणि प्राण ह्या दोघांचा दांपत्यभाव कृतार्थ होतो. अर्थात तोंवर ती दोघें वांझोटीं समजावी.



वाणी-प्राणांचे बालक—ॐकार

प्राण म्हणजेच प्रणव. प्राणाला अमृतत्वाची प्राप्ति हवी असेल, तर त्याची उपासना ओंकाराच्या रूपाने करायला हवी. प्राण आणि सूर्य दोघेहि

सारखेच. सूर्य उष्ण तसाच प्राणहि उष्ण. विश्वाच्या जीवनाला आवश्यक ती उष्णता सूर्य देतो आणि माणसाच्या जीवनाला आवश्यक ती ऊब प्राणामुळे मिळते. सूर्य हा 'स्वर' म्हणजे गतिमान् तसाच 'प्रत्यास्वर' म्हणजे परत येणाराहि आहे. प्राणाचेंहि तसेंच. म्हणून देहांतल्या प्राणाची आणि विश्वांतल्या सूर्याची उपासना ओंकाराच्या रूपानेच करावी असें जाणते ऋषी सांगतात. ह्या मुख्य प्राणाला म्हणजेच प्रणवाला 'अंगिरस' म्हणतात. अंगाचा रस म्हणजेच प्राण. तो ज्याने प्राप्त करून घेतला त्या अंगिरस ऋषीवरून त्याला हें नांव मिळालें. बृहस्पतीनेहि ह्याची उद्‌गीथरूपाने उपासना केली. वाणी म्हणजे बृहती आणि तिचा पति म्हणजे प्राण. म्हणून मग त्यालाच बृहस्पति म्हणूं लागले.

वेदांतला जो बृहस्पति तोच पुराणांतला गणपति. ज्ञानेश्वरमहाराज त्याचे अवयव ओंकारांत बसवून दाखवतात—

"अकार चरणयुगुल । उकार उदर विशाल ।
मकार महामंडल । मस्तकाकारें ॥
हे तीन्ही एकवटले । तेथ शब्दब्रह्म कवळलें ।
तें मियां गुरुकृपा नमिलें । आदिबीज ॥"

ओंकाराच्या तिन्ही मात्रा एकवटल्या, की त्यांत संपूर्ण वेद कवळला जातो. त्या ओंकाररूप आदिबीजाला म्हणजेच त्या रूपाने गणपतीला मी ग्रंथारंभी नमन करतों, असें ज्ञानदेवांचें बोलणें आहे.

'ओंकाराच्या मात्रा' असा शब्दप्रयोग वर आला आहे तेव्हा, त्याचें थोडेंसें निदर्शन करणें उचित ठरेल.

ओंकार म्हणजे ॐ! हा अ+उ+म् ह्या तीन वर्णांचा संधि होऊन बनलेला आहे. ह्या तीन वर्णांना तीन मात्रा असें म्हणतात. ह्या तीन मात्रांचे वेगवेगळ्या क्षेत्रांत वेगवेगळे अर्थ होतात. ब्रह्मांडाच्या दृष्टीने पाहिलें, तर आपल्या विश्वगोलाची विभागणी ह्या तीन मात्रांनीच झालेली आहे. 'अ' म्हणजे पृथ्वी, 'उ' म्हणजे अंतरिक्ष आणि 'म्' म्हणजे द्युलोक. ह्या विश्वाचें अवस्थात्रयहि ह्यांतच बसतें. अकार उत्पत्ति, उकार स्थिति आणि मकार विलय दर्शवितो. विश्व, तैजस आणि प्राज्ञ ह्या जीवात्म्याच्या तीन अवस्थाहि ओंकारांतच दाखवतां येतात.

त्या दृष्टीने पाहतां अकार हा जागृतींतला 'वैश्वानर' आत्मा असून तो सर्व शब्दोच्चारांना व्यापून राहिला आहे. ओंकारांतल्या अकारावर जोर देऊन त्याचें ध्यान केल्यास, तो आधिभौतिक ऐश्वर्य मिळवून देणारा होतो. असा पुरुष व्यासंगी, तपस्वी आणि ब्रह्मवर्चस्वी होऊन प्रपंचांतहि महत्त्व पावतो.

दुसरी मात्रा उकार. हा स्वप्नस्थानीं असणारा 'तैजस' नांवाचा आत्मा होय. उकार म्हणजे उन्नति, उत्क्रांति. ह्या मात्रेचा मागच्या पुढच्या दोन्ही मात्रांशीं संबंध आहे. आधिभौतिक ऐश्वर्याहून वरचें असें दिव्य म्हणजे आधि-दैविक सामर्थ्य हवें असेल, तर प्रणवोपासनेंत उकारावर अधिक ध्यान द्यावें. उकार हा तेजोनिधि सूर्यनारायणाचाच अंश आहे. त्याची कृपा झाली, तर मनुष्य तेजस्वी होतो, कर्तव्याच्या क्षेत्रांत झुंजार होतो आणि यशकीर्ति-प्रतापाने तळपतो.

तिसरी मात्रा म्हणजे मकार. हा सुषुप्तिस्थानीं राहणारा 'प्राज्ञ' आत्मा होय. ह्या प्राज्ञाला प्रसन्न करून घेतल्याने, म्हणजेच प्रणवांतल्या त्या मात्रेवर विशेष ध्यान दिल्याने परात्पर ब्रह्माचा साक्षात्कार घडतो. जीवन मृत्युरहित होतें, कृतार्थ होतें.

ह्या तीन मात्रा म्हणजे तीन शक्तीच आहेत. इंद्रियांच्या द्वारें घडणारीं कर्मे, मानसिक कर्मे, आणि बौद्धिक कर्मे ह्या तीन प्रकारच्या कर्मांवर त्या आपली सत्ता चालवतात. त्या कर्मांत तेज आणतात. म्हणून माणसाने आपल्या अंतर्बाह्य कर्मांत ह्या तिन्ही शक्तींचा योग्य प्रकारें विनियोग करायला हवा.

पण तरीहि शेवटीं अर्धमात्रा शिल्लक राहतेच. ही अर्धी मात्रा पूर्वीच्या तीन मात्रांत अविरोध आणते. ती सर्वसहिष्णुता किंवा सर्वांभूतीं भगवद्भाव सूचित करते. ती ज्ञानाने निर्वाळलेल्या, पाप-पुण्यापासून अलिप्त अशा शांता-त्म्याची प्रतीक आहे. 'ॐ शांतिः शांतिः शांतिः' म्हणतात ती ती ! ही मात्रा हस्तगत झाली, की त्या अवस्थेंत लौकिक किंवा शास्त्रीय धर्माच्याहि मर्यादा लोपून जातात. तो मग कोणत्याहि धर्माचा निषेध न करतां सर्वच धर्मांना स्वतःच्या पोटांत सामावून विश्वव्यापक बनतो. येणें–जाणें, देणें–घेणें, जगणें-मरणें, आवडणें-नावडणें हें सर्व संपलें की त्यांच्या तळाशीं एकटी निखळ शांतिच शिल्लक उरते, हे संतांचे अनुभवाचे बोल आहेत.

म्हणूनच ब्रह्मवादी लोकांच्या यज्ञ, दान, तप इत्यादि क्रिया ओंकाराचा उच्चार करूनच सुरू होतात, असें भगवान् अर्जुनाला सांगतो—

"तस्मादोमित्युदाहृत्य यज्ञदानतपःक्रियाः ।
प्रवर्तन्ते विधानोक्ताः सततं ब्रह्मवादिनाम् ॥"

कोणताहि मंत्र ऐकवा म्हटलें, तर तो ओंकारपूर्वकच ऐकवला जातो. यागानुष्ठानांत ॐ म्हणूनच अध्वर्यु प्रत्येक मंत्र उच्चारतो. ॐ म्हणूनच ब्रह्मा प्रेरणा देतो. ॐ म्हणूनच प्रैष दिला जातो. अध्वर्युला कांही वेळां ब्रम्ह्याची किंवा यजमानाची अनुज्ञा विचारावी लागते, ती तो ओंकारपूर्वकच विचारतो. कुठल्याहि श्रौतस्मार्त कर्मासाठी आचमन करायचें म्हटलें, तरी 'ॐ केशवाय नमः' असेंच उच्चारावें लागतें. ओंकारांवाचुन वैदिक मंत्र लंगडे ठरतात.

ओंकारपूर्वक केलेलें कोणतेंहि कर्म सात्त्विक बनतें. अंधारांत दिवा आणि रानांत वाट दाखवणारा सोबती, तसा हा कर्माच्या आरंभींचा ओंकार आहे. तो आरंभलेलें कर्म निर्विघ्न शेवटास नेण्याला साह्य करतो. इतकेंच नव्हे; तर तो कर्मांतलें वैगुण्यहि दूर करतो.

यज्ञ, दान, तप हीं कर्में तसें म्हटलें तर मोक्षाला प्रतिबंधकच होत. कारण तीं फल उत्पन्न करतात आणि साधकाच्या मोक्षमार्ग अडवतात. तीं करणें तर भाग; कारण त्यांवाचून चित्तशुद्धि नाही. मोक्ष हें तर परम साध्य. कर्म करून जर तो साधायचा, तर कर्मांतलें बंधकत्व नष्ट व्हायला हवें. फणसाचे गरे तर खायचे, पण चीक मात्र हाताला लागतां कामा नये. ह्यासाठीं युक्ति म्हणजे आधींच हाताला तेलाचा वास लावून ठेवणें. कर्माचें बंधकत्व घालवण्यासाठी वैदिक ऋषींनी अशीच एक नामी युक्ति शोधून काढली, ती ओंकाराची. कर्माच्या आरंभीं प्रणवाचा उच्चार करावा, 'ॐ तत्सत्' म्हणावें; म्हणजे यज्ञदानादि कर्में बंधक न होतां मोक्षदायक ठरतील. हीच गोष्ट ज्ञानेश्वर एका दृष्टान्ताने सांगतात—

"स्थळीं नावा जिया दाटिजे । जळीं तियाचि जेविं तरिजे ।
तेवीं बंधकीं कर्मीं सुटिजे । नामें येणें ॥"

नाव वाळवंटांत असली की ती अवजड ओझें ठरते; पण तीच पाण्यांत लोटली, की तिच्या योगानेच नदीच्या पैलपार होतां येतें. त्याप्रमाणेच कर्माच्या

आरंभीं जर ' ॐ तत्सत् 'चा विनियोग केला, तर त्या कर्मामुळे मोक्षाची सहजपणें प्राप्ति होईल.

एतावता ब्रह्मविद्येचा सर्व अर्थ ह्या ओंकारांत संकलित करून साठवलेला आहे. संसाराचें आणि परमार्थाचें द्विदल बीज ह्या ओंकारांतच आहे. ओंकारांत सदैव शांति भरून राहिलेली आहे. तें प्राणांचें, वेदांचें आणि परब्रह्माचेंहि तेजःपुंज असें प्रतीक आहे. वटवृक्षाचें बीज हातीं आल्यावर पारंब्या आणि विस्तार ह्यांच्यासह जसा समग्र वटवृक्ष हातीं आल्यासारखा होतो, तसाच ओंकार जर खऱ्या-खुऱ्या अर्थानें आत्मसात् करून घेतला, तर जगासकट जगदीश्वर आपल्या हृदयाच्या अंगणांत येऊन खेळेल. म्हणूनच ध्यानबिंदूच्या उपनिषदांत निस्संदिग्धपणें असें उद्घोषित केलें की—

" ओंकारप्रभवा देवा ओंकारप्रभवाः स्वराः ।
ओंकारप्रभवं सर्वं त्रैलोक्यं सचराचरम् ॥ "

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ............ विः ..........
क्रमांक .......... नों: दिः ..........

— समाप्त —

म. ग्रं. सं. ठाणें
क्र. क्र. १०३४
REFBK-0009734
REFBK-0009734